ISBN: 978-93-95847-78-0

# Heritage Sindhudurg

## वैभवशाली सिंधुदुर्ग

Editors
Sunetra Laxman Dhere
Vijaykumar Bhiva Kunure

Bhumi Publishing, India
First Edition: February 2024

# Heritage Sindhudurg

# वैभवशाली सिंधुदुर्ग

(ISBN: 978-93-95847-78-0)

**Editors**

**Dr. Sunetra Laxman Dhere**

**Dr. Vijaykumar Bhiva Kunure**

Bhumi Publishing

**February 2024**

Copyright © Editors

Title: Heritage Sindhudurg

Editors: Dr. Sunetra Laxman Dhere, Dr. Vijaykumar Bhiva Kunure

First Edition: February, 2024

ISBN: 978-93-95847-78-0

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

**Published by:**

**BHUMI PUBLISHING**

**Nigave Khalasa, Tal – Karveer, Dist – Kolhapur, Maharashtra, INDIA 416 207**

**E-mail:** bhumipublishing@gmail.com

**Disclaimer:** The views expressed in the book are of the authors and not necessarily of the publisher and editors. Authors themselves are responsible for any kind of plagiarism found in their chapters and any related issues found with the book.

**संपादकांचे दोन शब्द...**

सन १९७२, डिसेंबरमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षणाची सुविधा  उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने काही समविचारी व्यक्ती एकत्र आल्या आणि स्थापन झाली मातृ संस्था शिक्षण विकास मंडळ, देवगड. ३० जून, १९७४ आषाढी एकादशी दिवशी श्री. स. ह. केळकर महाविद्यालय देवगड येथील शेठ म. ग. हायस्कूलच्या प्रांगणात सुरू झाले. आज श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरीमध्ये वसलेले श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड हे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. जिल्ह्यातील एक अग्रणी आणि नामांकित महाविद्यालय म्हणून सुपरिचित अशा या शिक्षण संस्थेचे योगदान आणि त्यातून समाजास देऊ केलेला शैक्षणिक वारसा नक्कीच लक्षणीय आहे.

महाविद्यालायाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने सिंधुदुर्ग जिल्ह्याचे नैसर्गिक, ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक इत्यादी बाबतीत असणारे वैविध्य, वैशिष्ट्य आणि वारसा याविषयी समग्र माहिती एकत्रित प्रकाशित व्हावी या उद्देशाने सदर पुस्ताकाचा मानस आखला गेला. सिंधुदुर्ग जिल्ह्याविषयी आपुलकी आणि अभ्यास असणाऱ्या, विविध शिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या सहकाऱ्यांकडून या पुस्तकासाठी लेख मागवण्यात आले आणि आमच्या या आवाहनास उत्तम प्रतिसाद मिळाला. लेख लिहण्यासाठी इंग्रजी अथवा मराठी भाषा निवडीचे स्वातंत्र्य लेखकांना दिले गेले. मराठी भाषेतील २४ तर इंग्रजी भातील १३ लेख या पुस्तकामध्ये वाचण्यास मिळतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जैवविविधता, पारंपारिक कला, मंदिरे, पर्यटन स्थळे, खाद्यसंस्कृती इत्यादीचे संकलन या निमित्ताने झाले आणि एका संग्राह्य पुस्तकाची निर्मिती होऊ शकली.

या संपादित पुस्तकाच्या निर्मितीसाठी ज्यांनी आपले अभ्यासपूर्ण आणि अनुभवसंपन्न लेखनाचे योगदान दिले त्या सर्व लेखकांचे सहकार्य आणि पुस्तक प्रकाशन होण्याच्या सर्व प्रक्रियेदरम्यान दाखवलेला संयम याबद्दल आम्ही त्यांचे ऋण व्यक्त करतो. या लेखनप्रपंचाने नवोदित संशोधक आणि लेखक यांना सिंधुदुर्ग अभ्यासाची आणि लेखनाची उत्तम संधी प्राप्त झाली आहे. Heritage Sindhudurg - वैभवशाली सिंधुदुर्ग या विषयाशी संबंधित विविधांगी लेखांमुळे या पुस्तकाची व्याप्ती व रोचकता वाढली आहे. या पुस्तकाची गुणवत्ता वाढण्यासाठी काही परिचितांच्या रचनात्मक अभिप्रायाची नक्कीच मदत झाली, त्यांचेही आभार मानणे साहजिक आणि स्वाभाविकच आहे. हे पुस्तक तयार करताना आमच्या सहकाऱ्यांकडून तसेच आप्तेष्टांकडून मिळालेले प्रोत्साहन आणि पाठिंबा नेहमीच मिळत राहील ही खात्री आहे. या पुस्तकातील जे जे चांगले, त्याचे सर्व श्रेय लेखकांना आणि हितचिंतकांना तर उणीवा आणि त्रुटी संपादकांच्या!

आजच्या घडीला दोन घटका निसर्गाच्या सान्निध्यात घालवण्यासाठी पर्यटक कोकणास, त्यातही सिंधुदुर्ग जिल्ह्यास पसंती देतात. सिंधुदुर्गाच्या वैभवाची ओळख या पुस्तकाच्या रुपाने येणारी काही वर्षे जतन होईल असे वाटते. तसेच अनेक पर्यटक, अभ्यासक यांनाही या पुस्तकातून सिंधुदुर्ग जिल्ह्याशी निगडीत विविध पैलूंची ओळख होईल व प्राथमिक माहिती उपलब्ध होईल. या पुस्तकातील लेख वाचकांच्या पसंतीस उतरतील असा विश्वास वाटतो!

**डॉ. सुनेत्रा ढेरे** (*sunetradhere@gmail.com*)
**डॉ. विजयकुमार कुनुरे** (*kunurevb.dc@gmail.com*)

**संपादक परिचय**



लेफ्ट. डॉ. सुनेत्रा ढेरे या सध्या भौतिकशास्त्र विषयाच्या सहायक प्राध्यापिका म्हणून श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड येथे गेली १० वर्षे कार्यरत आहेत. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या समन्वयक व ५८ महाराष्ट्र बटालियनसाठी असोसिएट एन. सी. सी. ऑफिसर म्हणूनही त्या जबाबदारी सांभाळत आहेत. पदार्थविज्ञान हे त्यांचे संशोधनक्षेत्र असून त्यांचे शोधनिबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. तसेच २०१५ मध्ये त्यांनी सावित्रीबाई फुले स्मृती-विशेषांकाचे संपादन केले होते.



डॉ. विजयकुमार कुनुरे हे सहयोगी प्राध्यापक या पदावर श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड येथे कार्यरत असून ३३ वर्षे वनस्पतीशास्त्र विभागात अध्यापनाचे कार्य करत आहेत आणि सध्या त्यांच्याकडे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदाची जबाबदारीही सुपूर्द करण्यात आली आहे. वर्ष २०२० मध्ये त्यांनी औषधी वनस्पती या विषयात संशोधन करून पी.एच. डी. पदवी प्राप्त केली आहे. मुंबई विद्यापीठाचे तीन संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत व अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

**TABLE OF CONTENT**


| Sr. No. | Book Chapter and Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1. | जैवविविधता आणि संवर्धनाची गरज<br>**रुचिता चंद्रकांत राणे** | 1 – 4 |
| 2. | देवगड तालुक्यातील जैवविविधता आणि त्याचे संवर्धन<br>**प्रिया प्रताप खवळे** | 5 – 8 |
| 3. | तारामुंबरी - मीठमुंबरी येथील कांदळवनातील जैवविविधता<br>**गुरुप्रसाद घाडी** | 9 – 19 |
| 4. | देवराई: एक परिसंस्था<br>**नागेश शरद दप्तरदार** | 20 – 22 |
| 5. | पक्षी येती अमुच्या घरा...<br>**भाग्यश्री कृष्णा परब** | 23 – 27 |
| 6. | सिंधुदुर्गातील भुंगेऱ्यांची विविधता व महत्त्व<br>**एन. आर. हेदुळकर** | 28 – 30 |
| 7. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपारिक मच्छीमारी: समस्या आणि उपाययोजना<br>**सुखदा मंगेश जांबळे** | 31 – 34 |
| 8. | गाबीत समाज: सांस्कृतिक आणि सामरीक परंपरा<br>**प्रिती प्रथमेश सारंग** | 35 – 39 |
| 9. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सण-परंपरा वारश्याचे वेगळेपण<br>**सुमेधा नाईक** | 40 – 45 |
| 10. | सिंधुदुर्गमधील लोककला: दशावतार<br>**धनश्री संजय राणे** | 46 – 48 |
| 11. | देवगडमधील कापडखेळे: एक प्रयोगरूप लोककला<br>**हेमश्री किशोर चिटणीस** | 49 – 53 |
| 12. | सिंधुदुर्ग: प्रेक्षणीय स्थळांचा खजिना<br>**मुग्धा तन्मय जोशी** | 54 – 56 |
| 13. | कातळशिल्प: एक अनाकलनीय गूढ<br>**योगेश विठ्ठल राणे** | 57 – 62 |
| 14. | थिबा राजा आणि वाघोटण – देवगड येथील वास्तव्याचा एक न उलगडलेला पैलू<br>**दक्षता सावंत** | 63 – 67 |

| | | |
|---|---|---|
| 15. | सिंधुदुर्गमधील वारसा पर्यटन<br>**संदीप शिवराम तेली** | 68 – 72 |
| 16. | सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात कृषी पर्यटनाची महत्वाची भूमिका<br>**अमोल सुधाकर तेली** | 73 – 76 |
| 17. | कविलगाव, कुडाळ येथील सिंधुदुर्गातील शिर्डी<br>**शामली तारी** | 77 – 80 |
| 18. | कोकणातील दुर्लक्षित पारंपरिक कला – सावंतवाडी येथील लाकडी खेळणी उद्योग<br>**प्रियांका देविदास कर्पे, सायली दीपक अमृतसागर** | 81 – 84 |
| 19. | बुलंद सिंधुदुर्ग ऐतिहासिक आणि पर्यटन स्थळ – एक चिकित्सक अभ्यास<br>**एम. आर. खोत** | 85 – 90 |
| 20. | सिंधुदुर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व<br>**श्रीकांत विक्रांत सिरसाठे, लक्ष्मण शामराव सुरवसे** | 91 – 94 |
| 21. | किल्ले सिंधुदुर्ग<br>**पूजा कमलाकर अणावकर** | 95 – 96 |
| 22. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडचा समृद्ध वारसा<br>**स्वाती शांताराम कर्णिक** | 97 – 100 |
| 23. | देवगड महाविद्यालयातील विज्ञान शाखा : सिंधुदुर्गचा वैज्ञानिक वारसा<br>**चंद्रकांत दत्तात्रय भेंकी** | 101 – 103 |
| 24. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुक ऑक्टोबर २०२३: एक अभ्यास<br>**संजय भास्कर तायडे** | 104 – 105 |
| 25. | HISTORICAL AND GEOGRAPHICAL OUTLOOK OF SINDHUDURG DISTRICT<br>**Abhishek R. Mestri** | 106 – 108 |
| 26. | LATERITE SOIL IN SINDHUDURG<br>**Samsher Daud Khan** | 109 – 111 |
| 27. | ALPHONSO MANGO: A DELIGHT FROM THE SINDHUDURG DISTRICT<br>**Sana Abdulgani Pirkhan** | 112 – 115 |
| 28. | SINDHUDURG MANGROVES: PRESENT DAY SCENARIO<br>**Mangesh N. Jamble** | 116 – 117 |
| 29. | MANGROVE FOREST: IMPORTANCE, CONSERVATION AND MANAGEMENT<br>**Sayali Shankar Kerkar, Vijaykumar Kunure** | 118 – 121 |

| | | |
|---|---|---|
| 30. | ORCHIDS OF SINDHUDURG: EXPLORING HABITATS AND ECONOMIC SIGNIFICANCE<br>**Manohar Suhas Teli** | 122 – 127 |
| 31. | WILD VEGETABLES: GREEN HERITAGE OF DEVGAD<br>**Nitin M. Valanju** | 128 – 131 |
| 32. | *RAPAN*: THE RICH TAPESTRY OF TRADITIONAL FISHING IN DEVGAD TEHSIL OF SINDHUDURG<br>**Balkrishna Dattu Teurwadkar** | 132 – 137 |
| 33. | VARIOUS TYPES OF FLOURS IN KONKAN REGION<br>**Tanvi Vaibhav Ghare** | 138 – 141 |
| 34. | MALVANI CUISINE: A CULTURAL HERITAGE OF SINDHUDURG DISTRICT<br>**Smita Survase** | 142 – 144 |
| 35. | CULTURAL HERITAGE IN SINDHUDURG*: GANESH CHATURTHI* THE TRADITION OF FAMILY REUNION<br>**Manisha Mujumdar** | 145 – 147 |
| 36. | HERITAGE OF FOLK CULTURE IN *LOKVED*<br>**Prashant Arjun Raut** | 148 – 151 |
| 37. | GANJIFA CARDS: AN ANCIENT ART KEPT ALIVE IN SAWANTWADI<br>**Ankita Vitthal Bandekar** | 152 – 154 |

# जैवविविधता आणि संवर्धनाची गरज

**रुचिता चंद्रकांत राणे**

शंकर नारायण कला व वाणिज्य महाविदयालय, भाईंदर

Corresponding author E-mail: ruchita0102@gmail.com

**प्रस्तावना**

मानवी जगतापासून सुरु झालेल्या निसर्गचक्राचे अविरत अस्तित्व संपूर्ण मानवी जगजीवनासाठी अत्यंत महत्वाचे आहे. हजारो पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाची उत्पत्ती संपूर्ण विश्वासाठी मोलाची आहे. हजारो वर्षापासून पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीव प्राण्यांनी विविध प्रकारच्या मानवी गरजा भागविल्या आहेत आणि आज ही भागविल्या जात आहेत आणि यापुढेही भागविल्या जातील. सजीव प्राण्यांची ही विविधता एक आधारप्रणाली बनवते जी प्रत्येक संस्कृतीद्वारे त्याच्या विकासासाठी वापरली जाते. निसर्ग विविधतेने नटलेला आहे. या विविधतेत प्रत्येक सजीव घटकांचे एकमेकांशी परस्परसंबंध साखळीयोगे अतूट आहेत. एकमेकांत गुंतले आहेत. काळानुरुप निसर्गात अनेक बदल होत गेले. विज्ञानयुगाने निसर्गाचा चेहरा मोहराच बदलला. विज्ञानाने शतकानुशतकातल्या निसर्गाच्या भिन्नतेचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला. वनस्पती आणि प्राणी या निसर्गाच्या अत्यंत महत्वपूर्ण घटकांचे दोन गटात वर्गीकरण झाले. या वर्गीकरणातील माहितीमुळे पृथ्वीच्या जैविक संपत्तीचा मानवी कल्याणासाठी उपयोग होण्यास मदत झाली आणि ते विकासाच्या प्रक्रियेस अविभाज्य घटक ठरले. यामध्ये जैविक संपत्तीचा वापर हा मानवी आरोग्याची काळली, चांगली पिके-उत्पादने, आणि इतर औदयोगिक विकासासाठी कच्चा माल म्हणून करण्यात आला, ज्यामुळे विकसित जगाचे जीवनमान उंचावलेले दिसत आहे. विज्ञानाने विश्वाचे रुपडे पालटले हे जरी खरी असले तरी, आधुनिक काळात निसर्गाच्या क्रूरपणे उपभोग घेणारा उपभोक्तावादी समाज ही उदयास आला, ज्याने निसर्गाच्या जैविक स्त्रोतावर आधारित असलेल्या विविधतेवर नकारात्मक प्रभाव निर्माण केला. पृथ्वीवरील जीवनाची विविधता इतकी महान आहे कि त्याची योग्य काळजी घेतली, उपयोग वापर केला तर पुढील उत्पत्तीसाठी निसर्गाचा हा अनमोल ठेवा बहुमूल्य ठरेल.

**जैवविविधता महत्व**

जैवविविधता म्हणजे काय ? तिचे सजीवांशी महत्व काय ? तिच्या गरजेची प्राथमिकता का ? अशा अनेक निर्माण होणाऱ्या प्रश्नांमध्ये उत्तराचे गुढ निर्माण झालेले असते आणि यातूनच निर्माण झालेल्या प्रश्नांचे धागे हळूवारपणे मोकळी होत जाते.

पृथ्वीवरील सजीवांमध्ये असलेली विविधता म्हणजे जैवविविधता. या पृथ्वीवर वनस्पती, प्राणी, कीटक, जीव-जंतू, पक्षी यांचे वास्तव असंख्य, अगणित आहे. या प्रत्येकाच्या हजारो प्रजाती आहेत, अनेक सजीवांच्या नवनवीन प्रजाती सापडत आहेत आणि त्यावर वैज्ञानिक संशोधन ही चालू आहे. निसर्गामध्ये प्रत्येक सजीवांचे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि प्रत्येक जीवन अमूल्य आहे. निसर्गासाठी आपली जबाबदारी पार पाडणे हे प्रत्येक सजीवांची महत्वपूर्ण जबाबदारी असते. पर्यावरणातील कार्यप्रणाली सुरळित राखण्यासाठी आणि मानव जातीसह सर्व जीव प्रजातींचे दीर्घकालीन अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी जैवविविधतेची कार्य प्रणाली समजून घेणे आणि तिचे जतन करणे आवश्यक आहे.

जैवविविधचे पर्यावरण, आर्थिक, सामाजिक, नैतिक, वैज्ञानिक यादृष्टीकोनातून मोलाचे महत्त्व आहे. जैवविविधता ही पर्यावरणाचे संतुलन आणि कार्यप्रणाली राखण्यात मोलाची भूमिका बजावते. प्रत्येक प्रत्येक प्रजाती, तिचा आकार किंवा विपुलता विचारात न घेता, परिसंस्थेतील परस्परसंवादाच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात योगदान देते. जैवविविधता ही इकोसिस्टमची स्थिरता आणि उत्पादकता वाढवते ज्यामुळे पर्यावरणात होणारे बदल आणि वातावरणात होणारा त्रास सहन करण्यास अधिक सक्षम बनवते. हे पोषक सायकलिंग, परागण, बियाणे पसरवणे, किटक नियंत्रण आणि इतर महत्त्वपूर्ण पर्यावरणीय प्रक्रियांचे नियमन करते. तसेच जैवविविधता संपूर्ण विश्वातील मानवी जातीसाठी आर्थिक संपत्ती आणि उपजीविकेचा एक मौल्यवान स्त्रोत आहे. जैवविविधता शेती, वनीकरण,

मत्स्यपालन, औषधनिर्माण आणि पर्यटन यासारखे उदयोग विविध वनस्पती आणि प्राणी प्रजातींवर अवलंबून आहेत, जैवविविधता अन्न, लाकूड, ततूं, औषध, पीक सुधारणा आणि औदयोगिक वापरासाठी अनुवंशिक सामुग्री यासारखी आवश्यक संसाधने प्रदान करते. जैवविविधतून व्यक्तिला सौंदर्याचा आनंद, प्रेरणा आध्यात्मिक पूर्तता प्रदान करते. जीवनाची गुणवत्ता वाढवते. त्याचप्रमाणे प्रत्येक जातीला अस्तित्वाचा जन्मजात अधिकार आहे आणि जैवविविधता जतन करणे हे नैतिक बंधन आहे. जैवविविधतेचे नैतिक महत्त्व प्रजाती नष्ट होण्यापासून रोखण्याच्या आणि भविष्यातील पिढयांच्या फायदयासाठी इकोसिस्टमची अखंडता राखण्याच्या गरजेवर भर देते. जैवविविधता वैज्ञानिक संशोधन आणि शोध यासाठीचा खजिना आहे.

**जैवविविधता म्हणजे काय?**

'जैवविविधता' हा शब्द निसर्गातील प्रजाती विविधता आणि प्रजातींच्या समृधतेच्या अधिक विशिष्ट संकल्पना समाविष्ट करण्यासाठी आणि पुनर्स्थित करण्यासाठी वापरला जातो. जीवशास्त्रज्ञांच्या मते जैवविविधता ही दिलेल्या प्रदेशातील जीन्स, प्रजाती आणि इकोसिस्टमची संपुर्णता होय. शास्त्रज्ञांच्या मते, जैवविविधता ही वर्गीकरणात्मक विविधता (प्रजाती विविधता), पर्यावरणीय विविधता (इकोसिस्टम विविधता), कथात्मक विविधता (अनुवंशिक आणि आण्विक) विविधतेपासून उद्भवणारी आणि कार्यात्मक विविधता आयामांची व्यापक समज प्रदान करते. तसेच जैवविविधता ही सर्व स्त्रोतांमधील सजीव प्राण्यामधील परिवर्तनशीलतेचा समावेश करते.

विश्वाच्या पर्यावरणातील कार्यप्रणाली सुरळीत राखण्यासाठी आणि मानवासह सर्व प्रजातींचे दीर्घकालीन अस्तित्त्व सुनिश्चित करण्यासाठी जैवविविधता समजून घेऊन तिचे संरक्षण, संवर्धन होणे अत्यंत आवश्यक आहे. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी तीन बाबी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत:

1) प्रजातींचे संवर्धन 2) परिसंस्थेचे व्यवस्थापन 3) पर्यावरणीय प्रक्रिया पुनसंचयित करणे.

**1) प्रजातींचे संवर्धन:**

जैवविविधतेचे पहिले महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे वैयक्तिक प्रजातींचे संरक्षण आणि संवर्धन करणे. नामशेष होणाऱ्या प्रजाती आणि नवीन निर्माण होणाऱ्या प्रजातींची ओळख करुन त्यांचे मूल्यांकन करणे व प्रजातींचा नाश होण्यापासून संरक्षण करुन उपाययोजना करणे यांचा समावेश यामध्ये केला जातो. संवर्धनातून अधिवासाचे संरक्षण, बंदिस्त प्रजनन, पुनर्परिचय उपक्रम आणि विशिष्ट प्रजातींच्या संरक्षणासाठी संरक्षित क्षेत्रांची स्थापना यांचा समावेश असतो.

**2) परिसंस्थेचे व्यवस्थापन:**

जैवविविधता संवर्धन हे परिसंस्थाचे आरोग्य आणि कार्यक्षमतेचे व्यवस्थापन आणि देखरेख करण्यावर देखरेख लक्ष केंद्रित करीत असते. अधिवासांचे संरक्षण, प्रमुख प्रजातींच्या लोकसंख्येचे व्यवस्थापन करणे, आवश्यक प्रजातीवर नियंत्रण करणे यावर भर देण्यात आलेला दिसून येतो.

**3) पर्यावरणीय प्रक्रिया पुनसंचयित करणे:**

परिसंस्थेच्या पर्यावरणीय प्रक्रिया यामध्ये पोषक वातावरणीय चक्र, परागकण, बियाणे पसरवणे आणि शिकारी आणि शिकार संबंध यासारख्या नैसर्गिक प्रक्रियांची पुनर्स्थापना करण्याचा उद्देश या क्रियेत केला जातो. तसेच इकोलॉजिकल रिस्टोरेशन प्रयोगात मूळ प्रजातींच्या पुन्हा परिचय खराब झालेल्या अधिवासांचे पुनर्वसन आणि संवांच्या पुनप्राप्तीस प्रोत्साहन देणे यांचा समावेश या क्रियेत केला जातो.

जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी धोरणांची अंमलबजावणी आवश्यक आहे. प्रजातींचे संरक्षण, अधिवास संरक्षण आणि शाश्वत संसाधन व्यवस्थापनाच्या विविध पैलूंना संबोधित करते. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी खालील काही प्रमुख धोरणे किंवा उपाययोजना यांचा अवलंब करण्यात यावा.

1) **कृषिविषयक पशुधन प्राणी, बियाणे आणि इमारती, लाकूड वनस्पतींचे संरक्षणांची आवश्यकता:** कृषीसंबंधित प्राणी, पशुधनाच्या जाती आणि आर्थिकदृष्टया महत्त्वाच्या लाकूड वनस्पती प्रजातींचे संरक्षण, बिजारोपण आणि संवर्धन

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

करणे महत्वाचे आहे. या प्रजाती अन्न सुरक्षा, उपजीविका अर्थव्यवस्थेत योगदान देतात. संवर्धनाच्या या क्रियेतून लोकसंख्येतील अनुवंशिक विविधता टिकवून ठेवण्यासाठी मोठे सहकार्य प्राप्त होते.

2) **नाशप्राय प्रजातींची लोकसंख्येचे पुनर्संचयित करणे:** पर्यावरण संतुलन आणि जैवविविधता टिकवून राखण्यात नाशप्राय किंवा लुप्तप्राय प्रजातीची भूमिका महत्त्वाची असते. विविध प्रजाती अधिवास पुनसंचयित करणे. बंदिवासात प्रजनन कार्यक्रम, जंगलात पुन्हा प्रवेश आणि शिकार व अधिवासाचा नाश यासारख्या धोक्यांपासून संरक्षण करणे आणि यातूनच त्यांची लोकसंख्या पुनर्सचयित करण्यासाठी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. नाश पावत चालेल्या प्रजातीचां पुनर्संचयन केल्याने इकोसिस्टम स्थिरता राहण्यास आणि गंभीर अनुवंशिक संसाधनांचे नुकसान टाळण्यास मदत होते.

3) **नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर:** नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षमतेने आणि जबाबदारीने वापर केला पाहिजे. यामध्ये कृषी, वनीकरण, मत्स्यपालन यांच्या नव-प्रजातींचा अवलंब करणे आवश्यक आहे. संद्रिय व रासायनिक खत मुक्त शेती, कृषी वनीकरण आणि योग्य मासेमारीच्या पध्दती यासारख्या तंत्रांची अंमलबजावणी केल्याने असंख्य मानवी गरजा पूर्ण करताना जैवविविधतेवर होणारा नकारात्मक परिणाम कमी होण्यास मदत होऊ शकते.

4) **बेसूमार जंगलतोडीचे प्रमाण कमी करणे:** जंगलतोड हा जैवविविधतेच्या हानीचा महत्त्वाचा घटक आहे. जंगलतोड ही परिसंस्थेत अडथळा निर्माण करते, प्रजातींचा अधिवास नष्ट करते आणि धोका निर्माण करते. संवर्धन धोरणांनी जंगलांच्या संरक्षणास प्राधान्य दिले पाहिजे आणि अपव्यय, धोका  निर्माण करणाऱ्या घटकांवर कठोर नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जंगलांना आवश्यक झाडांची रुजवण करणे, शाश्वत जमीनीच्या वापर पध्दतीचा अवलंब, स्थानिक समुदायांसाठी उत्पन्नाच्या पर्यायी स्त्रोतांना प्रोत्साहन देऊन जंगलतोड थांबवणे अति आवश्यक आहे.

5) **शिकार आणि बेकायदेशीर वन्यजीव व्यापारावर बंदी घालणे:** शिकार करणे आणि अवैध वन्यजीव व्यापारामुळे जैवविविधतेला मोठा धोका निर्माण झालेला आहे. सरकारमार्फत तसेच संरक्षण संस्थांकडून कठोर नियम अमलात आणले पाहिजे, वन्यजीव गुन्हयांसाठी पाळत ठेवणे आणि दंड आकारणे आणि वन्यजीवांच्या महत्त्वाबद्दल जागरुकता वाढवणे आवश्यक आहे. शिकारीला आळा घालणे, प्राणी- वनस्पती यांच्या प्रजातींचे संरक्षण करणे, अवैध वन्यजीव उत्पादनांची मागणी कमी करण्यासाठी सरकारमार्फत प्रयत्न केले जावे आवश्यक आहे.

6) **समाजात जनजागृतीचे वातावरण वाढविणे:** जैवविविधतेचे मूल्य आणि महत्त्व याबद्दल जनजागृती करणे तिच्या संवर्धनासाठी महत्त्वाचे आहे. शैक्षणिक मोहीम, उपक्रम, पथनाटय, सामूदायिक व सांस्कृतिक कार्यक्रम, आणि पर्यावरणीय उपक्रम समाजाला जैवविविधतेचे फायदे, परिसंस्थेवर त्याचा होणारा परिणाम, जैवविविधतेचे संवर्धन का आवश्यक आहे, त्यांचे जतन का करावे हे या उपक्रमांतून समजून देण्यात त्यांची मदत होऊ शकते. यामुळे संवर्धनाच्या प्रयत्नांच्या यशस्वितेसाठी जनतेचा पांठिबा आणि सहभाग मिळणे महत्त्वाचे आहे.

7) **सहयोग आणि भागीदारांना प्रोत्साहन देणे:** जैवविविधतेच्या संवर्धनासाठी सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था, स्थानिक समुदाय, संशोधक आणि संवर्धन गट यांच्यातील सहकार्य महत्त्वाचे असते. भागीदारी आणि नेटवर्क स्थापित केल्याने ज्ञान, संसाधने आणि कौशल्य सामायिक करण्यात मदत होते. ज्यामुळे अधिक प्रभावी संवर्धन धोरणे तयार होतात. भागधारकांमधील सहकार्य समन्वयित प्रयत्नांना चालना देते, संवर्धन नियोजन वाढवते आणि सर्वोत्तम पध्दतींची देवानघेवाण सुलभ करते.

या जैवविविध संवर्धन धोरणांची अंमलबजावणी करुन आपण पृथ्वीच्या जैवविविधतेच्या संरक्षण आणि संवर्धनात योगदान देऊ शकतो. त्याचप्रमाणे जैवविविधतेचे संवर्धनासाठी खालील प्रकारे उपाययोजनाही करता येतील.

1) दुर्मीळ जातीच्या सजीवांचे संरक्षण व जतन केले पाहिजे.
2) राष्ट्रीय उदयाने व अभयारण्ये यांची निर्मिती करणे गरजेचे आहे.
3) अधिक प्रमाणात सजीवांचे वास्तव्य असणाऱ्या क्षेत्राला ‘राखीव जैवविभाग क्षेत्र घोषित करणे.’

4) दुर्मीळ होत जाणाऱ्या प्रजातींच्या संवर्धनासाठी प्रकल्प, उपक्रम सुरु करणे.
5) प्राणी व वनस्पतींचे संवर्धन करणे.
6) पर्यावरणासंबंधी बंधने, नियमांचे काटेकोरपणे पालन करणे.

अशा प्रकारच्या उपाययोजना करुन जैवविविधतेचे संवर्धन अधिक योग्य प्रकारे करता येईल.

निसर्गातील सर्वच घटक एकमेकांवर अवलंबून असतात. शाकाहारी, मांसाहार प्राणी, या प्राण्यांवर जगणारे अन्य जीवघटक, जीवजंतू हे सर्वच एका अन्नसाखळीचे घटक परस्परांवलबित आहेत. प्रत्येकाचे सृष्टीत टिकून राहणे महत्त्वाचे आहे. या जीवनसृष्टीमुळे मानवजातीचे अस्तित्व ही टिकून आहे म्हणून निसर्गातील जैवविविधतेची काळजी, संवर्धन करणे आवश्यक आहे.

जैव विविधता हॉटस्पॉट म्हणून मान्यता पावलेल्या पश्चिम घाटामधील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक ठिकाणे आज मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आहेत. पर्यटन, जंगलांवरील अतिक्रमण, औद्योगिकीकरण इ. च्या विळख्यातून जैव विविधता टिकवून ठेवण्यासाठी समाजतील प्रत्येक घटकापर्यंत जैव विविधतेचे महत्त्व पोहचण्याचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. आंबोली येथील गोड्या पाण्यातील मत्स्य प्रजाती 'स्चीस्टुरा हिरण्यकेशी' आणि दोडामार्ग येथील गोड्या पाण्यातील दलदलीची वनस्पती परिसंस्था 'मायरिस्टिका स्वॅम्प' यांना तर जागतिक स्तरावरील मान्यता मिळाली आहे. या जैव वैविध्याचा वारसा जतन होण्यासाठी त्यांचे संवर्धन व्हावे या दृष्टीने वैयक्तिक ते धोरणात्मक स्तरावर प्रयत्न झाले पाहिजेत.

# देवगड तालुक्यातील जैवविविधता आणि त्याचे संवर्धन

**प्रिया प्रताप खवळे**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: khavalepp.dc@gmail.com

**प्रस्तावना**

देवगड तालुका हा १६.३७५ नॉर्थ आणि ७३.३८ अंश ईस्ट इतके कोकणातील एक निसर्गरम्य ठिकाण आहे. या तालुक्यात जैवविविधता विपुल प्रमाणात आहे. या जैवविविधतेचा अभ्यास मी प्रश्नावलीच्या साहाय्याने केला असता असे लक्षात आले की, देवगड तालुक्यातील जैवविविधता सर्व सजीवांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. त्यामुळे या जैवविविधतेचे संवर्धन होणे सर्व सजीवांच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल. देवगड हा भारतातील महाराष्ट्र राज्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक तालुका आहे. तालुक्यात ९० गावे आहेत. तालुक्याचे मुख्यालय देवगड येथे आहे. हा तालुका अरबी समुद्रातील महाराष्ट्र राज्याचा कोकण किनारपट्टीवर मुंबईच्या दक्षिणेस वसलेला आहे. देवगडमध्ये किल्ल्यावर सन १९१५ साली बांधलेले एक दीपगृह आहे. देवगडचा पश्चिम भाग हा खालाटीच्या पट्ट्यात येतो. किनारपट्टीतील जमीन रेतीमिश्रित हलकी असून कसदार व चिकण आहे. त्यात नारळ व पोफळीची लागवड केलेली आहे. या तालुक्यात जांभा खडकयुक्त जमीन असून पाण्याचा निचरा होणारी जमीन असल्याने तेथे आंबा, फणस, काजू, कोकम यासारखी फळांची पिके घेतली जातात. यासोबतच विविध वनस्पती व प्राणी, पक्षी, कीटक यांना देवगड व देवगड परिसरातील माती, हवामान व पाणी पोषक असल्यामुळे या ठिकाणी जैवविविधता आढळते.

**व्याख्या**

1. जैवविविधता म्हणजे विविध प्राणी आणि वनस्पती यांची प्रजाती दरम्यान असणारी जनुकीय विविधता होय.
2. दोन वेगवेगळ्या प्रजातींमध्ये असणारी विविधता होय.
3. वस्ती स्थानातील व परिसरातील विविधता होय.

प्रत्येक प्राणी व वनस्पती यांना जगण्यासाठी आवश्यक अन्न व संसाधने निसर्गात उपलब्ध असतात. तसेच होणारे रोग व जखमा नैसगिकरित्या बऱ्या करण्याची क्षमता निसर्गात असते. पर्यावरणातील जैवविविधता मानवजातीला अनेक सेवा पुरवित असते. जैवविविधता हे जनुकीय प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी अशा परिसंस्थांचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती मिळविल्यानंतर सजीवांमधील विविध जाती परिसंस्थेत विविधता आढळून येते. परिसंस्थेमधील विविधता हे परिसंस्थेच्या निकोपणाचे एकक आहे.

**उद्दिष्टे**

1. देवगड तालुक्यातील जैवविविधतेचा अभ्यास करणे.
2. जैवविविधतेचे मानवी जीवनासाठीचे महत्त्व अभ्यासणे.
3. जैवविविधता व सजीव यांचा सहसंबंध अभ्यासणे.
4. जैवविविधतेचे परिणाम अभ्यासणे.
5. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे.

**संशोधन पद्धती**

1. प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी माहिती प्राथमिक आणि द्वितीय तथ्यांच्या आधारे संकलित केलेली आहे.
2. प्राथमिक तथ्य प्रश्नावलीचा वापर करून गोळा केली आहे तर द्वितीय तथ्य विविध संदर्भ, पुस्तके, संशोधन अहवाल, लेख, सरकारी अहवाल, इंटरनेट, वेबसाईट इत्यादीद्वारे गोळा केली आहे.

**माहितीचे विश्लेषण**

या शोधनिबंधासाठी देवगड तालुक्यातील जैवविविधता व संवर्धनासाठी सहा गावांतील माहिती गोळा केली. ती पुढीलप्रमाणे,

**१) गिर्ये:** या गावामध्ये बांबू, शिवण, साग इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. या झाडांचा नैसर्गिकदृष्ट्या विचार करता जमिनीचे संतुलन व मातीचा ऱ्हास होत नाही. तसेच या गावामध्ये पोपट, बगळे, घार, सुतार पक्षी, कोकीळ, कबुतर असे विविध पक्षी आढळतात. या गावामध्ये गांडूळ, चोपई, सरडा, कानेटी, घोण, घोरपड, मगर, झुरळ, पाल, साप इत्यादी सरपटणारे प्राणी आढळतात. तसेच या गावात सुरमई, शेंगाळा, पापलेट, खवळा, खेकडा, चिंगळे, म्हाकला असे विविध मासे आढळतात. तसेच गिर्ये या गावात नाकतोडा, मधमाशी, पिंगाणी, ढेकुण इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये टाकळा, शेवरे, करडू, इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात. गावामध्ये बिबटा, कोल्हा, वानर इत्यादी प्राणी आढळतात.

**२) किंजवडे:** या गावामध्ये तुळस, कडूनिंब, कोरफड इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. तुळशीपासून ऑक्सिजन निर्मिती होते. तसेच या गावामध्ये गरुड, घार, सुतार पक्षी, असे विविध पक्षी आढळतात. तसेच या गावात विविध प्रकारचे गोडे मासे आढळतात. सरपटोळी, साप, पाल, कांडर असे सरपटणारे प्राणी आढळतात. साप हे उंदरांना मारून अन्नधान्याचे रक्षण करतात. तसेच या गावात नाकतोडा, विंचू,काजवी, जळू इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये टाकळा, शेवरे, करडू, इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात. गावामध्ये बिबटा, कोल्हा, वानर, मांजर इत्यादी प्राणी आढळतात.

**३) नाडण:** या गावामध्ये माका, साग, शिवण इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. तसेच या गावामध्ये गरुड, घार, सुतार पक्षी, बगळा असे विविध पक्षी आढळतात. बगळे गुरांच्या अंगावरील गोचड्या खातात. तसेच या गावात खेकडा आणि विविध प्रकारचे गोडे मासे आढळतात. सरपटोळी, साप, पाल, गोगलगाय, पाणघोणस असे सरपटणारे प्राणी आढळतात. तसेच या गावात रातकिडा, विंचू, काजवी, जळू, घोंगा, मधमाशी, मुंगी इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये हरणा, शेवरे, फोडशी, काटले, तिरडा इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात. हरणा व तिरडा धार्मिक कामासाठी उपयोग होतो. गावामध्ये बिबटा, कोल्हा, वानर इत्यादी प्राणी आढळतात.

**४) जामसंडे:** या गावामध्ये शेवगा, गरुडवेल, करवंद, आवळा, मिरी इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. गरुडवेलचा उपयोग कावीळ या रोगावर उपचार करण्यासाठी होतो. तसेच या गावामध्ये भारद्वाज, रान कोंबडी, लावे, टिटवी असे विविध पक्षी आढळतात. तसेच या गावात तांबोशी, शेतके, कानय, शेंगटी, मुशी विविध प्रकारचे मासे आढळतात. मुशीपासून तेल काढले जाते. फुरसे, साप, पाल, गोगलगाय, घोणस, अजगर, मण्यार, गांडूळ असे सरपटणारे प्राणी आढळतात. गांडूळपासून जमीन भुसभुशीत होते. तसेच या गावात कुंभारमाशी, नाकतोडा इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये अळंबी, चिनी, करांदे, कारटे इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात.

**५) वाडा:** या गावामध्ये केळी, पपई, पिंपळ, वड इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. तसेच या गावामध्ये घुबड, घार, हॉर्न बिल, कोंबडी, असे विविध पक्षी आढळतात. तसेच या गावात बेला, टिकणे, पालु, विविध प्रकारचे मासे आढळतात. गुंज, साप, पाल, गोगलगाय असे सरपटणारे प्राणी आढळतात. तसेच या गावात विंचू, काजवी, मधमाशी, काळी मुंगी इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये हरणा, शेवरे, फोडशी, काटले, तिरडा इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात. गावामध्ये खवळा मांजर इत्यादी प्राणी आढळतात.

**६) मोर्वे:** या गावामध्ये केवडा, गुलाब, मोगरा, शिवण, बांबू इत्यादी प्रकारची झाडे आढळतात. तसेच या गावामध्ये घुबड, घार, पोपट, लांडोर असे विविध पक्षी तसेच बांगडा, सौंदाळे, मेच, कोळंबी असे विविध प्रकारचे मासे आढळतात. माशांपासून खतनिर्मिती होते. मगर, गांडूळ, सरपटोळी असे सरपटणारे प्राणी आढळतात. तसेच या गावात नाकतोडा, काजवी, मधमाशी, कोळी इत्यादी प्रकारचे कीटक आढळतात. गावामध्ये करवंद, तोरणं, काटले, तिरडा इत्यादी प्रकारच्या पावसाळी वनस्पती आढळतात. गावामध्ये साळींदर, घोरपड, बिबट्या, कोल्हा इत्यादी प्राणी आढळतात.

**टीप:** देवगड तालुक्यामध्ये साग, शिवण, पिवळी फुलपाखरे, सुरण, घोरपड, मोर, डुक्कर, फोडशी, गरुड वेल अशी विविध जैवविविधता आढळते.




**जैवविविधतेचे फायदे**

**१) मृदेचे संवर्धन व पोषक द्रव्यांचा पुनर्वापर**

मृदेतून वनस्पतींना पाणी व पोषक द्रव्ये मिळतात व त्यातून अन्ननिर्मिती होते. जमिनीत असलेल्या विविध सुक्ष्मजीव हे जमिनीतील पोषक द्रव्यांचा वनस्पतींना वापरता येतील अशा प्रकारात रुपांतर करून अन्न निर्मितीस मदत करतात तसेच जमिनीत सुपीकता टिकवण्यास त्यांचा मोलाचा वाटा असतो. परंतु अलीकडे होणाऱ्या अतिरासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वापर यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे मातीचे परीक्षण करून आवश्यक रसायनांचा वापर करणे रास्त ठरेल.

**२) स्वच्छ व खेळती हवा**

प्राण्यांच्या श्वसन क्रियेतून बाहेर पडणारा कार्बन डायऑक्साईड हा वनस्पतींद्वारे शोषला जातो. तसेच प्रकाश संश्लेषणातून तयार झालेला ऑक्सिजन प्राण्यांकडून वापरला जातो अशा पकारे हवामानाचा समतोल साधला आहे त्यामुळे वनस्पतींचे रक्षण करणे म्हणजे स्वतःचे रक्षण केल्याप्रमाणे आहे.

**३) अन्न, पाणी, औषधे**

आपल्याला आवश्यक अन्नाची गरज विविध पिके, भाज्या व फळझाडे यांच्याकडून भागवली जाते. जलचक्राच्या विविध स्रोतातून आलेल्या पाण्याचे जात व संवर्धन जैवविविधतेच्या माध्यमातून होते. सेंद्रिय खाद्य अन्न व विविध नैसर्गिक आयुर्वेदिक वनस्पतींचा वापर करून निरोगी व आनंदी जीवन व्यतीत करू शकतो.

**४) नैसर्गिक व सांस्कृतिक मूल्ये**

आपले विविध सण हे विशिष्ट ऋतूतील नैसर्गिक घटनांशी संबंधित असतात. तसेच त्यावेळी केले जाणारे खाद्यपदार्थ हे शरीराला आवश्यक असणाऱ्या गरजांना अनुरूप असतात. निसर्ग हा स्वतःच्या गतीत चालत असतो, तो माणसाला परिस्थितीनुरूप स्वतःमध्ये आवश्यक ते बदल घडवण्यासाठी प्रेरणा देतो आणि त्यातूनच आपल्याला जगण्याची मुल्ये शिकवितो.

**५) पर्यटन व संशोधन**

जैवविविधतेचे महत्त्व पाहता अनेक जैवविविधतेचे रक्षण करणारे राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, जीवावरण राखीव क्षेत्रे व संरक्षित जंगले यांचा उपयोग पर्यटनासाठी करता येतो. निसर्गाच्या सान्निध्यात आल्यावर मानवाच्या शरीराची व मनाची पुनर्भरणाची क्रिया अधिक गतीने होऊन मन प्रसन्न होते व शरीराला उर्जा प्राप्त होते. अशी ठिकाणे जैवविविधतेचा अभ्यास संशोधन करणाऱ्यांसाठी उपयुक्त असतात.

**६) स्वतःचे अस्तित्व टिकविणे**

जैवविविधतेचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे स्वतःचे अस्तित्व टिकविणे होय. कोणताही प्राणी असो किंवा वनस्पती हा विशिष्ट वातावरणात, वस्तीस्थानात राहू शकतो. त्यामध्ये होणारे बदल जुळवुन घेण्यासाठी जनुकीय बदल होणे आवश्यक असतो. परंतु ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे त्यामुळे अस्तित्व टिकविण्यासाठी विविध जातींचे एकमेकांवरील अवलंबित्व हे अपरिहार्य आहे. जर एखादी प्रजाती नष्ट झाली तर अन्नसाखळी तुटते. त्यामुळे अस्तित्व टिकवणे अवघड होऊन अनेक प्रजाती नामशेष होतात. म्हणूनच मानवजातीचे अस्तित्व टिकविण्यासाठी जैवविविधतेचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

**७) शाश्वत विकास व पर्यावरण**

मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाची पुनर्भरणाची क्षमता कमी होत चालली आहे. काही प्रजातींचा आपल्याशी असलेला संबंध हा प्रत्यक्ष तर काहींचा अप्रत्यक्ष. तसेच काहींचा फायदा तर काही प्रजातींचा तोटा असतो. तर काहींवर कोणताच परिणाम होत नाही. निसर्गातील प्रत्येक घटकाचे स्थान हे कोणतेतरी कार्य करण्यासाठीच असते. उदा. मातीतील गांडूळाचा मानवाला प्रत्यक्ष कोणताच फायदा नाही परंतु जमीन सुपीक करून तो आपल्याला अन्न मिळवून देण्यासाठी अप्रत्यक्षपणे मदत करतो. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखून शाश्वत विकास कसा होईल त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**

1. देवगड तालुक्यातील विविध गावांमध्ये जैवविविधता आढळून येते.
2. पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाडे लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी, फुलपाखरे बागडावीत पण सध्याच्या परिस्थितीत बांधकामाचे प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे आजुबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोभिवंत झाडे लावली जातात जी की मूळची भारतीय नाहीत त्यामुळे फुलपाखरांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहे.
3. देवगड तालुक्यात विविध जातीचे प्राणी पक्षी वनस्पती आढळून येतात.
4. जंगलतोडीमुळे प्राणी आणि पक्ष्यांचा अधिवास नष्ट होत चालला आहे.
5. समाजातील बहुतांशी लोकांमध्ये पर्यावरणविषयक कायद्यांविषयी माहितीचा अभाव आहे.
6. प्लॅस्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून आला.

**उपाययोजना**

1. ज्या दुर्मिळ जातींचे सजीव आहेत त्या सजीवांचे संरक्षण केले पाहिजे.
2. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यांची निर्मिती करणे आवश्यक आहे.
3. ज्या भागात जास्त प्रमाणात सजीव आहेत तो भाग राखीव जैवभाग म्हणून घोषित करणे.
4. ज्या जाती दुर्मिळ होत आहेत त्या प्रजातींच्या संवर्धनासाठी खास प्रकल्प सुरु करणे.
5. समाजातील लोकांना पर्यावरण रक्षणासंबंधी असणारे कायदे माहित नसतात ते माहित करून देणे गरजेचे आहे.
6. ग्रामीण भागात जरी मुलांची नाळ निसर्गाशी जोडली असली तरी त्यांना योग्य मार्गदर्शन आणि माहिती देणे तितकेच महत्त्वाचे आहे.
7. तालुक्यात आढळणाऱ्या वन्य वनस्पती पक्षी, प्राणी, कीटक, फुलपाखरे, मासे यांचे निरीक्षण केले पाहिजे, त्यात त्यांना निसर्गाविषयी संपूर्ण माहिती दिली पाहिजे.

**संदर्भ**


1. नवले (२०२०). जैवविविधतेचे संवर्धन (विज्ञान वाटा)
2. पाटील (२००९). देवगड विजयदुर्ग परिसर गाईड स्नेहल एजन्सीज देवगड.
3. https://mr.m.wikipidea.org

# तारामुंबरी - मीठमुंबरी येथील कांदळवनातील जैवविविधता

**गुरुप्रसाद घाडी**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: ghadige.dc@gmail.com

महाराष्ट्राला सुमारे 720 किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभली आहे. किनारी भागात अधिवासांची विविधता मोठ्या प्रमाणात दिसून येते. उदा. खडकाळ, वालुकामय किनारे, प्रवाळ, कांदळवने, खाजणे, दलदल प्रदेश इ. कोकण किनारी मैदानात अनेक पश्चिम वाहिनी नद्या वाहतात व त्या अरबी समुद्राला मिळतात. यातील बऱ्याच नद्यांच्या किनारी भागात खाड्यांची निर्मिती झालेली आहे. या खाड्यांमधील कांदळवने ही किनारी परीसंस्थांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. वनस्पती आणि जैविक वैविध्याला आधार देण्याबरोबरच मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या असंख्य पर्यावरणीय सेवा ही वने पुरवितात.

कांदळवने सागरी लाटा, भरतीचे पाणी, पुर यापासून किनाऱ्यालगतच्या जमिनीचे संरक्षण करणे, प्रदूषक घटक शोषून घेणे व जलचरांना आसरा पुरवणे इ. मुळे पर्यावरणीयदृष्ट्या खूपच महत्त्वपूर्ण आहेत. पांढरी चिपी (सोनोरेशीया अल्बा) ही कांदळवन प्रजात 'राज्य कांदळवन वृक्ष' म्हणून घोषित करण्यात आली असून 'राज्य कांदळवन वृक्ष' घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. महाराष्ट्रात कांदळवनांच्या किनारपट्टीच्या सात जिल्ह्यांमध्ये 11 गटातील 15 जातींमधील 20 प्रजाती आढळतात. [संदर्भ: https://mangroves.maharashtra.gov.in]

**अभ्यास क्षेत्र**

सदर अभ्यासात तारामुंबरी- मीठमुंबरी खाडीतील कांदळवन क्षेत्रातील जैव विविधता छायाचित्रांच्या सहाय्याने उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. देवगड तालुक्यातील तारामुंबरी–मीठमुंबरी खाडीच्या उत्तर दिशेला तारामुंबरी व जामसंडे तर दक्षिण दिशेला मीठमुंबरी गाव आहे. पश्चिमेस अरबी समुद्रापासून दाभोळे गावापर्यंत विस्तारलेल्या तारामुंबरी–मीठमुंबरी खाडीत दाभोळे पूल इथपर्यंत खारफुटीचे प्राबल्य जाणवते. देवगड जामसंडे नगरपंचायत हद्दीच्या दक्षिणेला असलेल्या या खाडी पट्ट्यात बऱ्याच वर्षांपासून कांदळवन अस्तित्वात आहे. येथून लगतच असलेला प्रशस्त मीठमुंबरी बीच, देवगड पवनचक्की उद्यान व बीच यामुळे तसेच येथील मासेमारी या प्रमुख व्यवसायामुळे या खाडीचे अस्तित्व महत्वपूर्ण आहे. येथील कांदळवनामुळे खाडी परिसंस्थेला मदत झालेली आहे. शिवाय येथे अलीकडे कांदळवन पर्यटन विकसित होत आहे.

**अभ्यास क्षेत्र नकाशा**




मागील दहा वर्षात येथील कांदळवनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच काही ठिकाणी कांदळवनांची खाडी किनारी भागात लागवड केली गेली आहे.

येथील कांदळवनांच्या वाढीमागे महाराष्ट्र राज्य कांदळवन कक्ष तसेच तारामुंबरी – मीठमुंबरी क्षेत्रातील स्थानिक बचत गट व नागरिक यांचे ही योगदान मोलाचे आहे.




**Figure 1: तारामुंबरी- मीठमुंबरी खाडी - गुगल अर्थ प्रतिमा**

**जैवविविधता अभ्यास**

**प्रमुख वनस्पती**

| अ.क्र | वनस्पतीचे नाव | उपयोग | छायाचित्र |
|---|---|---|---|
| 1 | *Rhizophora mucronata poir*/ red or Asiatic mangrove (लाल कांदळ) | फर्निचर, कुंपण, बांधकाम साहित्य, चारकोल, सालीपासून Tannin, सालीपासून रंग , सालीचा काढा अतिसार कुष्ठरोग, रक्त स्त्राव कमी करण्यास, मानेचा दाहइत्यादी साठी उपयुक्त, मधुमेहावर उपयुक्त, Tide Breakers , कोळंबी पैदास साठी उपयुक्त, चहाला पर्याय असे पेय |  |
| 2 | *Rhizophora apiculata* Blume (Kandal/ tall- stilted mangrove) | बांधकाम साहित्य, जळाऊ लाकूड, चारकोल, सालीपासून रंग , मुळांचा काढा रक्तदाबावर उपयुक्त, Tide Breakers, कोळंबी पैदास साठी उपयुक्त |  |

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | *Bruguiera cylindrica* (L.) Blume (Kandal) | नौका बांधणी आणि बांधकाम, जळाऊ लाकूड, चारकोल, सालीपासून Tannin |  |
| 4 | **Bruguiera gymnorrhiza* (L.) (Kandal, Kankar, Ekmane) | नौका बांधणी, फर्निचर, जळाऊ लाकूड, सालीपासून Tannin, रक्तदाब कमी करण्यास मदत, डोळ्यांसाठी उपयोगी |  |
| 5 | **Kandelia candel* L. Druce (Kandal-guriya) | जळाऊ लाकूड, सालीमध्ये 15 ते 20 टक्के Tannin,माधुमेहावर उपयुक्त |  |
| 6 | *Ceriops tagal* (Perr.) C.B.Rob (Kandal,Kirkiri) | घराचे छत, झोपड्यांचे भिंती, इमारती साहित्य, रेल्वे स्लीपर मधील आच्छादन, जळाऊ लाकूड, मध, 29 टक्के सर्वाधिक मात्रेत Tannin, सालीपासून रंग याची साल फांद्या फळे आणि मुळे यांचा काढा क्विंनाईन ला पर्याय , रक्त स्त्राव कमी करतो |  |
| 7 | *Avicennia alba* Blume (Tivar/ white mangrove) | किरकोळ सुतार कामात, लाकूड, मासेमारीचे गळ, शेती साधने, इंधन, चारकोल, मध, सालीपासून Tannin, मृदेची धूप थांबवतात |   |
| 8 | **Avicennia marina* (Forsk) Vierh. (dwarf) (Tivar/ white mangrove) | |  |
| 9 | **Avicennia officinalis* L (Tivar/ white mangrove) | कुंपण आणि किरकोळ बांधकाम साहित्य, जळाऊ लाकूड, सालीपासून Tannin, जखमा, गळवे, इत्यादी उपाय |  |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | *Sonneratia alba* J. Smith/ Mangrove apple(चिपी) (pandhari chipi/ pornupan mangrove) | चौकट बनवणे, फिशिंग फ्लोट, इंधन, इतर प्रजातींपेक्षा बायोगॅस चे प्रमाण जास्त , 9% Tannin, रक्त स्त्राव व सूज यावर उपयोगी |  |
| 11 | **Sonneratia apetala* Buch. – Ham. (chipi) | आगपेटी काड्या, कुंपण बांधकाम, इंधन, इतर प्रजातींपेक्षा बायोगॅस चे प्रमाण जास्त , 9% Tannin |  |
| 12 | **Sonneratia caseolaris* (L.) Engler (chipi) | बांधकाम, पॅकिंग बॉक्स, कुंपण, इंधन, इतर प्रजातींपेक्षा बायोगॅस चे प्रमाण जास्त , आंबवलेल्या रसाची पट्टी रक्त स्त्राव थांबवते |  |
| 13 | **Lumnitzera racemosa* Willd/ Black mangrove (किरपा) | जळाऊ लाकूड, खोडांचा काढा नागिन व खरूज यावर बाहेरून औषध म्हणून वापरतात |  |
| 14 | **Excoecaria agallocha* Linn (huri,Geva,Phungli, Surund/Milkay mangrove) | सुतारकाम, बांधकाम साहित्य, नौका बांधणी, आगपेटीच्या काड्या, पॅकिंग खोके, जळाऊ लाकूड, अपस्मार ,अल्सर यावर उपयुक्त, याचा रस रेचक असतो, संधिवात, पक्षाघात, त्वचा रोगात उपयोगी |  |
| 15 | **Cynometra iripa* Kostel (Irapu) | कुंपण, जलद वाढ आणि पर्ण संभारामुळे उत्तम सावली देते |   |
| 16 | **Aegiceras corniculatum* (L.) Blanco (Karti, Kajala, Sugandha/River mangrove) | जळाऊ लाकूड, उत्तम प्रतीचे मध |   |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | *Acanthus ilicifolius* Linn/ Sea holi mangrove (Kateri, Marandi) | इंधन, दमा, खोकला, जखमा, केसतोड, संधिवात, अपचन, मज्जा संस्थेसाठी पोषक, फळाचा लगदा रक्तशुद्धिकारक, जाळ्याप्रमाणे पसरणारी मुळे मृदेची धूप थांबवतात |  |

[संदर्भ: Dr. Bhosale Leela, Mangroves of Maharashtra, Published by Shivaji University, Kolhapur]

भारतीय वन कायदा (1927), वन्य जीव संरक्षण कायदा (1927), वन संवर्धन कायदा (1980),पर्यावरण संरक्षण कायदा 1986 अंतर्गत CRZ अधिसूचना 2011, CRZ (2019), पर्यावरणविषयक प्रभाव मुल्यांकन अधिसूचना (1994) आणि किनारपट्टी जलचर प्राधिकरण कायदा (2005) इ.च्या अंतर्गत भारतातील कांदळवन अधिवास संरक्षित आहे. (कांदळवन कक्ष, महाराष्ट्र शासन)

**दुय्यम / सहाय्यक वनस्पती**




***Ipomoea pes-caprae***




***Aeluropus lagopoides***




***Sesuvium portulacastrum***

**मासे**



**गुंजली / शेडे/ बोय mullet fish**



**सुळे Lady fish**



**पडीयारे Scatophagus argus**



**शेतुक Whip Fin Majarra**



काप Pearl Spot Fish



कानई Asian Seabass



कोकरी Trevally fish



तांबवसा Red Snapper Fish



Flying fish पाखरू मासा



*गोबरा Grouper / Reef Cod Fish



टोळ Needle Fish



पालू Goldsilk seabream



*Mud skipper

**अन्य जलचर, प्राणी, कीटक**



**Common moon crab**



**Mangrove periwinkle snail**



**Cockles and Clams**



**Scylla serrata**



**Fiddler Crab**



**Jewel Bug**



**Striped shore crab**



**Hermit Crab**



**Asian Soldier crab**



**Sea anemone**



**Star fish**



***Indian langoor**



***Sea otters**



***Moniter lizard (Varanus)**



***Spine bellied sea snake**

| | |
|---|---|
|  |  |
| ***Golden jackals** | ***Indian Mongoose** |

**पक्षी**

| | |
|---|---|
|  |  |
| **Indian Cormorant** | **Red Vented Bulbul** |
|  |  |
| **Little blue heron** | **Asian Green Bee Eater** |
|  |  |

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

**Eurasian curlew**

**Western Reef Heron**



**Grey Heron**



**Black Headed Ibis**



**Malabar Pied Hornbill**



**Great Egret – White Heron**



**Common Kingfisher**



**White Throated Kingfisher**



**Common Sandpiper**



**Red wattled lapwing**



Black Kite



Indian pond heron



*Kentish plover



*Green shank



*Indian grey hornbill



*White bellied sea eagle



*Little cormorant



*Brahmany kite



*Herring gull



*Common tailorbird



*Oriental magpie robin



*Jungle Myna



***Red shank**



***Caspian Tern**



***Brown headed gull**



**Little Egret**



***Osprey**

[संदर्भ: सुनील करकरे , ओळख आपल्या जैवविविधतेची पक्ष्यांच्या जगात, सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर]

** असलेली छायाचित्रे इंटरनेट वरुन घेण्यात आली आहेत.*

**निष्कर्ष**

तारामुंबरी – मीठमुंबरी येथील कांदळवनांमध्ये मोठ्या प्रमाणात जैवविविधता आढळून येते. खारफुटीच्या एकूण 17 प्रजाती आढळून येतात. यामध्ये *Rhizophora mucronate, Rhizophora apiculate*, *Avicennia alba, Sonneratia alba* यांचे आधिक्य जाणवते. कांदळवनांतील काही प्रजातींचे औषधी उपयोग आहेत. तसेच काही सहाय्यक दुय्यम वनस्पतीही आढळतात. मत्स्य प्रजातींमध्ये शेडे, सुळे,पडीयारे, शेतुक, काप, कानई, कोकरी, तांबवसा,टोळ, पालू इ. मासे येथे आढळतात. खेकड्यांच्या विविध प्रजातींबरोबरच घोरपड, पाणमांजर, माकडे, मुंगुस इ. चा येथे वावर असलेला दिसून येतो. मासे, कालवे , खेकडे यांचा अन्न म्हणून स्थानिकांकडून वापर केला जातो तसेच विक्री देखील केली जाते. येथील पक्षी जीवनदेखील वैविध्यपूर्ण, समृद्ध असे आहे. मासे व अन्न उपलब्धतेमुळे किंगफिशर, हॉर्नबिल, घारी, टिटवी, पाणकावळे, तसेच बगळ्यांच्या विविध प्रजाती येथे सहज दृष्टीस पडतात. विविध हंगामात येणारे काही स्थलांतरित पक्षी ही येथे मुक्तपणे संचार करताना दिसतात व येथील जैवविविधतेत मोलाची भर टाकतात.

तारामुंबरी-मीठमुंबरी खाडी पट्ट्यातील कांदळवनांचे क्षेत्र वाढत असले तरी या खाडी भागातील वाढते गाळाचे संचयन, बांधकामे, खाडी किनारी भागातील कोळंबी पैदास प्रकल्पांचे वाढते प्रस्थ, प्रदूषण, लोकांकडून मासे आणि कालवे, खेकडे यांची मोठ्या प्रमाणात पकड यामुळे जैवविविधतेला धोका जाणवतो. याबद्दल जागरूक असणे गरजेचे आहे.पर्यावरण आणि खाडी-किनारी परिसंस्थांच्या दृष्टीने कांदळवनातील जैवविविधता खूप महत्त्वपूर्ण आहे. भविष्यात देवगड मधील पर्यटनात तारामुंबरी – मीठमुंबरी येथील कांदळवने महत्त्वपूर्ण ठरतील यात तीळमात्र शंका नाही.

**संदर्भ**

1. Bhosale Leela J.- Mangroves of Maharashtra, Published by Shivaji University, Kolhapur
2. सुनील करकरे - ओळख आपल्या जैवविविधतेची - पक्ष्यांच्या जगात
3. सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर
4. Google Earth
5. https://mangroves.maharashtra.gov.in

# देवराई: एक परिसंस्था

**नागेश शरद दप्तरदार**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: daptardarns.dc@gmail.com

भारतामध्ये आणि खास करून पश्चिम घाटामध्ये देवराई म्हणजेच प्रत्येक गावाने देवाच्या नावाने राखून ठेवलेले जंगल. ह्या देवराया जंगल आणि जैव विविधता संरक्षणाची एक संपन्न परंपरा आहे. निसर्ग पूजन हा सर्वच प्राचीन संस्कृतीना जोडणारा दुवा आहे एक समान धागा आहे काही झाडांना देवाचीच नावे बहाल केली आहेत यामध्ये वटवृक्ष म्हणजे महादेव, पिंपळ म्हणजे विष्णू, पळसाला ब्रह्मदेव तर कदंब झाडाला कार्तिकेय या देवाच्या नावानी ओळखले जाते, या तत्वाने एखादा वन प्रदेश असे देवाच्या नावानी वास करणारे प्रदेश म्हणजे देवराया, देवबन, देवरहाटी अशा विविध नावानी त्या ओळखल्या जातात. येथील झाडे तोडली तर देवाचा कोप होतो तसेच विष्णू पुराणाचा दाखला ज्याचा मराठीत भावार्थ असा आहे ‘जो कोणी पशुपक्षी, लतावेली, इतकेच नाही तर अगदी गवताच्या पात्याचे संरक्षण करील तो स्वर्गाचा धनी होईल’ आणि याच भावनेने जंगलचा पिढ्यानपिढ्या रक्षण-आदर केला गेला. या प्रथा जगभरच्या विविध भागातून दिसून येतात भारतामध्ये आसाम, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, केरळ, गोवा, तामिळनाडू ह्या राज्यात देवराई ही संकल्पना दिसून येते. कर्नाटकामध्ये देवरायांना नागबने अशी संकल्पना आहे मध्यप्रदेशांमध्ये त्यांना शरणवने या नावानी ओळखले जाते.

महाराष्ट्र राज्यामध्ये देवराया या तळकोकण घाटमाथा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दिसून येतात. सिंधूदुर्ग, रत्नागिरी जिल्हयामध्ये जास्त देवराई आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सुमारे १२०० लहान मोठ्या देवराईची नोंद झाली असून देवगड तालुक्यांमध्ये २५६ देवरायांची नोंद झाली आहे. काही २०० पासून ५०० वर्षापर्यंतची जुनी वडाची, पिंपळाची महाकाय एकच झाडे पण देवराई या संकल्पनेमध्ये येतात त्यांना कोकणात महापुरुषाचे झाडे संबोधले जाते. देवराईमुळे महाधनेश पक्ष्यासाठी तसेच श्रृंगी घुबड यासारख्या काही विशिष्ठ प्रजाती तग धरून आहेत. तद्नंतर पुणे, कोल्हापूर, सातारा असा क्रमांक लागतो. उर्वरित महाराष्टामध्ये विदर्भामध्ये देवराया कमी आहेत. देवराई या मातृसत्ताक आहेत देवराई संकल्पनेचे मूळ अतिप्राचीन मानले जाते मानवी जीवनमान विमुक्त भटके होते त्यावेळी कुटुंबव्यवस्था हि अस्तिवात न्हवती जर असेल तर ती मातृसत्ताक असावी कारण अनेक देवरायामध्ये स्वामित्व हे देवताकडे जाते समाज आपल्या देशामध्ये भिन्न भिन्न संस्कृती आणि समाजाची देखील विविधता आहे पुरातन काळापासून आपल्या पूर्वजापासून जनमानसाला निसर्गाबद्दल आदर राखणेस सांगितले आहे. पश्चिम घाटातील खास करून जंगल क्षेत्रालगतच्या गावालगत आपल्याला देवराई दिसून येते. इथल्या स्थानिक समूहांनी निसर्गाचा आदर राखत काही ठिकाणे ही आपल्या फायद्यासाठी उपजीविकेसाठी वापरायची नाहीत असा दंडक घातला होता. हे नियम गेल्या कित्येक वर्षापासून पिढ्यानपिढ्या पाळले जात आहेत. असे नियम पाळावेत आणि निसर्गाची हानी होऊ नये यासाठी ते देवधर्माशी जोडले गेले आहेत. १९७०च्या सुमारास देवराई तिचे संरक्षण संवर्धन आणि उपाययोजना या बाबत शास्त्रीय अभ्यास होऊ लागला. श्री. डॉ. माधव गाडगीळ आणि वनस्पती संशोधक वा.द. वर्तक यांनी देवराईचा पध्दतशीर अभ्यास केला. गेल्या २-३ दशकांत देवराई बाबत परंपरा, संस्कृती, जैव विविधता, सामाजिक महत्व याबाबत फार मोठ्या प्रमाणात अभ्यास केला गेला आणि शोध निबंध प्रकाशित झाले आहेत. आज ही जंगलाची फुफुसे अर्थात देवराई टिकविणे आणि आपल्या पूर्वजाप्रमाणे परंपरेशी जोडणे खरी गरज आहे. या परंपरा, संस्कृती या शास्त्रीय दृष्टीकोणातून मर्यादित अभ्यास न करता या देवराया जपून ठेवण्यासाठी, भविष्यातील सीड बँक म्हणून या देवरायाकडे पाहण्यासाठी स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन त्यामागचे निसर्ग संवर्धानाचे सामाजिक भान कसे टिकवून ठेवता येईल यावर खरे काम करण्याची गरज आहे.

शाश्वत विकासासाठी आणि जैव विविधतेच्या जोपासनेसाठी स्थानिक झाडांची जोपासना व्हावी, स्थानिक व तेथील पर्यावरणाला पूरक फूलपाखरे, पक्षी, कीटक, मधमाशा यांना आकर्षित करणारी झाडे लावणे, तेथील जमीन, माती, पाणी यांचा

पर्यावरण पूरक आराखडा बनवून तेथील निसर्गाच्या वाढीसाठी देवराई संवर्धनासाठी कटिबद्ध होणे गरजेचे आहे. या अनुषंगाने जमीनीचे माती, पाणी, गवत, झुडपे याचे साध्या नैसिर्गीक पद्धतीने पुनरूजीवन करण्यासाठी प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक पारिस्थितीचा व भौगोलीक पारिस्थितीचा विचार करून देवराईमध्ये जी झाडे अस्तिवात आहेत व होती त्याच झाडाचे रोपण स्थानिकांच्या सहभागातून होणे गरजेचे आहे. कारण स्थानिकाच्या सहभागातून केलेले काम हे शाश्वत आणि टिकावू असते.

देवराईमध्ये आंबा, जांभूळ फणस, सातवीन, बेहडा, कुंभा, तिरफळ, अंजन, माकडलिंबू ई. वृक्ष तर वेलीमध्ये ओम्बल वेल, पेंडगुळ तसेच दुर्मिळ प्रदेशानिष्ठ प्राचीन झाडे तसेच जगातील सर्वात मोठी शेंग गारंबीची वेल, प्राचीन जंगलाचा निदेर्शांक असे भेरली माड तसेच ऑर्किडस, नेचे, बुरश्या, बहुतांशी देवराईमध्ये आढळून येतात. यामध्ये संकटग्रस्त महाधनेश तसेच प्रदेशानिष्ठ धनेशाची घरटी आढळून आली आहेत. धनेशाला आपण फार्मर ऑफ द फॉरेस्ट या उपाधीने ओळखतो धनेश हे पक्षी मोठ्या प्राचीन झाडाच्या ढोलीत घरटी करतात डिसेंबर - जानेवारीमध्ये त्यांची घरटी बनविण्याची गडबड घाई सुरु होते. हे आकाराने मोठे पक्षी आपली घरटी जुनाट झाडाच्या ढोलीत करतात. असे जुनाट मोठाले वृक्ष आता फक्त आपल्या देवराई मध्ये आढळून आले आहेत. त्यासाठीच ही झाडे जपायला हवीत. तसेच महाराष्ट्र राज्याचा राज्यप्राणी ‘शेकरु’ ची घरटी ही अशा देवराईमध्ये दिसून आली आहेत. तसेच प्रदेशानिष्ठ बेडूक, देवगांडूळ, साप यांचाही अधिवास देवराई मध्ये दिसून येतो.

देवराईमध्ये फिरताना काही प्रथा, काही मिथिका आहेत यामध्ये चप्पल-बूट न घालता अनवाणी फिरावे, पाने, फुले, फांद्या तोडायच्या नाहीत, पारंपारिक औषध जसे मूळ, साल, पाने, फळे हवे असल्यास देवाचा कौल लावून मगच तो भाग काढायला परवानगी असते. देवराई मध्ये जे विविध प्राणी, पक्षी, किडे-मकोडे, फुलपाखरे, वारूळ आढळून येतात, त्यांना इजा करणे म्हणजे मोठे पाप समजले जाते. जर प्राणी दगावला तर देवाचा कोप होतो अशी धारणा काही ठिकाणी आहे. आज काळाच्या ओघात देवराई आकाराने कमी होत चालल्या आहेत. येथील मोठाले वृक्ष तोडून ती विकण्याचा घाट ही घातला जात आहे. तसेच धरणे, रस्ते, काही ठिकाणी लोहमार्ग यामध्ये देवराई तोडल्या जात आहेत, काही दरडी कोसळण्याने कमी झाल्या आहेत तर काहीचा विस्तार कमी कमी होत आहे. देवराईच्या मालकी बाबत विभिन्नता दिसून येते. काही देवराईच्या मालकी देवाची काही त्यांच्या विश्वस्ताची तर काही देवराई या पंचायत समितीच्या मालकीच्या येतात. वनखात्याच्या अखत्यारीत खूप कमी देवराई आहेत. यामध्ये महसूल खात्याचा वाटा अधिक आहे असे दिसून येते. देवराईचे पुनरुज्जीवन म्हणजे सिमेंट कॉक्रीटचे मंदिर, सभामंडप बांधणे, फरशा, झुंबर आणि रंगरंगोटी नव्हे तर तेथील शांतता, शुचिता, साधेपणा, जैवविविधता जपणे हे होय, हा सुज्ञपणा माणसामध्ये रुजणे गरजेचे आहे हे आपण कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे.

देवराई या जपल्या पाहिजेत कारण त्या एक परिपूर्ण परिसंस्था आहेत. जैव विविधतेची खाण असे म्हणता येईल असा परमोच्च बिंदू गाठण्यासाठी निसर्गाला हजारो वर्ष लागतात, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. देवराई या जनुक बँक आहेत आपण खात असलेल्या कित्येक वनस्पतीचे जंगली भाईबंद आपणाला देवराईमध्ये दिसून येतात, देवराईमध्ये पारंपारिक औषधाची खाण दिसून येते. यामध्ये मुरुड शेंग, वावडिंग, डिकेमाली गारंबी ह्या विविध औषधी वनस्पती आढळतात. पारंपारिक वैदू हि औषधे काढा स्थानिकाना देतात. काही देवराई या जिवंत पाण्याचे झऱ्याचे अव्याहत स्त्रोत आहेत ज्यामुळे तेथील छोट्या वाड्या वस्त्यांना नियमित पाणी पुरवठा होतो. तिरफळ, धूपाची झाडे अशा काही दुर्मिळ प्राचीन झाडांचे आश्रयस्थान या देवरायाच आहेत. देवराईच्या संवर्धनासाठी जतन आणि संरक्षण याचबरोबर पुनरुज्जीवन ही अत्यंत महत्वाची बाब आहे. देवराईतील वनस्पतीच्या बीजपेढ्या (सीड बँक) तयार करून त्यांचा संचय करणे, यामधून स्थानिकांना रोजगार देणे, देवराईचे महत्व स्थानिकांना पटवून देणे, निसर्ग सहलीमधून देवराईचे महत्व आणि महात्म समाजातील विविध घटकांना सांगणे या बाबी महत्वाच्या आहेत. देवराईमध्ये मुख्यत्वे आढळणाऱ्या काही वनस्पती आणि वृक्षांच्या काही प्रजातींची यादी येथे दिली आहे. ओळखण्यास सोपे जाण्यासाठी या प्रजातींचे स्थानिक अथवा मराठी नावही दिले आहे.

**देवराईमध्ये सापडणाऱ्या काही वृक्ष प्रजाती**

| Sr. No. | Scientific Name | Family | Local Name |
|---|---|---|---|
| 01 | Erinocarpus nimmonii | Tilaceae | चेर, चिरा |
| 02 | *Artocarpus heterophyllus* | Moraceae | फणस |
| 03 | *Mangifera indica* | Anacardiaceae | आंबा |
| 04 | *Alstonia scholaris* | Apocynoceae | सातवीन |
| 05 | *Terminalia bellirica* | Combretaceae | बेहडा |
| 06 | *Ficus benghalensis* | Moraceae | वड |
| 07 | *Mammea suriga* | Clusiaceae | सुरंगी |
| 08 | *Dillenia pentagyna* | Dilleniaceae | करमळ |
| 09 | *Bombax ceiba* | Bombacaceae | काटेसावर |
| 10 | *Dalbergia paniculata* | Fabaceae | फणशी |
| 11 | *Saraca asoca* | Caesalpiniaceae | सीता अशोक |
| 12 | *Terminalia paniculata* | Combretaceae | किंजळ |
| 13 | *Tetreameles nudiflora* | Datiscaceae | भेंड, भेंडसा, उगाड |
| 14 | *Neolamarckia cadamba* | Rubiaceae | कदंब |
| 15 | *Strychnos nux-vomica* | Loganiaceae | कजरा, कुचला |
| 16 | *Antiaris toxicaria* | Moraceae | जासुंड, करवत |
| 17 | *Ficus arnottiana* | Moraceae | खडक पायर |
| 18 | *Moullava spicata* | Caesalpiniaceae | वाकेरी |
| 19 | *Macaranga peltata* | Euphorbiaceae | चांदाडा |
| 20 | *Entada rheedei* | Mimosaceae | गारंबी, गारदळ |
| 21 | *Helicteres isora* | Sterculiaceae | मुरड शेंग |
| 22 | *Smilax zeylanica* | Smilacaceae | घोटवेल |
| 23 | *Gloriosa superba* | Lialiaceae | बचनाग, कळलावी |
| 24 | *Carallia brachiata* | Rhizophoraceae | रानफणशी |

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

# पक्षी येती अमुच्या घरा...

**भाग्यश्री कृष्णा परब**
संत राउळ महाराज महाविद्यालय, कुडाळ
Corresponding author E-mail: bhagyashriparab45@gmail.com

मार्च महिना संपताच उन्हाच्या झळा प्रकर्षाने जाणवू लागल्या. आतापर्यंत आपल्या कोमल किरणांनी हिरवीगार झालेली सृष्टी या तीव्र सूर्यकिरणांमुळे भकास आणि उजाड दिसू लागली. अक्षरशः अंगाची होणारी लाहीलाही आणि त्यात पाण्याची टंचाई बघून जीव अगदी कासावीस होऊ लागला होता. अशाच एका भयाण दुपारी घरात उकाडा सहन होत नसल्यामुळे सहज बाल्कनीतून बाहेर डोकावले. वाऱ्याची मंद परंतु उष्ण झुळूक अंगावरून वाहिली. थोडासा जीवात जीव आला खरा... पण तोच बाजूला दोन पक्ष्यांच्या कलकलाटाने माझं लक्ष वेधून घेतलं. थोडसं बाहेर आल्यावर त्यांच्या कलकलाटाचा नेमका विषय लक्षात आला. थोड्याच वेळापूर्वी नळातून बाहेर येऊन टोकावर ताटकळलेले पाण्याचे थेंब मिळवण्यासाठी या पक्ष्यांचा खटाटोप चालला होता. मग मी पुन्हा घरात जाऊन बाहेरचा नळ चालू केला आणि खिडकीतून डोकावून त्या पक्ष्यांचा आनंद न्याहाळत राहिले. पाणी पिऊन तृप्त झाल्यावर आपल्या पंखांची फडफड करून मनसोक्त पाण्यात डुबकी मारणे... पण तेही अगदी शिस्तबद्ध बरं का...! म्हणजेच एक आंघोळ करत असताना दुसऱ्याने बाजूला थांबायचे. अगदी इतर प्राण्यांना लाजवेल असे हे दृश्य पाहताना बाहेर आग ओतणाऱ्या सूर्याचा जणू विसरच पडला.

या वर्षीच्या कडक उन्हामुळे बऱ्याच ठिकाणी विहिरी आटत चालल्या होत्या. इथे माणसांना पाणी मिळण्याची पंचाईत तर पक्ष्यांना पाणी मिळण्याची गोष्ट खूप दूरची! पण यावेळेस मात्र मी ठरवलं की काही झालं तरी पक्ष्यांसाठी बाहेर अंगणात दोनतीन ठिकाणी तरी पाणी भरून ठेवायचं. आणि ठरल्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी मी मातीची दोन भांडी पाणी भरून विहिरीवर आणि चार भांडी घराच्या गच्चीवर ठेवली.














लालगुबी बुलबुल आणि शामा



टिकेलची निळी माशिमार

झालं... संध्याकाळी एक बुलबुल जोडी आली. सुरुवातीला त्यांनी विहिरीवर बऱ्याच फेऱ्या मारल्या. पण पाणी प्यायला कुणीच आलं नाही. मी खूप नाराज झाले कदाचित त्यांना काहीतरी नवीन वाटलं असावं किंवा काही तरी धोक्याची जाणीव झाली असावी अशी मी मनाची समजूत घातली. दुसऱ्या दिवशी बाल्कनीत बसले असताना पुन्हा फडफड कानावर आली. पाहते तर काय... तेच लालगुबी बुलबुल पाण्याच्या भांड्यात उतरून मनमुरादपणे आनंद लुटत होते. एक आंघोळ करत असताना दुसरा काठावर बसून जणू अगदी पहारा देत असल्याचं जाणवलं. पण त्या दिवशी त्या पक्ष्यांना पाण्यात मनसोक्त खेळताना पाहून पहिल्यांदा निसर्गाशी जन्मतःच असणाऱ्या अनामिक नात्याची नव्यानं ओळख झाली आणि तो नातेबंध दृढ होण्यासाठी काहीतरी केल्याचं समाधान वाटलं. सुरुवातीला त्या दोनच लालगुबी बुलबुलच येणंजाणं असायचं. ते पण अगदी ठरलेल्या वेळेतच सकाळी आणि संध्याकाळी. खरंच वेळेचं योग्य नियमन शिकावं ते पक्ष्यांकडूनच.

आता हळूहळू नवीन पाहुणे यायला सुरुवात झाली होती. आज तर संपूर्ण काळ्या रंगाचा आणि पांढऱ्या रंगाची छटा असणारा दयाळ पक्षी त्याच्या प्रेयसीसोबत पाणी पिण्यासाठी आला. नंतर लालबुड्या बुलबुलसुद्धा आला. पण पाण्यात उतरून पंखांची फडफड करून लगेच निघून गेला. त्या दयाळ पक्ष्याच्या जोडप्याला पाहून जणू काही या बुलबुलला आपल्या मैत्रिणीची आठवण आली असावी. तसा तोही दुसऱ्या दिवशीपासून आपल्या मैत्रिणीसोबत येऊ लागला. माझा फोटोग्राफीचा छंद येथे सत्कारणी लागला. या पक्ष्यांचा आनंद डोळ्यांमधे साठवून मला कॅमेऱ्यामधे पण टिपता आला. एके दिवशी दुपारी अतिशय सुंदर आणि कर्णमधुर शीळ कानावर आली. मी त्या आवाजावरून पक्ष्याची ओळख पटवली आणि आवाजाच्या शोधात मी संपूर्ण घराभोवताली फिरले. घरामागील पाण्याच्या भांड्यावर कोकिळेएवढा आणि तपकिरी काळ्या रंगाचा पक्षी पाण्याचा आनंद घेताना नजरेस आला. त्याच्या कटीपार्श्व भागावर जणू कापूस चिकटवून ठेवल्यासारखं दिसणाऱ्या पांढुरक्या रंगानं माझं लक्ष वेधून घेतलं. त्याला प्रत्यक्षात पाहताना माझ्या कल्पनेतील या पक्ष्याचं चित्र त्याच्या आवाजासमोर फिकं पडलं होतं. श्रीकृष्णाच्या बासरीतून निघणाऱ्या सुरांप्रमाणेच निसर्गाने या पक्ष्याला आवाजाची अनमोल देणगी दिलेली आहे, म्हणूनच की काय त्याचे नाव 'शामा' आहे. आता तर या पक्ष्याचा आवाज माझ्या कानाला रोजच हवाहवासा वाटू लागला. या पक्ष्याबद्दल विशेष गोष्ट अशी की पाण्याच्या भांड्यावर येण्याआधी घरामागील काजूच्या किंवा घरासमोरील जास्वंदीच्या झुडुपात बसून तो २-३ वेळा शीळ घालायचा आणि नंतरच पाण्याच्या भांड्यावर यायचा. त्याच्या या सवयीमुळे त्याची शीळ ऐकू येताच मी कॅमेरा आणि ट्रायपॉड घेऊन विहिरीपासून १० फुटांवर सज्ज व्हायचे, ज्यामुळे मला त्याचे अनेक सुंदर फोटोज काढता आले.

सगळ्या पक्ष्यांच्या पाण्याच्या भांड्यांवर यायच्या वेळा ठरलेल्या होत्या. परंतु चुकून कधीतरी त्यांची समोरासमोर भेट झाली की भांडणच लागायचं. त्यात प्रामुख्याने लालगुबी बुलबुल आणि शामा यांचा सहभाग असायचा. त्यांचा हा वाद टाळण्यासाठी मी पाण्याच्या भांड्यांची संख्या वाढवली आणि अजून २ भांडी घरासमोरील कंपाऊंडवर ठेवली. आता तर त्या सगळ्या पक्ष्यांनी जणू एका-एका भांड्यावर स्वतःचं वर्चस्व मिळवलं आणि जरी कधी ५-६ पक्षी एकत्र आलेच तरी ते स्वतंत्रपणे पाणी पिऊन मनसोक्त बागडत पाण्यात आंघोळ करायचे.

*(ISBN: 978-93-95847-78-0)*
















एके दिवशी मी दुपारी कॉलेजमधून घरी आले आणि सवयीप्रमाणे पाठीवरचे दप्तर देखील न काढता पाण्याची भांडी भरून ठेवायला जात होते; तेवढ्यात एक नाजूक पण अतिशय मनमोहक शीळ कानावर आली. समोरच विहिरीवरील भांड्यात गडद निळ्या रंगाचा चिमणीएवढ्या आकाराचा पक्षी पाण्यात आंघोळ करताना दिसला. जणू काही बरेच दिवस पाणी न मिळाल्यामुळे तहानेने व्याकूळ झालेला हा पक्षी तब्बल ५ ते १० मिनिटे पाण्यात स्वच्छंदपणे बागडत होता आणि मधेच पाणी पीत होता. हे दृश्य पाहून नकळतपणे माझ्या डोळयांमधून आनंदाश्रू ओघळले. पाठीमागून अचानक आलेली आईची हाक ऐकताच मी भानावर आले आणि कॅमेरा आणण्यासाठी घरात वळले, तोच पुन्हा एकदा तीच शीळ कानावर आली. जणू काही आपल्या प्रेयसीला बोलवण्यासाठी घातलेली ही शीळ असावी असे वाटले आणि दुसऱ्याच क्षणी त्याची प्रेयसी (मादी) पाण्याच्या भांड्यावर हजर झाली. दोघेही स्वच्छंदपणे पाण्यात बागडले. त्यांचा हा कार्यक्रम १५ एक मिनिटे चालला आणि त्या नंतर ते दररोज येऊ लागले.

काही दिवसांनी सकाळी ७ च्या सुमारास घरामागून एक वेगळाच आवाज यायला लागला. पत्र्याच्या डब्यात दगड घालून वाजवावा तसा तो विचित्र आणि लक्ष वेधून घेणारा आवाज होता पांढऱ्या भुवईच्या बुलबुलचा. त्याचा रंग हिरवट पिवळा आणि

आकार इतर बुलबुल प्रजातींपेक्षा थोडा मोठा होता. याची शेपटी खूप लहान होती. आईने तर चक्क त्याला बिनशेपटीचा बुलबुल आणि पप्पांनी लुडबुड्या असं नाव ठेवलं होतं. तोसुद्धा आता इतर बुलबुलप्रमाणे पाण्याच्या भांड्यावर येऊ लागला. दरम्यानच्या काळात मी घरामागील काजूच्या झाडाला २ मातीची छोटी मडकी टांगून ठेवली. रोजच्या निरीक्षणावरून असं लक्षात आलं की पक्षी पाणी पिण्यासाठी खोलगट भांडी पसंत करत नाहीत. कदाचित त्यांना सुरक्षित वाटत नसावे. परंतु उथळ मातीच्या भांड्यांना याच पक्ष्यांचा चांगला प्रतिसाद असतो, कारण त्यांना मनसोक्त पाणी पिऊन त्यात बागडता येते. त्यासाठी हे लक्षात ठेवलं पाहिजे की, ते भांड खोलगट नव्हे तर पसरट असावं. अजून एक गोष्ट अशी की, अनेकदा कावळा हा पक्षी भाकरीसारखं एखादं अन्न त्या पाण्यात बुडवून खातो. त्यामुळे ते पाणी खराब होतं. शिवाय सतत भांड्यात पाणी राहिल्याने त्यात शेवाळाचीही निर्मिती होते. त्यामुळेच पाणी वेळोवेळी बदलत राहावं लागतं आणि भांडंही स्वच्छ ठेवावं लागतं.

ज्या ठिकाणी चारापाण्याचा पुष्कळ साठा असतो, त्याठिकाणी बऱ्याच पक्ष्यांचा वावर असतो. त्या परिसरात सुरक्षित जागा शोधून हे पक्षी वास्तव्यास असतात व कालांतराने त्यांच्या विणीच्या काळात ते घरटी बांधून तेथेच राहतात. माझ्या घराभोवतालच्या परिसरात अनेक छोटी झुडुपे, मोठी झाडे, पिण्यासाठी मुबलक पाणी आणि पुष्कळ अन्नाची व्यवस्था असल्याने बऱ्याच पक्ष्यांची घरटी मला पाहता आली. माझ्या फोटोग्राफीच्या छंदामुळे हे सगळे कॅमेऱ्यामध्ये टिपून ठेवता आले. पक्ष्यांच्या सवयी, मादीला आकर्षित करण्याची पद्धत, घरटी विणण्याची कला मला अगदी जवळून पाहता आली. छोटीशी शेपटी कायम फुलवून सतत नाचणारी पांढऱ्या ठिपक्यांची नाचण, झाडाच्या पानासारखा दिसणारा सोनकपाळी पर्णपक्षी, दिसायला काळी चंद्रकळा असणारा पण मधुर गायनाने सगळ्यांची मने जिंकणारा कोकीळ, कायम साथीने राहणारे सातभाई, मानेवर ठिपके असणारा ठिपकेवला होला म्हणजेच कवडा असे अनेक पक्षी माझ्या घरासभोवताली असतात. दाणापाण्याची चांगलीच चंगळ असल्यामुळे बऱ्याचदा यांची घरटीसुद्धा माझ्या नजरेत आली आहेत.जसंजसा सूर्य माथ्यावर यायचा तसं तहानेने व्याकूळ झालेल्या या पक्ष्यांची घराबाजूच्या पाण्याच्या भांड्यावर एकच झुंबड उडायची.



पाण्याचे उथळ भांडे आणि खाद्य (कणी)

या सगळ्या पक्ष्यांमध्ये दररोज दुपारी पाण्यासाठी येणारे पिंगट पोटाचे सातभाई पाण्यात उतरून पंखांची फडफड करून एकमेकांसोबत गप्पा करत काठावर बसतात. त्यांच्या आवाजाने दुपारच्या नीरव शांततेचा भंग होतोच होतो. त्यांच्या आंघोळीनंतर घाबरत येऊन त्याच पाण्यात आंघोळ करून जाणारी पांढऱ्या छातीची पाणकोंबडी मला कॅमेऱ्यामध्ये टिपण्यासाठी तब्बल एक महिना लागला.

ही सारी होती माझ्या घराभोवतालच्या रोज पाणी पिण्यासाठी येणाऱ्या पक्ष्यांच्या जगाची एक झलक. दररोज आपल्या अवतीभोवती असणारे, कधी आकर्षक रंगांनी, कधी सुरेल आवाजाने लक्ष वेधून घेणारे आणि चिमुकल्या पंखांनी आभाळभर उडणारे हे पक्षी म्हणजे निसर्गातील जणू उडते आश्चर्यच आहेत. आपल्या खिडकीत येणारे नेहमीचे बुलबुल, सातभाई यांसारख्या पक्ष्यांचे निरीक्षण करणे, त्यांना कडाक्याच्या उन्हाळ्यात दाणापाण्याची सोय करणे असे निसर्गासाठी थोडेसे योगदान केल्यास यासारखे दुसरे पुण्य कोणते असेल? या पक्ष्यांची दुनिया त्यांच्यासारखीच आकर्षक, वेधक आणि आनंददायी आहे. त्यासाठी पक्षी निरीक्षणाचा छंद जोपासला तर या जगातील काही दालने नक्कीच अधिक जवळून पाहता येतील. आणि आपल्या या छंदातूनच निसर्गरक्षणाला हाथभार लागेल हे मात्र खरं.

माझ्या घराच्या परिसरात सातत्याने आढळणाऱ्या पक्ष्यांची घरटी..












# सिंधुदुर्गातील भुंगेऱ्यांची विविधता व महत्त्व

**एन. आर. हेदुळकर**

आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी, सिंधुदुर्ग

Corresponding author E-mail: hedulkar@gmail.com

भुंगेरे हे कीटकवर्गीय प्राणी आहेत. हे कीटक कोलिऑप्टेरा (*Coleoptera*) या गणामध्ये येतात. या कीटकांची संख्या मोठी आहे, जी पृथ्वीतलावरील कोणत्याही प्राण्यांच्या संख्येने सर्वात जास्त आहे. इतर कीटकांप्रमाणेच त्यांचे शरीर तीन विभागांमध्ये म्हणजेच डोके, छाती आणि उदर असे विभागलेले आहे. डोक्यामध्ये दोन किंवा तीन साधे डोळे, दोन संयुक्त डोळे आणि श्रृंगिकांची जोडी असते. त्यांच्या जीवन चक्रात त्यांच्या वाढीचे चार टप्पे असतात: अंडी, अळी, कोश आणि प्रौढ कीटक. निसर्गाने या कीटकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आकार रंग प्रदान करून त्यांना वेगळेपण दिलेला आहे. त्यांच्या खाण्याच्या पद्धती आणि अधिवास फार वेगवेगळे आहेत. ते मातीमध्ये, जमिनीमध्ये, ताज्या आणि कुजलेल्या लाकडामध्ये, पाण्यामध्ये अशा विविध प्रकारच्या ठिकाणी सापडतात. हे कीटक वनस्पती भक्षक आहेत आणि वेगवेगळ्या वनस्पतींचा फडश्या पाडणे हे त्यांचे नित्याचे काम. यातील काही इतर कीटकांचे भक्षक आहेत, काही परागीभवन करणारे आहेत, तर काही विघटन करणारे भुंगेरे आहेत आणि म्हणून या कीटकांचे मनुष्य प्राणी राहत असलेल्या परिसंस्थेमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध आहेत.

भुंगेरे किटकांचा एक गट सेरॅमबिसिडी (*Cerambycidae*) नावाच्या कुळामध्ये येतो.यातील सर्व भुंगेरे किटकांना इंग्रजीत सामान्यपणे लॉंग हॉर्न बीटल असे म्हणतात.कारण यांच्या श्रृंगीका (Antennae) खूप लांब असतात. श्रृंगिकांची लांबी कधी कधी त्यांची लांबी त्यांच्या शरीराच्या एकूण लांबी पेक्षा जास्त असते. *cerambycidae* या गणामधली हे सर्वात मोठे कुळ आहे. ज्याच्या मध्ये 36000 प्रजातीं आढळतात. भारतात देखील या कीटकांच्या जैवविविधतेचा थोड्या प्रमाणात अभ्यास झाला आहे. जगभरात जिथे जिथे वनस्पती आहेत, तिथे तिथे यांचं अस्तित्व आहे. थोडक्यात यांना संपूर्ण जीवन क्रिया पूर्ण करण्यासाठी वनस्पतीची आवश्यकता आहे. म्हणजेच दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर जगभरातील जंगले आणि जंगलामधून मिळवलेली लाकडे किंवा त्यापासून बनवलेले फर्निचर अथवा इतर वस्तू या कीटकांचे भक्षक असतात हे नक्की.याशिवाय झाडांना होणाऱ्या रोगांचे वाहक म्हणून हे कीटक वावरत असतात. म्हणजेच विविधते बरोबर हे कीटक बऱ्याच अंशी वनस्पतींना हानिकारक अथवा उपद्रवी आहेत.

**जीवनचक्र**

सेरॅमबिसिड भुंगेरे 1.0-7.0 मिमी लांब अंडी जमा करतात. एक प्रौढ मादी, तिच्या संपूर्ण आयुष्यात, साधारणपणे 25-100 अंडी जमा करू शकते. सेरॅमबिसिड अंडी सामान्यत: लांबलचक असतात, त्यांची लांबी रुंदीच्या किमान दुप्पट असते. अंडी साधारणपणे 3 ते 30 च्या पुंजक्यामध्ये सालीखाली घातली जातात. काही अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की सर्वात लहान उष्मायन काळ 3 दिवस ते 2 महिन्यांचा असू शकतो. अळी पांढरी, पिवळी किंवा फिकट नारिंगी रंगाची आणि मांसल असते. अळीचे दात इतके मजबूत असतात की कठीणातले कठीण लाकूड देखील तोडू शकतात.अळ्या त्यांच्या लपलेल्या अस्तित्वामुळे नाजूक असतात.ज्या प्रजाती झाडाच्या सालीमध्ये पोखरतात त्या काहीशा सपाट असतात, तर लाकडच्या आत राहणाऱ्या अळी सामान्यत: दंडगोलाकार असतात. जिवंत झाडाच्या तुलनेत वाळलेल्या आणि फर्निचर केलेल्या लाकडात विकसित होणाऱ्या अळी सामान्यतः प्रौढ होण्यासाठी अनेक वर्षे घेतात.

अळीच्या विविध अवस्था असू शकतात. अळीनंतर येणारी कोषावस्था बराच काळ टिकते आणि त्यावर सभोवतालच्या तापमानाचा खूप प्रभाव पाडतो. कोषावस्था सरासरी तीन ते चार आठवडे टिकते, जरी काही प्रजातींसाठी यासाठी सहा आठवडे लागू शकतात. कोषावस्थेतून प्रौढ कीटक तयार होतो. प्रौढ भुंगेरे मुक्त असतात. ज्यांना अन्नाची आवश्यकता नसते. अन्नाच्या उपलब्धतेनुसार, ते काही दिवसांपासून काही महिन्यांपर्यंत कुठेही जगू शकतात. यांचे जीवन चक्र 2.5 महिन्यांपासून ते 10 वर्षांहून

अधिक काळ टिकू शकते. समशीतोष्ण प्रदेशामध्ये राहणाऱ्या प्रजातींमध्ये वार्षिक किंवा दीर्घ जीवन चक्र प्रकार आढळतो. विशेष म्हणजे वार्षिक चक्र असणारे लाँगहॉर्न भुंगेरे उष्ण कटिबंधात कमी आयुष्य जगतात.

भुंगेरे वनस्पतींचा सर्व भाग खात असले तरी विशेषतः खोड व सालामध्ये सापडत असल्याने त्यांना खोड किडे म्हणतात. यातील सर्व कीटक हे खोडकिड्यासारखे आहेत. या लेखामध्ये सेरॅमबिसिड (*cerambycidae*) या भुंगेऱ्यांची माहिती दिली आहे.

**भुंगेऱ्यांचे महत्त्व**

भुंगेरे कीटकांच्या अनेक झाडांचा अन्न म्हणून वापर करण्याच्या स्वभावामुळे प्रौढ तसेच या भुंगेरेच्या अळया जंगलात, फळबागांमध्ये आणि झुडुपात आढळतात आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. ह्या अळया विविध वनस्पतींचे जिवंत, मृत किंवा मरणारे लाकूड भक्ष बनवतात. काहींची लहान फांद्या, मुळे किंवा अगदी फळांमधून छिद्र पाडून आत शिरण्याची प्रवृत्ती असते. अळयांचा वृद्धी काळ बराच टिकतो आणि काही झाडाच्या मृत्यूनंतरही वृक्षाच्छादित पदार्थांवर वाढू शकतात. या वस्तुस्थितीमुळे ते लाकूड उत्पादनांच्या वाहतुकीसाठी अतिशय संवेदनशील बनतात, ज्यामुळे त्यांना नवीन क्षेत्रात प्रवेश करणे आणि कायमस्वरूपी अधिवास करणे सोपे होते. *Batocera spp, Anoplophora spp., Stromatium barbatum* इत्यादी अनेक प्रजाती स्थानिक वृक्षांना अत्यंत अपायकारक आहेत.

सेरॅमबिसिड अळया जवळजवळ प्रत्येक वनस्पतीच्या ऊतींना खातात, काही प्रजाती प्रामुख्याने झाडाची साल, इतर मोठ्या प्रमाणात खोडाचा मऊ किंवा कठीण भाग खातात. यांपैकी अनेक त्यांच्या यजमान (Host) वनस्पतींच्या ऊतींमध्ये विकसित होत असले तरी, मातीत राहणाऱ्या काही प्रजाती वनस्पतींच्या मुळांना बाहेरून खातात. काही अळी या विशिष्ट वनस्पतीवरच जगतात तर काही मात्र एकापेक्षा अनेक वनस्पतींना आपले भक्ष बनवतात.

भुंगेरे वेगवेगळया प्रकारचे अन्न म्हणून फुले, मुळे, फळे, फांद्या, फुलोरा, कोण व रस यांचा वापर करतात कधी कधी ते कोवळया फांदी आणि बुरशी देखील खातात. ते विशिष्ट प्रकारच्या झाडावर वाढतात आणि वर नमूद केलेल्या भागांचा अन्न म्हणून वापर करतात. या कीटकांची दुसरी बाजू म्हणजे त्यांची पर्यावरणपूरक भूमिका. ते पावसाळ्यात बाहेर पडतात. या कीटकांमुळे मृत झाडे कुजतात आणि त्यांचे नैसर्गिक घटक मातीत मिसळतात. हे कीटक इतर प्राण्यांसाठी अन्न म्हणून काम करतात आणि वातावरणातील बदलांना संवेदनशील असतात. म्हणूनच पर्यावरणातील जैविक निर्देशक (Biological Indicator) म्हणून त्यांचा वापर केला जाऊ शकतो. सिंधुदुर्गमध्ये आंबा, फणस, काजू, नारळ तसेच साग सारखी महत्त्वाची झाडे आढळतात आणि या भुंगेऱ्यांचं अनेक झाडांचा अन्न म्हणून वापर बघता अशा वनस्पतींना धोका उद्भवू शकतो. शिवाय गेल्या अनेक वर्षात जगभरात होत असल्याने वातावरणातील बदलांचा परिणाम प्रजातींच्या वेगवेगळया ठिकाणच्या एकूण संख्येवर असण्यावर होत आहे.



**आकृती 1: *Celosterna scabrator* प्रजाती 2. फर्निचर दुकानांमधील कीड लागलेले फर्निचर**
**3. लाकूड गिरणी मधील भुंगेऱ्यांनी पोखरलेली लाकडे**

भुंगेरे कीटकांच्या उपद्रव्यांची तीव्रता सांगणारे, उदाहरण म्हणजे आशियन लॉग हॉर्न बीटल. आशियाई लांब- श्रृंगीका असलेला भुंगेरा, पूर्व आशियातील एक शहरी भागात आढळतो, जो चुकून लाकडाच्या पॅकिंग सामग्री द्वारे इतर खंडांमध्ये प्रवेशित झाला. 1995-96 च्या दरम्यान या कीटकांचा शिरकाव अमेरिकेमध्ये झाला आणि आत्तापर्यंत त्यांनी या प्रजातीने तेथील स्थानिक असलेल्या वेगवेगळया प्रकारच्या महत्त्वाच्या झाडांवर कब्जा केलेला आहे आणि याच्या याच्या नियंत्रणाचा वार्षिक खर्च शेकडो

दशलक्ष डॉलर पेक्षा जास्त आहे. हे भुंगेरे 2001 मध्ये पहिल्यांदा युरोपमध्ये आढळून आले आणि तेव्हापासून दहा युरोपियन देशांमध्ये त्यांचा उद्रेक आढळून आला.

**भुंगेऱ्यांची सद्यस्थिती**

जैवविविधतेच्या निकषानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये या कीटकांची विविधता चांगली आहे. एच. व्ही. घाटे (2012) यांनी केलेल्या नोंदणी नुसार आणि झूलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया यांनी प्रकाशित केलेल्या यादीनुसार भुंगेऱ्यांची महाराष्ट्रात एकूण संख्या 59 इतकी होती. मात्र या संख्येत सिंधुदुर्गच्या संशोधनाने भर घातली आहे. हेदुळकर आणि भारमल (2022) यांच्या संशोधनानुसार आतापर्यंत 17 पेक्षा जास्त प्रजातींची नोंद झाली, ज्यामध्ये काही अज्ञात प्रजातींची नोंद देखील आहे. यातही महत्त्वाचे म्हणजे सिंधुदुर्गात तीन नवीन प्रजातींची नोंद नव्याने केली गेली, त्या अशा *Epepeotes uncinatus, Cyrtonops punctipennis* आणि *Stibara nigricornis*. नोंद केलेल्या आकड्यानुसार जिल्ह्यातील भुंगेरे म्हणजेच खोडकिडे जगाच्या (34518) व भारताच्या (1562) एकूण भुंगेऱ्यांच्या संख्येत 0.04 व 1.04 टक्के आहेत. तसेच त्यांचा महाराष्ट्राच्या एकूण संख्येच्या जवळ जवळ पाव टक्के वाटा आहे. जगभरात या खोडकिड्यांची एकूण आठ उपकुळे आहेत. त्यातील चार उपकुळांच्या नोंदी सिंधुदुर्ग सापडतात.

*Stromatium barbatum* ही खादड प्रजाती सिंधुदुर्गात आढळते. या प्रजातीचे कीटक जगभरातील 300 पेक्षा जास्त प्रकारच्या विविध झाडांना प्रादुर्भाव करतात. यांची संख्या सिंधुदुर्गात बऱ्यापैकी आहे सागाच्या झाडांना देखील हे कीटक आपले लक्ष बनवतात. काजू पिकांवर सर्वात आढळणारा *Neoplocaederus ferrugineus* देखील येथे आढळतो. एका संशोधनुसार भारताच्या पूर्व व पश्चिम प्रदेशात यांची लागण होण्याची शक्यता 40% आहे व तसे झाड दोन वर्षात मरू शकते. निलगिरी आंबा बाभूळ इत्यादींवर प्रादुर्भाव करणारे भुंगेरे *Celosterna scabrator* हा देखील आढळतो. *Stromatium* नंतरची आणखी घातक प्रजाती *Aeolesthes holosericea* देखील मोठ्या प्रमाणात नोंदणी गेली. ही प्रजाती वेगवेगळ्या वीस प्रकारच्या कुळांतील वनस्पतींचा बंदोबस्त करते, यावरून आपल्याला त्यांच्या प्रादुर्भावाची तीव्रता लक्षात येते! आंबा झाडाला पोखरणारी व किमान इतर 50 झाडांचा फडशा पाडणारी *Batocera rufomaculata* तसेच *Batocera rubus* यांचे अस्तित्व देखील या भागात आढळते. महत्त्वाचे म्हणजे आसाम, म्यानमार, सुमात्रा तसेच हिमालयाच्या भागात आढळणाऱ्या Cyrtonops punctipennis ची नोंद सिंधुदुर्गाच्या विविध भागातून केली. *Rhaphipodus subopacus* आणि *Prionomma atratum* या भुंगेरांच्या प्रजाती देखील बऱ्यापैकी या भागात आढळतात. *Acanthophorus serraticornis* सारख्या तळ हाताच्या लांबी इतक्या आकाराच्या प्रजातीची नोंद प्रजातीचे अस्तित्व सर्रास आढळते.

एका सर्वेक्षणानुसार आंबा, अर्जुन, साग तसेच अकेसिया सारखी झाडे फर्निचरच्या कामासाठी वापरली जातात. मात्र लाकूड गिरणी किंवा फर्निचर बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये किंवा दुकानांमध्ये बऱ्या प्रमाणात लाकडे या कीटकांनी प्रभावित झालेली आढळतात. तेथे या भुंगेऱ्यांचं नियंत्रण काही किरकोळ पारंपारिक प्रकार वापरून केले जाते. अन्यथा खराब झालेले फर्निचर लाकूड बाद केले जाते.

पृथ्वीवरील प्रत्येक सजीव परिसंस्थेमध्ये सहभागी असतो, म्हणून आपल्या पृथ्वीतलावर असणारी जैवविविधता टिकवणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी त्या त्या ठिकाणची वनस्पती किंवा प्राण्यांची नोंद असणे गरजेचे असते. या भागातील काही महत्त्वाची फळपिके देणारी झाडे वगळता या प्रजातीच्या कीटकांचा तितकासा अभ्यास झालेला दिसत नाही. या हेतूने सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील सर्वच झाडांना उपद्रवी अथवा परिसंस्थेचा दृष्टीकोनातून फायदेशीर असणाऱ्या सर्व भुंगेऱ्यांच्या प्रजातींचा अभ्यास केला पाहिजे, तरच येथील स्थानिक जैवविधतेची खरी ओळख होण्यास मदत होईल.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपारिक मच्छीमारी: समस्या आणि उपाययोजना

**सुखदा मंगेश जांबळे**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड, जि.सिंधुदुर्ग

Corresponding author E-mail: jambalesm.dc@gmail.com

कोकणी खाद्य संस्कृतीचा अविभाज्य घटक भाग म्हणजे समुद्रामधून प्राप्त होणारे माशांचे धन. हे मासे म्हणजे मच्छीमारांचे केवळ अन्नाचे साधन नाही तर उपजीविकेचे साधनही आहे. पारंपारिक मच्छिमार आता यांत्रिकीकरणामुळे समस्यांनी पुरता वेढून गेला आहे. सर्वांनाच यांत्रिक नौका वापरणे शक्य नाही आणि अशा वेळेला आर्थिकदृष्ट्या यांत्रिक नौका न परवडणाऱ्या गरीब मच्छीमारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यामध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सद्यस्थितीमध्ये वापरण्यात येणारी आधुनिक यंत्रणा; मग ती जाळयांच्या संदर्भात असो की बोटींच्या संदर्भात. या दृष्टीने विचार करायचा झाल्यास अलीकडच्या काळामध्ये पर्सीन नेटधारक व पारंपारिक मच्छिमार यांच्यातील लढा एक महत्त्वाचा भाग आहे. पर्सीननेटमुळे मोठ्या माशांबरोबरच लहान मासे देखील पकडले जातात. त्यामुळे ते विणीच्या वयापर्यंत पोहोचू शकत नाहीत. अर्थातच पुढच्या पिढीच्या माशांची संख्या कमी होत जाते. पर्सीन नेटधारकांना परवाने देण्यात आले आहेत. परंतु बिगर परवानाधारकसुद्धा मच्छीमारी करताना आढळून येतात. एवढेच नव्हे, तर शेजारच्या राज्यातील मच्छीमारसुद्धा मच्छीमारीसाठी आपल्या क्षेत्रामध्ये, सिंधुदुर्गमध्ये प्रवेश करतात. अर्थातच आपल्या मच्छीमारांचे उत्पन्न कमी होते, म्हणून या लढ्याची तीव्रता फारच वाढली. यासंदर्भात अलीकडेच वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्या अगदी बोलक्या आहेत. यामध्ये हा महत्त्वाचा प्रश्न आणि मच्छीमारांमधील संघर्ष अधोरेखित केला आहे. पारंपारिक मच्छीमारांमधील आणि पर्ससीननेट धारकांमध्ये वादामुळे ‘किनारपट्टी असंतोषाने खदखदतेय’ अशा शीर्षकाखाली दै. सकाळच्या 13 नोव्हेंबर 2023 च्या आवृत्तीमधे या प्रश्नाला वाचा फोडण्यात आली आहे. पारंपारिक मच्छीमारांना न्याय मिळण्यासाठी कायद्याची निर्मिती तर झाली पण जशी त्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे होती ती मात्र झाली नाही. त्यामुळे पारंपारिक मच्छीमार आणि पर्ससीननेटधारक यांच्यामध्ये संघर्ष पुन्हा एकदा निर्माण झाला. हा प्रश्न तसा जुनाच आहे. 2017-18 पासूनचे माझे या बाबतीत संशोधन लेख मच्छिमारांच्या मुलाखती व प्रश्नावली या माध्यमांतुन संकलीत माहितीच्या आधारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रात प्रसिद्ध झाले आहेत.

अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यासाठी मत्स्य व्यवसाय खाते असमर्थ ठरले आहे राज्यकर्त्यांची अनास्था आहे, प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, अशा प्रकारचे आरोप होत आहेत. या सर्वात भरडला जात आहे तो सर्वसामान्य पारंपारिक मच्छिमार.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता मालवण, देवगड आणि वेंगुर्ले या तालुक्यांमध्ये पिढ्यानपिढ्या रापण लावली जात आहे. या पारंपरिक व्यवसायावर सुमारे 40 हजाराहून अधिक कुटुंबे आपला उदरनिर्वाह करत आहेत. गुण्यागोविंदाने चाललेल्या या मच्छीमारीच्या व्यवसायामध्ये काही वर्षांपूर्वी पर्ससीननेटने मासेमारी करण्याची पद्धत सुरू झाली. त्याचबरोबर परप्रांतीय हायस्पीड पर्ससीननेटधारक या किनाऱ्यावर धुमाकूळ घालू लागले आहेत. अनधिकृतपणे चालणाऱ्या या मच्छीमारी व्यवसायावर मत्स्य व्यवसाय विभागाने काही प्रमाणात नियंत्रण आणले. दरवर्षीच्या मत्स्य हंगामात निसर्गाने आपल्या पदरात घातलेल्या विपुल मत्स्य संपत्तीच्या जोरावर आपली रोजी रोटी कमावणारे पारंपारिक मच्छिमारांना मात्र परप्रांतीय हायस्पीड बोटी, पर्ससीननेट ट्रॉलर्स, तसेच एलईडी लाईटच्या सहाय्याने मासेमारीला सुरुवात झाल्यामुळे पारंपारिक मच्छीमारांना संघर्ष करणे भाग पडले. या परप्रांतीयाबरोबरच काही स्थानिकही पर्ससीननेटधारक बनले अर्थातच त्यामुळे संघर्षाची धार वाढत गेली. पर्ससीन नेट हे एखाद्या मोठ्या पिशवीच्या किंवा बॅगेच्या आकारासारखं असतं. माशांचा थवाच्या थवा, आडवा आणि उभा कव्हर करण्याची क्षमता या जाळयामध्ये असते. जाळयाची लांबी जवळजवळ 450 मीटर आणि खोली किंवा उंची 40 ते 45 मीटर एवढी असते. सर्वात मोठ्या पर्ससीन नेटचं वजन साधारणपणे एक ते दीड टन एवढं असतं तर मिनी पर्ससीननेट वजनाला कमी असतात. जाळयाची मेश साईज सर्वत्र सारखी असते. एका वेळेला

जवळपास 80 हजार ते 1 लाख रुपयाचे मासे पकडले जातात. या प्रकारच्या जाळयांनी सर्व प्रकारचे मासे लहान पिल्लांपासून ते मोठ्या अंडी घालणाऱ्या माशांपर्यंत पकडले जातात. छोटे मासे पकडले गेल्यामुळे आणि अनिर्बंध नियमबाह्य ऑपरेशन्समुळे मोठ्या प्रमाणावर शाश्वत विकासावर परिणाम होत आहे.

पर्ससीननेट धारकांची वाढणारी संख्या, हायस्पीड ट्रॉलर्स, एलईडी द्वारे होणारी मच्छीमारी यामुळे पारंपारिक मच्छीमारांना क्षमत्स्य दुष्काळाला सामोरे जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे. त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न आला. 11 फेब्रुवारी 2020 ला दांडी समुद्रकिनारी मत्स्यदुष्काळ परिषद आयोजित केली होती. सर्वांचा परिणाम म्हणून पारंपरिक मच्छीमारांना असंख्य अडचणीने पुरते घेरून टाकले.

या समुद्री संघर्षावर उपाययोजना म्हणून शासनाने पारंपारिक मच्छीमारांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी करण्यात आली. या मागणीला अनुसरून 2011 मध्ये डॉ. सोमवंशी समिती स्थापन केली गेली. या समितीच्या शिफारसीनुसार महाराष्ट्र शासनाने 5 फेब्रुवारी 2016 रोजी अधिसूचना जारी करत पर्ससीननेटधारकांच्या मच्छीमारीवर काही निर्बंध लागू केले. या निर्बंधानुसार परवानाधारक पर्सीननेटधारकांच्या संख्येवर निर्बंध घातले गेले. राज्यातील पर्ससीननेट परवाना धारकांची संख्या 476 वरून 182 वर आणली जावी अशी एक महत्त्वपूर्ण सूचना डॉ. सोमवंशी समितीने केली. मात्र याबाबत अजूनही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. डॉ. सोमवंशी समितीच्या शिफारसीनुसार राज्यांमधील पर्ससीननेट परवानाधारकांची संख्या कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने गोपाळ कृष्ण समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. राज्यातील परवानाधारक पर्ससीन नौकांची संख्या 182 पर्यंत आणायचे असेल तर पंधरा वर्षे होऊन गेलेल्या लाकडी तसेच वीस वर्ष होऊन गेलेल्या लोखंडी पर्सिनेटनेट नौकांचे परवाने रद्द केले जावेत. अशी सूचना गोपाळकृष्ण समितीच्या वतीने शासनाला केली आहे. त्यानुसार शासनाकडून या सूचनेची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

सुरुवातीच्या काळात सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी हद्दीत गोवा, मलपी, कर्नाटक येथील हायस्पीड पर्ससीननेट टॉलर्स पारंपारिक मच्छीमारांच्या जाळयातील मासळी घुसखोरी करून लुटून नेत होते, याला आळा घालण्यासाठी स्थानिक मच्छीमारांनी आक्रमक भूमिका घेतली. त्याचा परिणाम म्हणून या परप्रांतीय ट्रॉलर्स वर मत्स्य व्यवसाय विभागाकडून कडक कारवाई करण्यात आली त्यामुळे गेल्या काही वर्षात जिल्ह्याच्या सागरी हद्दीमध्ये या ट्रॉलरची घुसखोरी बऱ्यापैकी कमी झाली आहे.

परकीय राज्यातील घुसखोरांबरोबरच आता जिल्ह्यामध्ये सुद्धा अनधिकृत पर्ससीननेट व एलईडी ट्रॉलर धारक आहेत. या अनधिकृत मच्छीमारी विरुद्ध पारंपारिक मच्छीमारांकडून आवाज उठवल्यानंतरही लोकांवर कारवाई केली जात नाही असे दिसून आले आहे. राज्यातील अनधिकृत पर्ससीननेट व एलईडी मासेमारीवर कारवाईसाठी राज्याने अधिसूचना या आधी जाहीर केली आहे. ही अधिसूचना तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या काळामध्ये झाली होती परंतु सद्यस्थितीमध्ये ही मच्छीमारी रोखण्यासाठी प्रयत्न कमी पडत आहेत. यास्तव पारंपारिक मच्छीमारांना जर खऱ्या अर्थाने न्याय मिळवून द्यायचा असेल तर आपल्या राज्य शासनाला या कायद्याची कठोर अमलबजावणी करणे आवश्यक आहे. तळाशील येथील घटनेनंतर पारंपरिक मच्छीमार अधिकच आक्रमक बनत चालले आहेत. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने तसेच अनधिकृत पर्ससीननेट धारक नौकांची तपासणी तसेच त्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. मत्स्य व्यवसाय खात्याकडून डिसेंबर २०२३ पर्यंत याबाबतची कार्यवाही न झाल्यास जानेवारी २०२४ नंतरच्या सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकू असा निर्णय या पारंपारिक मच्छीमार बांधवांनी जाहीर केला आहे.

तळाशील येथील घटनेनंतर जागृत झालेल्या आक्रमक अशा पारंपारिक मच्छीमारांनी त्यानंतर सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाला धडक देत अनधिकृत पर्ससीननेट नौकांवर कारवाई करण्यास भाग पाडले. परंतु त्यावेळी तीन अनधिकृत ट्रोलर्स पैकी एका ट्रॉलरला पकडण्यात मत्स्य व्यवसाय विभागाला म्हणजेच त्यांच्या गस्तीनौकेला यश मिळाले. याचा अर्थ मत्स्यव्यवसाय खात्याच्या कारभारावर पारंपारिक मच्छीमारांनी प्रश्न निर्माण केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी हद्दीत अनधिकृत मच्छीमारी करणाऱ्या लोकांना पकडण्यासाठी अत्याधुनिक हाय स्पीड गस्तीनौकेची मत्स्य व्यवसाय खात्याला गरज आहे. मात्र मत्स्य हंगाम सुरू झाल्यानंतरही ही गस्ती नौका उपलब्ध झाली नाही. पारंपारिक मच्छीमारांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर मत्स्य व्यवसाय

विभागाने गतवर्षीची गस्ती नौका तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून दिली. सद्यस्थितीमध्ये या गस्तीनौकेवरूनच जिल्ह्याच्या तिन्ही तालुक्यात गस्त घातली जात आहे. तळाशील घटनेनंतर पारंपरिक मच्छीमार अधिकच आक्रमक बनल्याने स्थानिक आमदार यांनी मत्स्य व्यवसाय आयुक्त यांचे लक्ष वेधले. मत्स्य व्यवसाय आयुक्त यांनी डिसेंबर मध्ये हायस्पीड गस्ती नौका जिल्ह्याला उपलब्ध करून दिली जाईल असे आश्वासन दिले आहे. तात्पर्याने मत्स्य हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात गस्ती नौका उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे त्याचा उपयोग काय आणि किती असा प्रश्न उपस्थित होत आहे. एक प्रकारे अनधिकृत मच्छीमारीला हे प्रोत्साहनच ठरणार आहे. त्यामुळे तातडीने हाय स्पीड गस्ती नौका जिल्ह्याला उपलब्ध होणे आवश्यक आहे.

**उपाययोजना**

**1**. सागरी परिसंस्थेच्या तसेच मत्स्य संसाधनाच्या शाश्वत विकासासाठी कायद्यांचे योग्य प्रकारे पालन होणे आवश्यक आहे. पारंपारिक मच्छिमार दहा फॅदमच्या पुढे मच्छीमारी करू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या मर्यादेमध्ये यांत्रिक मच्छीमारी होणार नाही व नियमांचे योग्य प्रकारे पालन होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**2.** बेकायदेशीरपणे कमी मेस साईज असणारी जाळी वापरली जाणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. नाहीतर मत्स्य दुष्काळाला सामोरे जाण्याची परिस्थिती निर्माण होईल. 2025 पर्यंत अनिर्बंध मच्छीमारी झाल्यास व नियम धाब्यावर बसवल्यास मत्स्य दुष्काळाची वेळ आपणा सर्वांवर येईल. पर्ससीननेटसारख्या जाळयांमध्ये सर्व प्रजातीचे तसेच सर्व आकाराचे लहान व मोठे मासेही पकडले जातात. त्यामुळे माशांच्या पुढच्या पिढ्या नष्ट होत आहेत. जागतिक मत्स्य संघटनेच्या नवी दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेमध्ये 2014 मध्ये मत्स्य साठे 2025 पर्यंत कमी होण्याची शक्यता वर्तवलेली आहे. देवगडच्या संदर्भात बोलायचे झाले तर आठ-नऊ वर्षांपूर्वी बळा मासा मोठ्या प्रमाणावर पारंपारिक मच्छीमारांना रापणीमध्ये मिळत असे ज्याच्या संख्येमध्ये सद्यस्थितीत लक्षणीय घट झालेली आहे.

**3**. महाराष्ट्र मच्छीमारी कायद्यानुसार (1981)पारंपरिक मच्छीमारांना दहा फॅदमच्या खोली बाहेर मच्छीमारी करता येत नाही तसेच पारंपरिक मच्छीमार सकाळी चार पाच तास आणि संध्याकाळी चार पाच तास फक्त मच्छीमारी करतात. त्या कालावधीत यांत्रिक नौकांनी त्यांच्या सागरी हद्दीत मच्छिमारी करू नये. देवगड परिसरामध्ये पारंपरिक मच्छीमारी कुणकेश्वर, मीठमुंबरी, कातवण, तांबळडेग व विजयदुर्ग येथे रापण जाळयांचा वापर करून मोठ्या प्रमाणामध्ये टनांपर्यंत उत्पादन घेतले जात होते. परंतु गेल्या काही दशकांमध्ये रापणीमध्ये मिळणाऱ्या उत्पादनामध्ये बरीच घट झालेली दिसून येते. याकरता नियमानुसार 20 फॅदमच्या बाहेर पर्सेनेट वापरले जाईल व नियमांचे व कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होईल याकडे मत्स्य विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे.

**4.** 1 जून ते 31 जुलै या मत्स्य बंदीच्या कालावधीमध्ये मच्छीमारी पूर्णपणे थांबणे आवश्यक आहे. नाहीतर विणीच्या हंगामामध्ये बेकायदेशीर लहान मेस साईज असणाऱ्या जाळयांमध्ये छोटे मासे नष्ट झाल्यामुळे पुढील काही दशकांमध्ये या प्रजाती नष्ट होण्याचा धोका संभवतो. राज्य सरकारने उचललेल्या काही महत्त्वाच्या सकारात्मक पावलांमध्ये 1 जून ते 31 जुलै व त्यानंतरही 15 ऑगस्ट पर्यंत हवामानाच्या परिस्थितीनुसार मत्स्यबंदी कालावधी ठरवून दिलेला आहे. याच कालावधीमध्ये व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठरणाऱ्या मत्स्य प्रकारांचे विणीचे हंगाम येतात. नैतिकतेच्या दृष्टीने प्रत्येक मच्छीमाराने पुढील माशांच्या पिढ्या जगवायच्या असतील तर शासकीय कायदे आणि नियम यांचे योग्य प्रकारे पालन केले आणि जबाबदारीने वागल्यास मत्स्य व्यवसायावरती असणाऱ्या समस्यांचे जाळे निश्चितच कमी होईल.

**5.** डॉ. सोमवंशी समितीच्या शिफारसीनुसार राज्यांमधील पर्ससीननेट परवानाधारकांची संख्या कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने गोपाळ कृष्ण समिती स्थापन केली. या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. राज्यातील परवानाधारक पर्ससीन नौकांची संख्या 182 पर्यंत आणायचे असेल तर पंधरा वर्षे होऊन गेलेल्या लाकडी तसेच वीस वर्ष होऊन गेलेल्या लोखंडी पर्सिनेटनेट नौकांचे परवाने रद्द केले जावेत. अशी सूचना गोपाळकृष्ण समितीच्या वतीने शासनाला केली आहे. त्यानुसार शासनाकडून या सूचनेची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**6.** खाड्यांच्या मुखाशी साचलेला गाळ हा आणखीन एक महत्त्वाचा अडथळा मच्छीमारीसाठी आहे. गाळ साचून पाण्याची खोली कमी झाली आहे . गाळ आणि वाळू मुळे होड्या नांगरण्यास आलेली अडचण दूर करण्यासाठी गाळाचा उपसा होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. वसावे सुहास, अर्पिता शर्मा, संगीता वसावे आणि साईप्रसाद सावंत (2015). कॉनफ्लिक्स इशूज इनफिशरीज अँड देयर मॅनेजमेंट मेजर्स इन स्टेट ऑफ महाराष्ट्र इंडिया, ए पीअर रिव्यूड प्रोसिडिंग ऑफ इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन इथिकल, प्रोस्पेक्ट्स, इकॉनोमी सोसायटी अँड एनवोर्मेन्ट ISBN-987-93-830-4646-1

**2.** डॉ. सौ.सुखदा मंगेश जांबळे (2018). अ केस स्टडी ऑन सोसिओ इकॉनोमिक प्रॉब्लेम्स फेस बाय लोकल फिशरमेन इन देवगड तहसील ऑफ सिंधुदुर्ग डिस्ट्रिक्ट महाराष्ट्र, Ajanta, Vol VII, Issue- IV October- December-2018

3. डॉ. सौ.सुखदा मंगेश जांबळे, डॉ. मंगेश जांबळे (2020). ए ब्रिफ स्टडी ऑन कोस्टल बायोरिसोर्सेस इन रिलीव्हन्स टू सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन देवगड तहसील सिंधुदुर्ग डिस्ट्रिक्ट, इंटरनॅशनल मल्टी डिसिप्लिनरी कॉटनरी रिसर्च जनरल Vol 9, Issue- 3, AJANTA जुलै-सप्टेंबर 2020

4. डॉ. सौ.सुखदा मंगेश जांबळे (2019). स्टडीज ऑन क्राफ्टस अँड गिअर्स युज फॉर मरीन फिशिंग ऑपरेशन्स ऑन देवगड कोस्ट सिंधुदुर्ग, इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲडव्हान्स अँड इनोव्हेटिव्ह रिसर्च, Vol 8, Issue - 8(6) August 2019

5. दैनिक तरुण भारत 6 जानेवारी 2024 सिंधुदुर्ग पान 3

6. दैनिक सकाळ 13 नोव्हेंबर 2023 सिंधुदुर्ग पुरवणी पान 1

# गाबीत समाज: सांस्कृतिक आणि सामरीक परंपरा

**प्रिती प्रथमेश सारंग**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
Corresponding author E-mail: vengurlekaryl.dc@gmail.com

**प्रस्तावना**

कोकण किनारपट्टीवरील गाबीत समाज हा सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा असणारा समाज आहे. मच्छीमारी हा जरी परंपरागत व्यवसाय असला तरी या समाजाला क्षात्र परंपरेचा दैदीप्यमान वारसादेखील लाभलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेमध्ये या समाजाचे मोठे योगदान असून मराठा आरमार बांधण्यात आणि त्याला लढाऊ स्वरूप देण्यात सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्हयातील गाबीत समाजाचे योगदान सर्वाधिक आहे. सामाजिक आणि सामरीक परांपरेसोबतच या समाजाला समृद्ध सांस्कृतिक वारसादेखील लाभलेला आहे. हा समाज उत्सवप्रिय असून धार्मिक आहे. समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, धार्मिक प्रथा आणि उत्सव अजूनही तेवढ्याच जोमाने सुरू आहेत. गाबीत समाजाच्या ऐतिहासिक वारसा, सामाजिक, सामरीक, धार्मिक तथा सांस्कृतिक परंपरेचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखात केलेला आहे.

कोकण प्रदेशातील किनारपट्टीत वास्तव्य करणा-या विभिन्न जाती जमातीतील गाबीत ही प्रामुख्याने दर्यावर्दी व्यवसाय करणारी जमात असून, ती 'रजपूत' आणि 'मराठा' कुळांतून निर्माण झाली आहे. 'गाबीत' हे 'घुराब' नावाच्या लढाऊ जहाजावरून प्रचारात आलेले जातीचे नाव आहे. घुराब हे जहाज दोनशे ते तीनशे टनांपर्यंत मालवाहतुकीसाठी वापरले जात असे. शिवपूर्वकाळात या जहाजाचा वापर आरमारी नौकांच्या ताफ्यात करण्यात येऊ लागला. बंदूका आणि तोफांचा मारा घुराबांवरून करता येत असल्याने या जहाजांचा आरमारात मोठा दबदबा निर्माण झाला. वृत्तीने धाडसी, कल्पक, आणि युद्धकौशल्यात प्रवीण अशा लढवैय्यांच्या नेमणुका घुराबांवर केल्या जात असत. शिवपूर्वकाळात देशावरून कोकणात उतरलेल्या सैनिकीवृत्तीच्या, सशक्त, क्षत्रिय मराठा समाजातील शूरवीरांच्या नेमणुका प्रामुख्याने गुराबांवर करण्यात आल्या. या मराठ्यांनी कोकणपट्टीतील आरमार विशेष लौकिकास आणल्यामुळे या मराठ्यांना 'घुराबकर' म्हणून ओळखले गेले. हेच घुराबकर पुढे गाबीत म्हणून सर्वपरिचित झाले. घुराब - गुराब - गुराबकर - गुराबीत - गाबीत अशा अपभ्रंशाने गाबीत हे जातीचे नाव घुराब्रावरूनच सिद्ध झाले आहे.

इ.स. १५६४ मध्ये गाबीत हे जातीनाम म्हणून प्रचारात आले नव्हते; असे दिसते. इ.स. १५६४ साली विजापूरकरांचे सरदार श्री भान्जी प्रभुदेसाई यांनी गावकी हक्कासंबंधी दिलेले एक निवाडापत्र मालवण मालडीचे प्रभुगावकर मालंडकर गाबीत प्रभूतांडेल यांच्या घराण्याकडे आहे. या संबंधीची ऐतिहासिक माहिती अशी आहे: प्रभुगावकर - मालंडकर घराण्यातील श्री. दुलाजी दुदजी (गणेश) प्रभुगावकर याने गाव मालोंड व बेलाचीवाडी (तालुका मालवण) या दोन गावांची गावकी हक्काची सनद विजापूरकरांकडून मिळविली होती. विजापूरकरांकडे श्री. दुलाजी दुदजी हा सरदार होता. मालोंड गावचे मूळ मानकरी प्रभू, पारकर वाणी, घाडी, पोतेकर, तोरस्कर, कुळकर्णी ब्राह्मण व महार असे होते. परंतु गावकी हक्कासंबंधी वाद उत्पन्न होऊन प्रकरण विजापूरकरांकडे गेले. तेव्हा श्री भान्जी प्रभुदेसाई यांनी गावकीतील प्रभुगावकरांचा पहिल्या मानाचा हक्क शाबीत करणारे निवाडापत्र दिले. त्यात प्रभुगावकरांचा हक्क सांगताना, 'आदिपटांतीलक्रम पुरातन भोगवटे मौजे मालोडी येथील मतमान चालीले आहेत. पहिला मतमान परभुमराठा' असे म्हटले आहे. त्यावरून आज गाबीत म्हणून परिचित असलेले प्रभुगावकर-मालंडकरांचे घराणे इ.स. १५६४ मध्ये, 'परभु मराठा' म्हणून ओळखले जात असे. याचा अर्थ असा, की 'गाबीत' हे जातीचे नाव म्हणून त्यानंतर प्रचारात आलेले आहे. म्हणजे साधारणपणे, इ.स. १५५० ते इ.स. १६३० या सत्तर ते ऐशी वर्षांच्या कालखंडात मराठ्यांनी गुराबांवर विशेष कामगिरी केल्यामुळे ते गुराबकर म्हणून लौकिकास पोहोचले आणि गाबीत म्हणून जातिनावाने ओळखले गेले, असे दिसते. [1]

गाबीत समाजाचा अभ्यास करताना असे दिसते की, इ.स. १६३३ पूर्वीच गाबीत जातीचा बोलबाला झाल्याचा ऐतिहासिक कागद उपलब्ध झाला आहे. देवगड-जामसंडे येथे रहाणा-या राम ठाकूर या व्यक्तीला देवगड येथील, 'गाबीत मुमरी' या गावात

राहणाऱ्या एका गाबताने आपली जमीन विकली म्हणून तयार करण्यात आलेले जमिनीचे विक्रीखत साळशी दफ्तरातील २७ नंबरचा हा कागद पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाकडे उपलब्ध आहे. या जमिनीच्या विक्रीखतावरून इ.स. १६३३ पर्यंत गाबीत हे जातीचे नाव म्हणून कोकणप्रदेशात सर्वतोमुखी झालेले होते.

शिवपूर्वकालीन कोकण किनारपट्टीतील आरमारी परंपरेचे निरीक्षण केले असता, गाबीत मंडळींचा खूप मोठा दरारा निर्माण झालेला आढळतो. कुणकेरीच्या नागोजी सावंत यांच्या घराण्यातील तान सावंत (गाबीत), हे सावंतवाडीकर वाडकर सावंतभोसले यांच्या आरमारावर ज्येष्ठ अधिकारी होते. शिवाजी महाराजांचे मराठ्यांचे आरमार तोपर्यंत कोकणकिना-यावर उभे राहिले नव्हते. शिवाजी महाराजांचे कोकण किनारपट्टीवर इ.स. १६५३ साली मालवणला आगमन झाले तेव्हा तान सावंत शिवाजी महाराजांना जाऊन भेटले. शिवाजी महाराजांच्या विनंतीवरून ते महाराजांच्या सेवेत रुजू झाले. कोकण किनाऱ्यावरील आरमार मजबूत करण्यासाठी महाराजांनी मालवणला सिंधुदुर्ग किल्ला बांधण्याचा विचार पक्का केला. महाराजांच्या कल्पनेतील आरमाराची रचना करण्यात तान सावंतांचा मोठा सहभाग होता.

श्री. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांच्या 'श्री शिवाजी महाराजांचे चरित्र' या ग्रंथात बांद्याचे श्री. गणोजी देसाई-तांडेल-तारी उर्फ गणबा तारी यांनी तेरेखोल खाडीत पोर्तुगीजांचा पाडाव करण्यासाठी जी मदत शिवाजी महाराजांना केली त्या पराक्रमाची कथा वर्णन केली आहे. गणबा तारीं यांच्या या पराक्रमाबद्दल त्यांना बांदे येथील काही जमीन शिवाजी महाराजांनी बक्षीस दिली आहे. त्याच काळात सुभानजी खराडे, रुद्राजीराव खराडे, भाऊ रावजी कुर्ले, घारबा चव्हाण बानवलकर, बाबाजी कडू-नाईक, चांदोजी कडू-नाईक, तुळाजी कडू-नाईक, हे सरदारसुद्धा विशेष लौकिक मिळवून होते. सुभानजी शिवाजी महाराजांच्या आरमारात ज्येष्ठ सरदार होते. इ.स. १६८० साली महाराजांचे देहावसान झाल्यानंतर छत्रपती संभाजीराजांनी राज्यकारभार हाती घेतला आणि महत्वाच्या ज्या आरमारी नेमणुका केल्या, त्यात सुभानजी खराडे मालवण राजकोट किल्ल्याचे मुख्य सरदार म्हणून नियुक्त झाले होते. यांच वेळी पिलाजी धवळे-ढवळे, विठ्ठल आडाव हे सिंधुदुर्ग किल्ल्यावर सरदार होते. लिंगोजी नाईक कासकर शाहू महाराजांकडे सरदार होते. त्यांचे चिरंजीव रवळोजी लिंगोजी नाईक-कासकर पेशव्यांकडे घोडदळ अधिकारी होते. नारोजी नाईक-कासकर विजयदुर्गावर आरमारी अधिकारी होते. जुवे - जैतापुरचे मालोजी फडके (दुसरे) हे पेशव्यांकडे आरमारी अधिकारी होते. त्यांना विजयदुर्ग येथील पाटीलकी बहाल करण्यात आलेली होती. त्यांच्या बरोबरीने त्रिंबकजी पोवळा-सरपोळे, हेही आरमारात होते.

**कोकणच्या गाबीत समाजाची व्याप्ती**

अरबी समुद्र व सह्याद्री यांच्या दरम्यान पसरलेला उत्तरेकडील दमणपासून दक्षिणेकडील गोव्यापर्यंतचा शंभर किलोमीटर रूंदीचा आणि सातशे किलोमिटर लांबीचा प्रदेश हा प्राचीन काळापासून कोकण प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांनी मिळून कोकण प्रदेश ओळखला जातो. दक्षिण कोकणचा भाग हा सिंधुदुर्ग जिल्हा म्हणून ओळखला जातो. सिंधुदुर्ग जिल्हा हा वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, दोडामार्ग, व सावंतवाडी या आठ तालुक्यांनी मिळून बनला आहे तर लोकसंख्या ८,४८,८६८ इतकी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पूर्वेला कोल्हापूर जिल्हा आहे. तर पश्चिमेला अरबी समुद्र आहे. दक्षिणेला गोवा राज्य असून उत्तरेला रत्नागिरी जिल्हा आहे.

अलिकडे कोकण प्रदेशात पारंपरिक व्यवसायाबरोबर अन्य व्यवसाय देखील केले जात आहेत. औद्योगिकीकरणाचे प्रमाण कमी असल्याने या प्रदेशातील लोकांना पारंपरिक शेती, बागायती, दुग्धव्यवसाय, मासेमारी यावरच अवलंबून रहावे लागते. कोकणात हिंदूधर्मीय लोकसमूहाबरोबर मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध या धर्माचे लोकसमूह मोठ्या प्रमाणात वास्तव्य करून आहेत. गाबीत समाजाची वस्ती आरमारी व दर्यावर्दी व्यवसायाच्या सोयीसाठी प्रामुख्याने किल्ला, समुद्र आणि खाडीच्या आश्रयाने राहत असलेली आढळते. रत्नागिरी, हर्णे, बाणकोट, जुवे जैतापूर, वडप, सागवे, आंबेरी, मनचे, विजयदुर्ग, गिर्ये-बांदेवाडी, वाडातर, वीरवाडी, पीरवाडी मळई, देवगड किल्ला, तारामुंबरी, मिठमुंबरी, मिठबाव-तांबळडेग, मोर्वे, आचरे, सर्जेकोट, मालवण, वेंगुर्ले, मोचेमाड, टाक, शिरोडा, ओरोंदे, तेरेखोल या ठिकाणी गाबीत वसाहती पाहायला मिळतात.

**गाबीत समाजाची वस्ती**

गाबीत समाजाची मुख्य वस्ती गोवा राज्य व सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. अलिकडे स्थलांतरामुळे अल्पप्रमाणात गुजरात, कर्नाटक राज्यात आढळते. गाबीत समाजाची सांस्कृतिक परंपरा मोठी आहे. गाबीत समाजाचा मुख्य व्यवसाय मच्छिमारीचा आहे. मासेमारी व्यवसायामुळे समुद्रकिनाऱ्यावर नवीन गाबीत वसाहती उभ्या राहिल्या. आता पारंपरिक पद्धती बरोबरच आधुनिक पद्धतीने मासेमारी केली जाते, त्यामुळे समाजात परिवर्तनाला सुरूवात झाली आहे. अलिकडे गाबीत समाजाला आर्थिक सुस्थिती लाभली आहे. मासेमारी व्यवसायाबरोबर इतरही व्यवसाय करण्याकडे तरुणांचा कल वाढत आहे.

**गाबीत समाजाच्या घरांची रचना**

गाबीत समाजातील घरे पूर्वी दुपाखी व झावळ्यांची (नारळाच्या झाडाची विणलेली पाने) असत. घराचा पाया हा लाल चिकणमाती आणि दगडाचा चौथरा बांधून बनवलेला असायचा व त्यावर कुडाच्या (झावळ्याच्या) भिंती उभ्या केलेल्या असत. माडाचे वासे काढून त्यावर दुपाखी व चौपाखी रचना करून नळे किंवा कौले घातलेली असत. कोकणात पावसाचे प्रमाण अधिक असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्यापूर्वी घराची झडी झावळांनी नव्याने बंदिस्त केली जात असे. झावळ्यांची घरे बहुतेक स्वतःच उभी केलेली असतात. मातीची कौलारू घरे गवंडी आणि सुताराकडून बांधून घेतलेली असतात.

घराची रचना साधारणपणे बाहेरची पडवी, ओटीघर (लोटा), मधला खण (वळई), स्वयंपाकाचा खण (चुलीचा खण) आणि देवघर (देवाचा खण) अशी असे. प्रत्येक घरासमोर तुळशीचे वृंदावन असतेच. स्वयंपाकासाठी मातीची, अल्युमिनियमची, व तांब्या-पितळेची भांडी वापरली जातात. घरात पैसे, दिवा, इतर वस्तू ठेवण्यासाठी भिंतीत त्रिकोणी आकाराची बोवली, कपाटे असतात. कपडे अडकवण्यासाठी खुंटया असतात. अलिकडे अनेक गाबीत समाजबांधव सिमेंट/कॉंक्रीटची, स्लॅबची घरे आधुनिक पद्धतीने बांधत आहेत. बऱ्याच गावातून विद्युतीकरण झालेले दिसून येते.

**गाबीतांचे भोजन**

गाबीत समाजात आहारात तांदळाचा भात व माशाची कढी (आमटी/ निस्त्याक) हे मुख्य अन्न असते. त्याच बरोबर नाचणीची, तांदळाची भाकरी, कुळथाची पिठी, सुके खारवलेले मासे, तोंडी लावायला पालेभाजी, तसेच कडधान्ये अधूनमधून वापरली जातात. उकडया तांदळाची पेज, नाचणीच्या शेवया, तांदळाच्या पिठाचे घावणे, सणासुदीला कोंबडीचे मटण (सागुती)-वडे किंवा आंबोळया असे भोजनाचे स्वरूप असते. जेवणानंतर कोकम कढी (सोलकढी) आवर्जून घेतली जाते, अलिकडे भोजन, खाणे-पिणे यातही बदल झालेला दिसतो.

**गाबीत समाज - नियम आणि देवता संकल्पना**

**तीर्थयात्रा:** सर्व गाबीत घराणी हिंदू धर्माचे पालन करतात. काहीजण वारकरी संप्रदायाचे अनुयायी आहेत. काही घराण्यात पंढरीची वारी करण्याची वंशपरंपरागत प्रथा आहे. आषाढी किंवा कार्तिकीला पंढरीची वारी होते. काही घराण्यात समर्थ संप्रदायाची (रामदासी पंथ) उपासना केली जाते.

**सांस्कृतिक:** विविध देवादिकांचे पूजन गाबीत समाजात केले जाते. गाबीत समाजाचे जीवन मासेमारीवर अवलंबून असल्यामुळे समुद्र, अग्नी, नौका यांची पूजा करण्याची पद्धत आहे. याशिवाय कुलदेवता, ग्रामदेवता म्हणून भराडी, सातेरी, भद्रकाली, पावणाई, भैराई, वाडेगती, चौंडेश्वरी, दिर्बादेवी, इ. देवतांची आदिशक्ती म्हणून पूजा करतात. तर रवळनाथ, रामेश्वर, शंकर, विठ्ठल, राम, कृष्ण, हनुमान यासारख्या देवतांची पूजा केली जाते. या देवतांचे वार्षिकोत्सव साजरे केले जातात. विहीर, तलाव यासारख्या जलदेवतांची पूजा करण्यात येते. वड, पिंपळ, तुळस, उंबर, इ. वनस्पतींची पूजा विधिपूर्वक केली जाते. तसेच या वनस्पतींमध्ये औषधी गुणधर्म असल्यामुळे त्यांची जोपासना केली जाते. तुळशीजवळ कृष्ण देवाचे वास्तव्य असते. या समजुतीने रोज तिची यथासांग पूजा केली जाते. कार्तिक शुद्ध एकादशीला तुळशीचे लग्न लावण्यात येते. घराण्याच्या कुलदैवतेने प्रसन्न व्हावे म्हणून तिचा गोंधळ घालून होमहवन करतात.

**विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन:** शिवलीला, रामरक्षा, शनिमहात्म्य, गणपती स्तोत्र यांचे नैमित्तिक वाचन काही मंडळी करतात. श्रावणात हरीविजय, भक्तिविजय, महाभारत, नवनाथ भक्ति कथासार यासारख्या धार्मिक ग्रंथाचे सामूहिक वाचन, पठण करतात. आषाढी कार्तिकी एकादशीस ग्रामदेवतेसमोर नामसप्ताह, जागर केला जातो. दिंडी काढणे, नाटक, दशावतार इ. समारंभ होतात. आपल्या संस्कृतीचे जतन गाबीत समाजाने केले आहे.

**गाबीत समुदायाची धार्मिक संकल्पना:** श्री रामेश्वर, श्री रवळनाथ या देवदेवता गाबीत समाजाच्या लोकश्रद्धेचा भाग आहेत. ग्रामदेवता, कुलदेवता अशा देवताविषयक संकल्पना असल्यामुळे त्यांचीच मंदिरे कोकणात सर्वत्र आढळतात. दसरा, दिवाळी, जत्रोत्सव त्याचप्रमाणे इतर वार्षिक उत्सव साजरे केले जातात. प्रत्येक कुटुंब आपल्या कुलदेवतेची पूजाअर्चा करणे महत्त्वाचे मानतात. सदर देवदेवतांची देवस्थाने जागृत देवस्थाने म्हणून आपले महत्त्व लोकमानसात राखून आहेत. या सर्व देवता भूताखेतांपासून, रोगराईपासून, लोकपरिवाराच्या अडचणींचे निराकारण व आपले संरक्षण करतात; अशी लोकसमजूत कोकण परिसरात रूढ झालेली आहे. उदाहरणार्थ, घरातील शुभकार्यप्रसंगी, लग्नसमारंभात, नामकरण विधीत, कुलदेवतेला अनन्यसाधारण महत्त्व असते. शुभकार्याला आरंभ करण्यापूर्वी कुलदेवता, ग्रामदेवता यांचे पूजन करण्याची लोकरीत आहे. त्यामुळे गाबीत समाजात देवदेवतांवरील व त्यांच्या कार्यावरील लोकांचा विश्वास आधुनिक काळातही टिकून आहे.

**गाबीत समाजाचे सण- समारंभ:** गाबीत समाजात हिंदूचे सारे सण थाटामाटात साजरे केले जातात. चैत्रशुद्ध प्रतिपदा या दिवशी घरोघरी गुढ्या उभारल्या जातात. त्याच प्रमाणे रामनवमी हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जातात. आषाढ महिन्यात अनेक ग्रामदेवतांच्या देवळात आषाढी एकादशीपासून हरिनामाचा गजर होतो. श्रावण महिन्यात अनेक मंदिरात पोथ्यांचे श्रवण-पठण होते. ग्रंथपारायण सांगता होते. त्या दिवशी ग्रामभोजन देण्याची प्रथा आहे.

- **नागपंचमी**

नागपंचमीचा सण श्रावण महिन्यात घरोघरी साजरा केला जातो. मातीच्या नागाची पूजा केली जाते. त्यावेळी भिंतीवर नागोबाचे चित्र रंगवितात. तांदळाच्या लाह्या, दूध यांचा नैवेद्य नागोबाला दाखवितात. त्यादिवशी लाकडे फोडणे, पदार्थ तळणे, जमिनीवरून तण उपटणे या गोष्टी वर्ज्य असतात. संध्याकाळी नागोबाचे अळुच्या पानाखाली विसर्जन करतात. नागपंचमीला मुली, स्त्रिया फुगड्या घालतात. उदा. "आंबा पिकतो, रस गळतो, कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो" अशी गाणी गायली जातात.

- **नारळी पौर्णिमा**

नारळी पौर्णिमा हा सण गाबीत समाजाचा अत्यंत महत्त्वाचा सण होय. श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी गळयात जान्हवे घालण्याची प्रथा आढळते. देवालाही जान्हवे (पोवते) वाहण्याची प्रथा आढळते. सकाळी देवाची भक्तीभावाने पूजा केली जाते. नारळी भात किंवा नारळाच्या करंज्या किंवा उकडीचे मोदक करून दुपारी देवाला नैवेद्य दाखविला जातो. संध्याकाळी सागराची पूजा करून जलदेवतेच्या नावाने सागराला नारळ अर्पण करण्यात येतो. प्रथम गावदेवतेचे वारेसुत्र सागरास नारळ अर्पण करते. नंतर इतर मंडळी सागरास नारळ अर्पण करतात. काही ठिकाणी या कालावधीत नारळ लढविण्याची प्रथा आहे. समुद्रातील तुफान, वादळे शांत व्हावीत व पाऊस काळाला ओहोटी लागावी, हा त्यामागचा हेतू असतो. या दिवशी समुद्रकिनाऱ्यावर होड्यांची पूजा केली जाते. त्यानंतर होड्या, गलबते समुद्रात लोटली जातात. मुली, स्त्रिया पारंपरिक पद्धतीने या दिवशी फुगड्या घालून आनंदाने नारळी पौर्णिमा उत्सव साजरा करतात.

- **गणेश चतुर्थी**

भाद्रपद महिन्यात गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या थाटामाटाने साजरा केला जातो. घराला रंगसफेती करण्यात येते. भिंतीवर कमळ रंगविले जाते. अलिकडे निरनिराळे सुरेख देखावे उभे केले जातात. सकाळ-संध्याकाळ सांघिक आरती, भजन केले जाते. दीड, पाच, सात, नऊ, अकरा, एकवीस दिवस प्रथेप्रमाणे आणि ऐपतीप्रमाणे हा सण साजरा केला जातो.

- **होळी पूजन**

फाल्गुन महिन्यात शिग्मा (शिमगा) म्हणजे होळीचा सण विविध प्रकारे साजरा केला जातो. कोकणातील विविध जाती-जमाती आपापल्या पद्धतीने शिग्मोत्सव साजरा करतात. परंतु गाबीत समाजमंडळी मात्र घुमट वाजवून फाग गाऊन हा सण साजरा करतात. होळी पूजनाबरोबरच शिग्माखेळ, दशावतार, नृत्यनाट्याचे सादरीकरण गावातील मांडावर होत असते. फाल्गुन वद्य प्रतिपदेदिवशी होळी पूजन होते. ही होळी माडाची, आंब्याची पोफळीची किवा सरळ झाडांच्या फांदीची असते. होळीच झाड तोडण्यापूर्वी त्याची ब्राम्हणा करवी पूजा केली जाते. नंतर ती तोडून ढोल, ताशा, घुमटे, वाजत- गाजत नाचत होळी गावात आणली जाते. ती माडी (होळी) मांडावर उभी करतात. अगोदर मांडावर पाच फेरे मारतात. होळीची पूजा होते. पुरणपोळीचा नेवैद्य दाखवला जातो आणि होळी प्रज्वलीत केली जाते. यावेळी तोंडावर हात मारून बोंब मारतात. होळी पूजन व जाळताना सोंगे घेऊन काही लोक होळीभोवती नाच करतात.

**संस्कृतीची जोपासना**

गाबीत समाजाचे सर्वेक्षण केले असता असे दिसते, की गेल्या सत्तर-ऐंशी वर्षांपासून गाबीत समाजात परिवर्तनाला सुरुवात झालेली आहे. मासेमारीचा व्यवसाय आता गाबीत मंडळी पारंपरिक पद्धतीबरोबर आधुनिक पद्धतीने करीत आहेत. शासनाकडून मासेमारीकरिता अनेक योजना राबवल्या जात आहेत, त्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळत आहे. ठिकठिकाणी मत्स्योद्योग संस्था स्थापन करून त्याद्वारे प्रगती करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झपाट्याने सुरू झाल्याने, गाबीत समाजातील मुले, मुली मोठ्या प्रमाणात सुशिक्षित होऊन मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक अशा शहरांच्या ठिकाणी, तर काही परदेशी स्थलांतरीत होत आहेत. शासकीय व निम-शासकीय कार्यालयांमध्ये गाबीत मंडळी कार्यरत आहेत. युद्धनौका बांधणीच्या परदेशातील प्रशिक्षणासाठी अनेक गाबीत तरुणांची भारत सरकारने निवड केली आहे. अनेक गाबीत युवक उच्चविद्याविभूषित होऊन मोठ्या संख्येने अधिकाराच्या पदावर विराजमान झालेली आहेत. स्पर्धापरीक्षा, संगीत, क्रीडा क्षेत्रात उत्तम यश संपादन करीत आहेत. असे असूनही या सुशिक्षित युवकांनी आपल्या गावाचा ओढा कायम जपलेला आहे. गावच्या सण-उत्सवात ही मंडळी आनंदाने सहभागी होतात. गणेशोत्सव, शिग्मोत्सव, जत्रोत्सव या उत्सवात गाबीत समाजातील सर्वच लोकांनी आपली संस्कृती जोपासलेली आहे.

**संदर्भ**

1. कुबल, रमेश. (१९८३). गाबीतः क्षत्रिय आरमारी घराण्याचा इतिहास. मुंबई
2. कुबल, रमेश.,सारंग, अंकुश (२००३) कोकणचा गाबीत शिग्मोत्सव. ठाणे : अपर्णा प्रकाशन.
3. सारंग, अंकुश,सामंत,उज्वला. (२०२३) गाबीत समाज आणि फागगीते. मुंबई. ललित प्रकाशन.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सण-परंपरा वारश्याचे वेगळेपण

**सुमेधा नाईक**

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण, सिंधुदुर्ग

Corresponding author E-mail: sumedhanaik2@gmail.com

---

सिंधुदुर्ग जिल्हा हा तळकोकण म्हणून ओळखला जातो. तळकोकणातल्या सण-उत्सवाना त्या-त्या गावाची अशी एक परंपरा असते. एक दिमाख असतो. काही परंपरा थेट मातीचे नाते सांगणा-या असतात. देवाच्या नावाने वसुंधरेशी जोडले जाणारे असतात. मी एक मातीचा भाग आहे. या मातीतूनच मला माझी निर्मिती करायची आहे आणि या मातीतच मी संपणार आहे, हा भाव आपल्याला अनेक सण आणि परंपरांमध्ये दिसून येतो.

वर्षाची सुरुवात होते चैत्र पाडव्याच्या सणाने. चैत्र महिन्यातील पहिल्या दिवशी गुढी उभारून हा सण साजरा केला जातो. यातील वेगळेपण म्हणजे चिवारणीच्या गुढीला खास सोनचाफ्याच्या फुलांची माळ घातली जाते. इथे ही बांबूची काठी देखील आदल्या दिवशी आपापल्या परिसरातून आणली जाते. शेतीची अनेक अवजारे बनवण्यासाठी बांबूचा उपयोग होत असतो. ह्या सणाच्या निमित्ताने बांबूची जोपासना केली जाते. पाडव्याच्या आधी अंगण म्हणजे खळे शेणाने सारवले जाते, त्यावर कनो घातला जातो. कनो म्हणजे तांदळाच्या पीठाची तीन बोटांनी घातली जाणारी रांगोळी, जी सारवलेल्या जमिनीवर उठून दिसत असते.

श्रावण महिना म्हणजे सणांची मांदियाळी असते, पण तत्पूर्वी स्वच्छतेच्या उदेशाने निर्माण केलेली प्रथा म्हणजे देसरुड**.** श्रावण महिना सुरू व्हायचा 15 दिवस अगोदर म्हणजे आषाढ पौर्णिमा झाली की कुठल्याही एक दिवस ठरवून गावातील प्रत्येक घर हे झाडून साफ करून कचरा बाहेर टाकला जातो. त्या कचऱ्यातुन घरातील क्लेश बाहेर जावा हा उद्देश असतो. गावातील संरक्षक शक्तीला हाक दिली जाते. गावसीमा खुल्या करून वाईट शक्तींना वेताळाच्या ताब्यात दिले जाते. वाईट शक्ती कैद करण्यासाठी ठेवलेली पेटी देसरूढीचा सर्व विधी करून भुतावळ तृप्त करून पहाटे ही पेटी बंद केली जाते. हा विधी करत असताना गावसीमेच्या बाहेर कोणी जात नाही. प्रत्येक गावची पद्धत जरी वेगवेगळी असली तरी उद्देश मात्र एकच असतो. कि रयत सुखी राहावी. वर्षभर जमा झालेले क्लेश, पीडा, वैमनस्य, क्रोध, वाईट विचार, याचे सर्वांचे प्रतीक असलेली भुतावळ दूर करणे आणि मनाची स्वच्छता करणे हा या परंपरेचा गर्भितार्थ.

काही गावात आषाढी अमावस्या तर काही ठिकाणी संक्रांतीच्या आधी देवळासमोर चिखल केला जातो, त्यात वेगवेगळे खेळ खेळतात, चिखलफेक करतात. त्याला भल्ली भल्ली भावय असे म्हणतात. हाताच्या कोपराने श्रीफळ शोधून काढण्याचा खेळ मजेशीर असतो. होळीकडील दगड उचूलन आपली ताकद आजमावण्याचा प्रयत्न देखील करतात. सायंकाळी उशिरा काठीला रुमाल बांधून शिवकळा काढली जाते. काहीना नवस फेड करायची असेल तर ती केली जाते. नन्तर प्रतिकात्मक शिकारीचा खेळ खेळला जातो.

नागपंचमी सणाला अळवाच्या पानावर नागोबाच्या मूर्तीची पूजा केली जाते. लाह्या दुधात मिजवून, त्यात गुळ, खोबरे घालून नैवेद्य दाखवला जातो. प्रत्येक घरात नागोबाचे चित्र हल्ली टाइल्स असतात, तिथेच ही पूजा केली जाते. नागोबाला जानवे घातले जाते. घरातील पुरुष देखील जानवे घालतात. अळवाच्या पानावरील रंगीत नागोबाची मूर्ती सुंदर दिसत असते. संध्याकाळी अळवाच्या मुळाशी नागोबाचे विसर्जन केले जाते. माणसाच्या मनातील सापाविषयी भीती कमी करण्याच्या दृष्टीने ही परंपरा महत्वाची वाटते. त्या निमित्ताने परसात अळूचे बेटदेखील जोपासले जाते.

नारळी पौर्णिमा म्हणजेच पोवत्याची पौर्णिमा. या दिवशी देवाला पोवते बांधण्याची पद्दत रूढ आहे. पावसाळयात काही काळासाठी बंद ठेवलेल्या मत्स्यव्यवसायाची पुन्हा सुरुवात नारळी पौर्णिमेला होते. समुद्रात नारळ टाकुन समुद्रदेवतेची यथासांग पूजा केली जाते. नारळीपौर्णिमेला नारळ लढविण्याची स्पर्धा असतात. आपण दुस-याच्या हातातील नारळावर एक जोरात फटका मारायचा

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

आणि मग तो आपला प्रतिस्पर्धी दुसरा फटका आपल्या हातातील नारळावर मारणार आणि कोणताततरी एक नारळ फुटेपर्यंत आळीपाळीने असे नारळावर फटके मारत राहायचे. शेवटी ज्याच्या हातातील नारळ फुटेल त्याने तो नारळ विजेत्याला बहाल करायचा. एका नारळाने दहा -दहा पंधरा- पंधरा नारळ सुद्धा फोडले जातात .

श्रावण महिन्यात वद्य अष्टमीला रात्री कृष्णाचा जन्म झाला. म्हणून या अष्टमीला 'गोकुळाष्टमी' असे म्हणतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यात बाळकृष्णाच्या मातीच्या मूर्तीची साग्रसंगीत पूजा करतात. त्याला गोकुळ पूजणे असे म्हणतात. कृष्णाला आवडणारी तुळशीपत्रे, कमलपुष्पे अर्पण करतात. त्याला दह्यादूधाचा नैवेद्य दाखवतात. त्याला आवडणारी शेवग्याच्या पाल्याची भाजी आणि पोळीये म्हणजे आंबोळ्या केल्या जातात. गोकुळ अष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहिहंडीचा म्हणजेच गोपाळकाल्याचा कार्यक्रम जोरात असतो. यावेळी फोडलेल्या दहिहंडीचा तुकडा जर घरात ठेवला तर घरात दुधदुभत्याची कमतरता पडत नाही अशी श्रद्धा आहे. यावेळी दहिकाल्याचा प्रसाद उपस्थित सर्वांना वाटला जातो. हा सण आपल्याला कोणतेही काम एकजूटीने केले तर ते सहज साध्य होते अशी शिकवण देतो. देवळाकडे पाणी टाकून चिखल करतात. त्यात विष्णूच्या दहा अवतारांचा खेळ खेळतात.

गणपतीच्या सणाच्या आदल्या दिवशी येतात हरतालका. हरताळकेच्या आदल्या दिवशी सर्व घर आवरले जाते, त्याला आवरना म्हणतात, तेव्हाच घरातील स्त्रियांचा उपवास सुरु होतो, तो गणपतीला फुल घातल्यावरच संपतो. उपवासाला फक्त शहाळी आणि केळी खाल्ली जातात, ती देखील भाऊ आणून देतो. कुमारिका व विवाहित महिला हरताळका पूजन करतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वात मोठा सण म्हणजे गणेशोत्सव अर्थात गणपती. गणपतीचा सण सुरु होण्याचा काही दिवस आधीच ज्या मूर्तिकारांकडे परंपरेने आपला गणपती घडवला जातो, त्यांच्या कडे लाकडी पाट नेऊन देण्याची पद्धत आहे. त्याच वेळी आपल्याला कशी मूर्ती हवी आहे, याची चर्चा देखील मूर्तिकारासोबत केली जाते. काही मुले तर गणपती शाळांमध्ये गणपती रंगविण्यासाठी देखील दरवर्षी जात असतात. सध्याच्या काळात जे ग्राहकानुवर्ती धोरण राबविले जाते, त्याचे हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपारिक उदाहरण आहे. नंतर तयारी सुरु होते, सजावटीची. ज्या भिंतीजवळ गणपती बसवायचा आहे, त्या भिंतीवर चित्रे काढली जातात, विशेष करून भूमितीचा अचूक वापर करून कमळे काढली जात त्याला कमळ मोडणे असे म्हणतात. गणपती येण्याच्या आदल्या दिवशी माटवीची तयारी केली जाते. या माटवीला माटी, माटोळी, मंडपी असेही विविध गावात म्हटले जाते. एका लाकडी चौकटी मध्ये शंकरपाळी सारखी लाकडी पट्ट्यांची रचना केलेली असते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सडे ह्या भाद्रपद महिन्यात छोट्या रानफुलांनी सजलेले असतात. यातील वेगवेगळी रानफुले, पाने, फळे आणून आकर्षकरित्या माटीवर बांधली जातात. ती बांधण्यासाठी केवणीचा दोर वापरला जातो. पिवळी धम्मक हरणाची फुले, लाल बुंद कवंडाळे, फिकट पोपटी रंगाची शेरवडा, गुलाबी तेरड्याची फुले, केशरी रंगाची बेड्याची म्हणजेच सुपारीची शिपटे, झाडावरून खास उतरलेला नारळ, रानात पिकवलेली काकडी, दोडकी, भेंडी अश्या हिरव्या फळभाज्या, पिवळाधमक केळीचा घड, आणि मध्यभागी आंब्याचा टाळ अस सगळं माटवीवर बांधून झालं कि गणपती आणण्याची तयारी झालीच समजावी. ही माटवी सजवणे देखील कौशल्याचे काम असते.

कोकणात चतुर्थीच्या दरम्यान खूप वेळा पाऊस हजेरी लावत असतो, त्यामुळे गणपतीवर वस्त्र घालून झाकून मूर्ती घरी आणण्याची पद्धत आहे. गावागावात घाटी उतरत अनेक घरात गणपती येऊन विराजमान होतो. त्यामुळे डीजे आणि मिरवणूक हा प्रकार शहरातील मोजके सार्वजनिक गणपती वगळता गावात अगदी विरळाच. चतुर्थीच्या पहिल्या दिवशी काही घरात पंचवीस तर काही घरात पाच भाज्या केल्या जातात. अळूच्या गाठींची भाजी, लालभाजीच्या मुळांची भाजी पहिल्या दिवशी केली जाते. घरात गणपतीबाप्पाला रोज सण केला जातो म्हणजेच गोडधोड केले जाते. इथले गोडाचे पदार्थ देखील बहुतांश गुळापासून बनवले जातात, मोदक, तांदळाची खीर, मालपोवे, ओल्या खोबऱ्याच्या करंज्या, गोडाचे घावणे, असे पदार्थ केले जातात. गणेश चतुर्थीच्याच्या दुसऱ्या दिवशी उंदीरबीज म्हणजे हुंदरपी साजरी करतात. या दिवशी उंदीर मामाचा मान मोठा. त्याला तांदळाच्या खिरीचा नैवेद्य दाखवला जातो. त्याच दिवशी ऋषी पंचमी देखील असते. स्त्रियांनी शेतीची सुरुवात केली याचे प्रतीक म्हणजे ही ऋषी पंचमी. या दिवशी बैलाच्या श्रमाचे अन्न स्त्रिया खात नाहीत, असा प्रघात आहे. त्यामुळे सुरण, रताळी, कणगी, आर्वी अशी कंदमुळे, भोपळा, अळू, जाड देठासह लाल माठ या पालेभाज्यांची पाने, दोडकी, पडवळ, भेंडी, काकडी, लाल भोपळा या सारख्या फळभाज्या, मक्याची बोंडे,

ओले शेंगदाणे, अंबाडीची फळे किंवा चिंच, आमसुले, फणसाच्या जपून ठेवलेल्या आठळ्या, असा सगळा मेवा एकत्र करून ऋषीची भाजी बनवली जाते. गणपतीच्या सणामध्ये गोडाधोडाइतकेच किंबहुना अधिकच महत्त्व या भाज्यांना दिले गेले आहे.

गौरीचा सण देखील अनोख्या पद्धतीने सिंधुदुर्ग जिल्ह्यात साजरा केला जातो. गणपतीच्या तिसऱ्या अथवा चौथ्या दिवशी संध्याकाळी गौरी आवाहन केले जाते. तुळशीकडे: हळद, तिरडा, आघाडा, हरणा, लाल माठ या पाच वनस्पती मुळासह रानातून आणून धाग्याने बांधून उभी करून ठेवतात. दुस-या दिवशी सकाळी रोवळी मधून वाडीतील बायका एकत्र येऊन गौरी आणतात. जवळच्याच विहिरीवरून पूजा करून गौरी भरून आणतात. गौर घरात आणताना हळदीची पावले जमिनीवर काढली जातात. गौरीसमोर वाडीतील स्त्रिया एकत्र येऊन फुगडीचे खेळ खेळतात. फुगड्यांचे हौशी आणि व्यवसायिक संघ देखील आता ठिकठिकाणी तयार झाले आहेत. मालवणी भाषेतील फुगडी गीते ऐकायला मजा येते.

गौरीचा "ववसा किंवा ओवसा" हा यातला एक विशेष कार्यक्रम. लग्न झाल्यावर पहिल्या गणेश चतुर्थीला माहेरी जाऊन गौरीसाठी हा ववसा करतात. वंशवृद्धीसाठी केली जाणारी ही पूजा. आणि चांगले बीज पोटी यावे असेल तर पौष्टिक खाल्ले पाहिजे, ह्या हेतूने अनेक भाज्यांचा या वोवश्यामध्ये समावेश असतो. पूर्वी ववसा भरण्यासाठी लागणारी सुपं गावातीलच पारंपरिक कारागीर घरी आणून द्यायचे. त्या साहित्याच्या बदल्यात पुढे भात पिकलं की 'पायली' च्या प्रमाणात भात देण्याची प्रथा होती. आता पैशाचा व्यवहार केला जातो. ववसा हा बांबूपासून वळलेल्या सुपांमध्ये भरतात. परिसरात उपलब्ध असलेल्या भाजीच्या वेलांची पाने यासाठी वाण म्हणून वापरतात. पडवळ, दोडकी, भोपळा, काकडी, करांदे, यांसारख्या वेलांची पाने चटईवर मांडतात. प्रत्येक पानाला हळद कुंकू वाहून प्रत्येक पानात पडवळ, दोडके, भेंडी, करांदा, काकडी यांसारख्या फळांच्या फोडी ठेवून भरलेली पानं सुपांमध्ये भरून गौरीसमोर ठेवतात. गौरी गणपतीसमोर मानवून घेतलेले ववसे स्त्रिया किंवा नवविवाहित जोडपी उचलून सुपातील वाणं त्यांच्या नातेवाईकांना वाटतात. नातेवाईक या ओवश्यात काही ना काही रक्कम आशीर्वाद म्हणून देतात. गौरी विसर्जन करताना पालेभाजी व भाकरीचा नैवेद्य दाखवला जातो. जिथून गौरी भरल्या, तिथेच त्यांचे विसर्जन केले जाते. ती पाच वनस्पतींची मुळे तिथे विहिरीच्या बाजूलाच ठेवली जातात, निसर्गातून आणलेल्या गोष्टी पुन्हा निसर्गात लय पावतात. पालेभाजी आणि भाकरीचा एकेक तरी तुकडा वाडीतल्या प्रत्येक घरात वाटला जातो, आनंदाने गौरीचा प्रसाद म्हणून खाल्ला जातो.

सामूहिक आरत्या आणि भजन हे इथल्या गणपती सणाचे मोठे वैशिष्ट्य आहे. वाडीतील सर्व पुरुष मंडळी एकत्र येऊन प्रत्येक घरी आरती आणि भजनासाठी जात असतात. मुंबईहून आलेले चाकरमानी आणि गावातील रहिवासी यांचे एक प्रकारचे स्नेहसंमेलनच असते हे. रात्री भजन आले कि त्यांना नाश्ता, चहा दिला जातो. त्यासाठी खास करंज्या/न्हेवरे केले जातात. हल्ली उसळपाव, पाव भाजी असे पदार्थ पण करतात. उभ्याने भजन, वारकरी भजन, बसून भजन असे विविध प्रकार आढळतात. रात्री भजनाला जाताना सगळेजण मिळून पायपेटी, इत्यादी सामान घेऊन जातात, लहान थोर सगळे एकमेकांना सांभाळून घेतात. मुलं हे सर्व लहानपणापासून बघतच असतात आणि मोठी झाली कि जबाबदारीने रोज भजनाला जातात. त्यांच्या सामाजिकीकरणामध्ये ह्या सामूहिक भजनाचा मोठा वाटा आहे.

सिंधुदुर्गात दीड दिवसाचा गणपती काही सुवेर, सुतक असते तेव्हाच असतो, अन्यथा पाच, सात, नऊ, अकरा दिवस ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणे, कुवतीनुसार किंवा परंपरेनुसार गणपती ठेवला जातो. काही ठिकाणी अगदी सतरा दिवस, एकवीस दिवस आणि एकावन्न दिवस देखील बाप्पा विराजमान असतो. एकूणच चतुर्थीच्या सणात इथला प्रत्येक माणूस भारलेला आणि प्रत्येक घर चैतन्याने भरलेले असते.

अकराव्या दिवशी अनंत चतुर्दशी हा भगवान महाविष्णूंच्या अनंत व्रताचा दिवस. या दिवशी अनंताची पूजा केली जाते. यात विष्णूसोबतच गंगा आणि विष्णुचं वाहन शेष नाग यांचीसुद्धा विशेष पूजा यादिवशी केली जाते. काही ठराविक घरात हे व्रत पूर्वापार चालत आलेल असल्यामुळे त्या त्या घरी ही पूजा होते. पण सगळ्याच घरी अनंताच्या पूजेची पद्धत सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाही. अनंत चतुर्दशी दिवशी वाडीतील सर्वांना जेवायला बोलवले जाते, त्याला म्हामदा/म्हामणे असे म्हणतात. जेवणकराना आदल्या दिवशी निमंत्रणे जातात. तांदूळ पीठाचे खमंग वडे आणि काळ्या वाटण्याचा सांबारा ही म्हामद्याच्या जेवणाची खासियत. ह्या सणाच्या मध्येच

संकष्टी, एकादशी आल्यास त्या दिवशी विसर्जन केले जात नाही. काही घरात गणेशोत्सवात संकष्टी असल्यास सगळ्या गावाला जेवण दिले जाते. संध्याकाळच्या सुमारास विसर्जनाची तयारी सुरु होते. गणपती समोर गाऱ्हाणे घातले जाते. केलेली सेवा मान्य करून घे, चुकल माकल तरी गोड मानून घे, असे साकडे देवाला घातले जाते. पुन्हा एकदा आरती करताना प्रत्येकाचा आवाज जड झालेला असतो. गणेश मूर्ती खळ्यात काढलेल्या कमळावर आणून ठेवली जाते. घरची कर्ती स्त्री, घरन गणपतीच्या पायावरील शेवान/तांदूळ आपल्या पदरात घेते. ते आणून आपल्या घरातील तांदळाच्या साठ्यात टाकते, आपल घर धान्याने समृद्ध राहावे, अशी या मागील भावना असते. एका केळीच्या पानाच्या पुरचुंडी मध्ये दही पोह्याची शिदोरी गणपतीच्या हाती दिली जाते. गावातील नदी किंवा वहाळावर वाडीतील सर्व गणपती विसर्जनासाठी रांगेने बाहेर पडतात, ते दृश्य अत्यंत विलोभनीय दिसते. विसर्जन केल्यावर पाण्यातील पाच खडे आणि गणपतीच्या मूर्तीची थोडीशी माती पाटावर ठेऊन जड मनाने सगळे घरी परतात. निर्मिती आणि विलयाचे चक्र सांगणारा हा गणेशोत्सव निसर्गपूजक आणि पर्यावरणपूरक असल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याचे महत्वाचे वैशिष्ट्य ठरतो.

अनंत चतुर्दशी झाली कि सुरु होते म्हाळवसाची तयारी. पितृपक्ष, म्हाळ घालणे, महालय वंशश्राद्ध अश्या वेगवेगळया नावानी म्हाळ ओळखले जाते. आपल्या पितरांचे स्मरण करण्यासाठी अन्नदान केले जाते. पिंडाची पूजा केली जाते, नंतर पिंड नदीमध्ये विसर्जन केले जाते. आमंत्रित केलेल्या जेवणकरी, सवाष्णी यांना मानाने हातावर पाणी घातले जाते, आकीत (गंध आणि अक्षता) लावला जातो, जेवल्यावर मुखशुद्धी म्हणून काकडी दिली जाते, विडा देतात, सन्मान म्हणून भेटवस्तू देतात, बायकांची ओटी भरतात आणि पाच पावले सोडायला देखील जातात.

घटस्थापनेच्या दिवशी रुजवाण घातले जाते. वेगवेगळी धान्ये एका मातीच्या भांड्यात मातीत पेरली जातात, एक प्रकारचे हे माती, जल, बियाणे परीक्षण असते. दसऱ्या दिवशी हे रुजवाण स्त्रिया डोक्यात माळतात, आणि आयुधाना देखील पूजा करतात वाहिले जाते. नवरात्रात ललिता पंचमीची पूजा काही विशिष्ठ घरात केली जाते. पूजेसाठी केळीच्या मोन्याचे आकर्षक रूपातील मखर साकारले जाते. ४८ विडे या पूजेसाठी मांडले जातात. ४८ जेवणकर, ४८ सवाष्ण, ४८ कुमारिका ह्या पूजेसाठी बोलाविल्या जातात. १०८ देवी नामावली सांगत असताना ४८ दुर्वांची एक जुडी अशा ४८ जुड्या किंवा १०८ जुड्या पूजेवर वाहिल्या जातात. गाव-हाटी मधील बारा बलुतेदार याच्याशी कदाचित ह्या ४८ आकड्याचा संबंध असावा.

सार्वजनिक दसरा उत्सव हे देखील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दसरा सणाचे वेगळेपण आहे. सगळा गाव गावातील देवळात जमतो. तिथे तुळशीकडे देवाचे लग्न लावले जाते, नंतर सोने लुटले जाते, मग ते सोने देवाला वाहिले जाते, आणि नंतर एकमेकांना वाटले जाते. आपट्याची झाडे त्या साठी जोपासली जातात. शहरी पद्धतीने बाजारातून पाने विकत आणली जात नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक गावात दसऱ्या दिवशी नया करण्याची परंपरा आहे. नव्या पिकाची पूजा करून थोड्या भाताच्या लोम्ब्या काढल्या जातात, घराच्या दरवाज्याला, विहिरीला, गोठ्याला ह्या नव्या भाताचे आणि आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. या दिवशी तांदळाची खीर करताना नव्या भाताचे काही दाणे त्यात टाकले जातात, त्या खिरीच्या टोपाला देखील तोरण बांधले जाते. एखाद्या घरात नवे केले नसल्यास त्या घरात इतरांना जेवता येत नाही, अशी पद्धत आहे.

भातकापणी झाली की शेतकरी, गुराख्यानां वेध लागतात ते 'गवळदेव'चे. दरवर्षी गवळदेवाचे जेवण आणि पूजा करण्याचे प्रत्येक गावातील विशिष्ट ठिकाण ठरलेले असते. गावातील लगतच्या जंगलात अथवा डोंगराळ भागात जिथे जवळच एखादा पाणवठा असेल असे हे ठिकाण असते. हल्ली गुरांढोरांची संख्या कमी झाली असली तरीही सिंधुदुर्गात ही 'गवळदेव' परंपरा उत्साहाने पाळली जाते. सगळी मंडळी मिळून गवळदेवाच्या ठिकाणाची साफ़सफाई करून तिथे मातीचा वाघोबा बनवून त्याची पूजा करतात. रानात चरणाऱ्या आपल्या गुराढोरांचे, गुरं राखणाऱ्या माणसांचे रक्षण व्हावे, असे ह्या वाघोबाला साकडे घातले जाते. नंतर तिथेच सगळे मिळून वनभोजनाचा आनंद लुटतात. हे जेवण देखील एकत्र सगळे मिळून बनवतात. जेवल्यावर वाघोबाला पकडण्याचा रोचक खेळ सुरु होतो. एकजण वाघोबासारखे रंगीत पट्टे अंगावर काढून वाघोबा बनतो, मातीच्या वाघोबाला पाच प्रदक्षिणा घालतो आणि रानात पळून जातो. जवळच्या पाणवठ्यावर जाईपर्यंत तो तडाख्यात सापडला तर सगळ्यांचा शेण गोळ्यांचा मार ह्या वाघोबाला खावा लागतो. शेणगोळे चुकवत वाघोबा जंगलात पळत असतो आणि लोकांच्या 'वाघ रे वाघ, धरा-मारा'चे हाकारे-कुकारे सुरू असतात.

एकदा वाघोबा पाण्यावर पोचला कि मग मारा थांबतो. वाघोबाच्या वाडीवरील/नैवेद्यावरील नारळ, पैसे त्याला मिळतात. निसर्गाच्या सान्निध्यात चालणारा हा मजेशीर स्नेह मेळावा असतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दिवाळी झगमगाटाची नसते, ह्या दिवाळीत चावदिसला आणि पाडव्याला जास्त महत्त्व असते. नरक चतुर्दशी म्हणजे चावदिस. ह्या दिवशी पहिली अंघोळ म्हणजेच अभ्यंग स्नानकरून कारीट नावाचे कडू फळ पायाच्या अंगठ्याने फोडले जाते. ते फोडताना गोविंदा गोविंदा असा गजर केला जातो. हिवाळ्यात पोटाचे विकार दूर करणारा सातवीणच्या म्हणजेच सप्तपर्णीच्या सालीचा रस आधी प्यावा लागतो आणि मग आपल्या शेतातील भाताचे कुटून आणलेले पोहे गुळात मिसळून केलेले गुळ पोहे, तिखट पोहे, उकडलेली रताळी असा फराळ केला जातो. भल्या पहाटे शंकासूर दहन करण्याची देखील परंपरा रुजलेली आहे. हल्ली याला डीजेचे कानठळ्या बसवणारे संगीत आणि प्रदूषण करणारे फटाके यांची जोड लाभल्याने यावर टीका होत आहे. दिवाळी पाडव्यादिवशी घराच्या पडवी मध्ये शेणापासून छोटासा गोठा बनवला जातो. त्यात कारीट फळाला बारीक काड्या अडकवून बैल बनवले जातात. एक राखणा ठेवला जातो. कारीट फळाचेच दिवे बनवले जातात आणि गोठ्याची पूजा केली जाते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माणसे प्राण्यांवर किती माया करतात, याचे हे आणखी एक उदाहरण.

दिवाळीनंतर येणाऱ्या द्वादशीला तुळशीचे लग्न लावले जाते, त्याला बारस किंवा बारशी असेही म्हणण्याची पद्धत आहे. लग्नाच्या आदल्या दिवशी तुळशीचा उपवास असतो म्हणून तिला केळयांचा नैवेद्य दिला जातो. तुळशीला रंग काढला जातो. दिंड्याची काठी आणून सजवली जाते. उस, गोंडे म्हणजे झेंडूची फुले, आवळे, चिंचा हे सगळं भवतालच्या परिसरातून गोळा करायचे. तुळशीत ऊस उभा करून त्याच्या पातींच्या टोकांना झेंडुची फुलं बांधली की तुळशीला वेगळीच शोभा येते. तुळशी विवाहाच्या वेळेस तुळशीभोवती पणत्यांची आरासही छान दिसते. काही ठिकाणी तुळशीला साडी नेसवली जाते. गावच्या सातेरी मंदिरात तुळशीचे लग्न लागले कि मग वाटेत एकेक घरी जाऊन एकेका तुळशीचे लग्न लावले जाते. घरातला एखादा कर्ता पुरुष किंवा लहान मुलगा ' नवरदेव ' बनून लग्नासाठी उभा राहतो. थोडक्या वेळेत अनेक लग्नं लावायची असल्याने एखाद दुसऱ्या मंगलाष्टकातच तुळशीविवाह पार पडतो. लग्न लागले कि चुरमुरे वाटणारा माणूस चुरमुर्याची पहिली मूठ वर उडवून ' गोविंदा रे, गोपाळा' चा घोष करतो आणि प्रत्येकाच्या पिशवीत प्रसाद म्हणून चुरमुरे देतो. मग वातावरणात एक उदासीनता भरून राहते. अगदी लेकीच लग्न झाल्यावर तिच्या माहेरी वातावरण असत, तसं काहीसं. पुन्हा पुढच्या वर्षी तयारी करायची. पुन्हा तुळशीला नवा रंग काढायचा, पुन्हा सजवायच, पुन्हा रांगोळ्या, पुन्हा पणत्या लावायचा. परत एकदा प्रकाशात नाहून निघणारी तुळस आपल्या डोळयात साठवून घ्यायची, अन पुन्हा अंधार, पुन्हा या प्रकाशाच्या सणाची वाट पाहायची. अव्याहत सुरू असणारे हे चक्र, अगदी निसर्गाच्या ऋतुचक्रा सारखे. तुळशीविवाह पार पडल्यानंतरच त्या वर्षीच्या चिंचा, आवळे खाण्यास व काढण्यास सुरुवात होत असते.

तुळशीची लग्ने झाली कि गावागावात जत्रांना सुरुवात होते. ह्या जत्रेत रात्री नाटक सादर केले जाते, त्यालाच दशावतार म्हणतात. रात्रभर कुठल्याही लिखित संहितेशिवाय चालणारे नाटक पहाटेच्या सुमारास संपताना दह्याची हंडी फोडली जाते, म्हणून ह्या जत्रांना धयकालो म्हणजेच दहीकाला म्हटले जाते. दशावतार सुरु करण्यापूर्वी गणपतीच्या पेटा-याची पूजा केली जाते. दशावतारी नाटकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे यातील स्त्री पात्रांच्या भूमिका देखील पुरुषच करतात. ह्या जत्रेला गावातून उदरनिर्वाहासाठी बाहेरगावी गेलेले चाकरमानी आवर्जून हजेरी लावतात. जत्रेतला मालवणी खाजा प्रसाद म्हणून घरोघरी आणला जातो, मित्र आप्तेष्टांना वाटला जातो. वेगवेगळया गावात जत्रेतील काही विशिष्ट प्रथा देखील आढळतात, जसे भराडीदेवीच्या आंगणेवाडी जत्रेत रात्री देवीच्या प्रसादाची ताटे आणली जातात आणि तो प्रसाद वाटला जातो. माउली देवीच्या जत्रेत लोटांगण घालत देवीचे दर्शन घेतले जाते आणि नवस फेडले जातात. घोडेमुख जत्रा ही कोम्ब्याची म्हणजे कोंबड्याची जत्रा म्हणून ओळखली जाते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही गावांमध्ये गावपळण प्रथा आहे. चिंदर, आचरा, वायंगणी, मुणगे या गावांत दर तीन वर्षांनी गावपळण होत असते. गावपळणीचा कौल हा देवाकडून घेतला जातो आणि ठरलेल्या दिवशी सर्व गावकरी आपले राहते घर-संसार सोडून आपल्या गुरा-ढोरांसह वेशीबाहेर जातात. गावपळणीला गेलेले रहिवासी काहीजण वेशीबाहेर राहुट्या करून राहतात, तर काहीजण आजुबाजुच्या चिंदर-वायंगणी गावांमध्ये, तर काही आपल्या नातेवाईकांकडे जातात. दैनंदिन व्यवहारापासून मोकळीक

घेऊन कुटुंबासमवेत दोन तीन दिवस वेळ देता येतो, वेगवेगळे विरंगुळ्याचे खेळ खेळले जातात, मनाला शरीराला विश्रांती मिळते, पर्यावरणाचे कोणतेही नुकसान न करता गावातील पशु-पक्षी, झाडांना काही दिवस माणसांपासुन मोकळीक दिली जाते आणि निसर्गाच्या सहवासात एकोप्याचा आनंद रहिवाश्यांना मिळतो. या प्रथेमध्ये गावातील सर्वधर्मीय लोक स्वेच्छेने सहभागी होतात. एखादी नैसर्गिक आपत्ती आल्यास तातडीने गाव खाली करण्याचे हे एक प्रकारचे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षणच आहे. आपले राहते घर आणि नांदते गाव सोडून असे वेशीबाहेर राहणे देखील सोपे नाही. सामाजिक सलोख्याच्या दृष्टीने ही आगळीवेगळी परंपरा महत्वाची आहे.

सोमवती अमावस्येला होणारी महोदय पर्वणी म्हणजेच देवांचे सागर स्नान. गावोगावची ग्रामदैवतं पालखीत विराजमान होऊन तरंगासह समुद्रस्नानासाठी समुद्र किनाऱ्यावर येतात.त्यांच्या सोबत गावातील रयत असते. स्थानिक लोक आलेल्या देवांसह रयतेरांगोळ्या घालून स्वागत करतात, सर्वांच्या जेवणाची सोय करतात. देवांसोबत सगळे लोक आनंदाने समुद्रात अंघोळ करतात. ही एक प्रकारची जणू आनंदवारीच असते.

जानेवारी महिन्यात येणाऱ्या संक्रांतीची सगळ्या स्त्रिया आवर्जून वाट पाहत असतात. घरोघरी सुगड पूजले जातात. आधी गावातील देवीच्या मंदिरात सार्वजनिक हळदी कुंकू घातले जाते, नंतर प्रत्येक वाडीचा वार ठरवून त्या वाडीतील प्रत्येक घरात हळदी कुंकू समारंभ साजरा केला जातो. रंगीत साड्या नेसून, दागिने घालून, केसात फुले माळून, ह्या सगळ्या मालवणी स्त्रिया जेव्हा घोळक्या घोळक्याने हळदी कुंकवासाठी बाहेर पडतात, तेव्हा वाटते, घराघरातील चैतन्य, सगळ्या गावात पसरत चालले आहे. कामाच्या निमित्ताने वर्षभर घाईत असणाऱ्या स्त्रिया एकमेकींच्या घरी जातात, घरातील वृद्ध मंडळीना भेटतात, नवी सून एखाद्या घरात आलेली असते, तिची ओळख होते, कुणी माहेरवाशीण आली असेल तर तिची विचारपूस होते. हळदी कुंकवाला आलेल्या स्त्रियांना वाण देण्याची पद्धत आहे, प्रत्येक जण आपल्या इच्छेनुसार हे वाण देत असते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गौरी-गणपतीनंतर सर्वात लोकप्रिय सण म्हणजे होळी म्हणजेच शिमगा किंवा शिगमो. प्रत्येक गावात देवळासमोर एकच सार्वजनिक होळी असते. आळीपाळीने दरवर्षी एकेकाच्या बागेतील झाड होळीसाठी तोडले जाते. इथे तितकीच झाडे लोक लावत असतात. आंबा, माड, सुरमाड, पोफळीची झाडे होळीसाठी वापरली जातात. देवळासमोर होळी पुरली जाते आणि रात्री ढोल-ताशांच्या गजरात होळी पेटवून शिमगा केला जातो. होळीला अर्पण केलेले नारळ नंतर बाहेर काढून त्याची शिरवणी करून प्रसाद म्हणून सर्वांना वाटला जातो. होळीसमोर देवाची पालखी नाचवण्याचा प्रघात आहेत. हे पालखी नाचवणे मोठे कौशल्याचे काम असते. होळीसमोर वर्षभराचे नवस फेडले जातात. गावाची सभा होते, देवस्थान विषयक निर्णय तिथे घेतले जातात, प्रश्न सोडवले जातात. नंतरचे पाच दिवस ग्रामदेवतेची पालखी घरोघर जाते. शिगम्याला देव घरी येतात म्हणून प्रत्येक जण पालखीची वाट पाहत असतो. त्याच पाच दिवसांत सोंगे घेऊन लोक घरोघर फिरतात, त्यांना शबय शबय म्हणून पैसे दिले जातात, राधा नृत्य, गोमू नृत्य केले जाते, रोम्बट, खेळे खेळले जातात. शेवटच्या दिवशी होळीवर धुळीचा मारा केला जातो आणि एकमेकांना गुलाल लावून धुळवड साजरी केली जाते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गाव-हाटी म्हणजे गावाच्या चतु:सीमेत राहणारे गावकरी, प्राणीमात्र यांचे परस्परांशी संबंधित व्यवहार आणि त्या व्यवहारांचे नियम. 'बारा पाचाचे एक गणित' करून गावगाडा चालवला जातो. यात बारा स्थळे- नवलाई, विठलाई, गावडा, गांगो, सुतार, मडवळ, जैन, ब्राह्मण, कुळ, भराडी, वेळा, पान तसेच बारा बलुतेदार: सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, तेली, परीट, कोष्टी, शिंपी, चांभार, सणगर, बुरूड, साळी आणि पाच मानकरी: १) राजसत्तेचा मानकरी २) परब ३) घाडी ४) गुरव आणि ५) महार यांचा समावेश असतो. गावातील सर्व व्यवहार ह्या गाव-हाटीनुसार चालतात. कोणत्याही समारंभापूर्वी या बारा –पाच संप्रदायाला गाऱ्हाणे घातले जाते आणि सगळं काही व्यवस्थित पार पाडावे, यासाठी देवाकडे विनंती केली जाते. मालवणी बोलीतील हे गाऱ्हाणे लोकांच्या मनात नेहमी घर करते.

# सिंधुदुर्गमधील लोककला: दशावतार

**धनश्री संजय राणे**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: raneds.dc@gmail.com

सिंधुदुर्ग म्हटले की आपल्या डोळ्यासमोर येते की, त्याची वैभवशाली पारंपारिक संस्कृती आणि दशावतारीनाट्य! सिंधुदुर्ग येथील प्रत्येक सांस्कृतिक भागाला वैभवशाली अशी रंगभूमी लाभली आहे. दशावताराची सुरुवात होते ती सिंधुदुर्गच्या देवगडपासून भागातून ते कणकवली, मालवण, वेंगुर्ले, कुडाळ, दोडामार्ग करीत थेट गोव्यापर्यंत याचे क्षेत्र विस्तारले आहे.



परंपरा जपणारा हा दशावतार म्हणजेच भगवान विष्णूंनी साकारलेले दहा अवतार. मत्स्य, कुर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुध्द आणि कलकी. या दशवतारांवर आधारलेले नाटक म्हणजेच दशावतार होय. येथील 'मालवणी दशावतार' हा लोककला प्रकार विशेष प्रसिध्द आहे, कारण तो सिंधुदुर्गच्या स्थानिक भाषेत म्हणजेच मालवणी भाषेत सादर केला जातो. म्हणूनच तेथील दशवतारांमधील प्रत्येक पात्र तेथील गावकऱ्यांना आपलेसे वाटते.

प्रत्येक मंदिरात जत्रेची तिथी ठरलेली असते. जत्रा म्हटले की, रात्री दशावताराचे सुंदर असे सादरीकरण होते. त्या तिथीला कोणते दशावतारी मंडळ नाटक सादर करणार हे ठरलेले असते. दशावतारांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक नटाचा, पुराणकथांचा अभ्यास हा फारच दांडगा असतो. सिंधुदुर्गात प्रामुख्याने गोरे दशावतारी नाट्यमंडळ, वालावलकर नाट्यमंडळ, चेंदवणकर नाट्यमंडळ, पार्सेकर नाट्यमंडळ अशी अनेक जुनी नाट्यमंडळे अजून ही लोकप्रिय आहेत. या दशावतारामधून नकळतपणे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आपल्या वैभवशाली संस्कृतीचे दर्शन घडते.

दशावतारी नाट्यमंडळात प्रत्येक नटाची स्वतंत्र अशी पत्र्याची पेटी असते. या पेटीत वेशभूषेचे सामान, रंगभूषा, तलवारी आणि इतर सामान असते. प्रत्येक दशावतार नटासाठी ती पेटी अतिशय मौल्यवान असते. प्रत्येक दशावतारी मंडळाला दशावतारी पेटारा आपले सर्वस्व वाटते. दशावतारी नाटकाच्या सुरुवातीला प्रत्येक कलाकार त्या गणपतीच्या दशावतार पेटाऱ्याचे पूजन करतो आणि नंतरच दशावतार नाट्यांचा शुभारंभ होतो. दशावतारी नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे, पुरुषांनी साकारलेली स्त्री भूमिका, स्पष्ट उच्चार, वेशभूषा, संगीतमय लढाया ! दशावतारी नाटकात नेहमी दानवांशी सत्यासाठी देवांनी केलेला संघर्ष आणि दुष्ट प्रवृत्तीचा नाश होऊन सत्याचा असत्यावर होणारा विजय याचे दर्शन होते. त्या दशावतारी नाटकाचा नायक राजा, खलनायक, राक्षस, त्यांच्या पत्नी ही सर्व पात्रे त्यांनी केलेल्या वेशभूषेवरून आणि रंगभूषेमुळे ओळखता येतात.

गावात विविध दशावतारी नाट्य सादर होत असतात आणि त्याची भैरवी नाटकातील कृष्ण या पात्राकडून पहाटे गाडगे फोडून केली जाते. त्याला दहीकाला असे संबोधले जाते. इतर वेळी करमणुकीचे साधन म्हणून जे नाटक सादर होते त्याला दशावतार

नाटक म्हटले जाते. दशावतारातील प्रत्येक कलाकार हा आपल्या भुमिकेबद्दल अतिशय प्रामाणिक असतो. रंगमंच म्हणजे दशावतारी नटासाठीचा स्वर्गच!





दशावतारी नट आपल्या संवादांनी प्रेक्षकांची मते जिंकून घेतात. दशावतारी नाटक जर मंदिराबाहेर असेल तर त्यांना पडदा चालतो नसेल तर मंदिराची भिंत पडद्याचे काम करते. दशावतारांचे आगमन होताच, जणू काही गावात देवच अवतरले असे त्यांचे स्वागत होते. तेथील गावकरी अतिशय आपुलकीने त्यांची कुतूहलाने त्यांच्या सादर होणाऱ्या नाट्याची वाट पाहत असतात. दशावतार नाटकात मृदुंग, पायपेटी आणि चक्की या तीन वाद्यांचा समावेश असतो. नाटकातील प्रसंग हुबेहूब वाटावा यासाठी या वाद्यांचा उपयोग होतो.

दशावतारामध्ये आडदशावतार आणि दशावतार असे दोन प्रकार असतात. त्यांना आपण पूर्वरंग व उत्तरंग असे म्हणू शकतो. नाटकाच्या पूर्वरंगात आपल्याला शंकासुराचे दर्शन घडते. पूर्वरंगांत शंकासुराचा संवाद मालवणी भाषेतून होतो. शंकासुराचा संवाद हा अतिशय विनोदी असतो. त्यामुळे ते नाटक प्रेक्षकांना रंगमंचाकडे खिळवून ठेवते. पुढील दशावतार पाहण्यास प्रेक्षक सज्ज होतो.

ज्या गावातील मंदिरात दशावतार रात्री सादर होणार असतो तो परिसर वेगळ्याच वातावरणाने सजलेला, नटलेला असतो. भाविकांची गर्दी, जत्रेची दुकाने, ओटी भरणे, देवळातील गाऱ्हाणे, अगरबत्ती, धुपाचा वास दशावतार मंडळीची नाटकाची तयारी आणि त्यांना कुतूहलाने पाहणारे गावकरी अशा वातावरणाने मंदिराचा परिसर प्रसन्नतेने भारावून गेलेला असतो. शांततेत गुडूप झालेलं गाव मात्र त्या रात्री मंदिराच्या प्रांगणात जमतं, अख्खं गाव रात्र जागून काढतं आणि पहाटे दशवतारांतल्या प्रयोगामधल्या आख्यानाविषयी चर्चा करतं.



दशावतारी नाट्याचा प्रारंभ हा गणेशपूजनाने होतो. गणपतीची आरती होते. तेथील पारंपारिक गीते म्हटली जातात. पुढील नाट्य निर्विघ्न पार पडण्यासाठी श्रीगणेशाची आराधना केली जाते. दशावतारी नाटकात महत्त्वाचे आकर्षण असते ते म्हणजे देव आणि दानव यांच्यातील संगीतमय लढाई.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात दरवर्षी कार्तिकी एकादशीपासून पुढचे साडेतीन ते चार महिने वेगवेगळ्या गावांमध्ये दशवतारांचे सादरीकरण हे केले जाते. दशावतार ही एक पारंपारिक लोककला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामदैवतांच्या जत्रोत्सवाशी या दशावताराचा खूपच जवळचे नाते आहे. कलाकाराचा जितका अभ्यास तितकीच त्याची भूमिका अधिक प्रभावशाली होते आणि प्रेक्षकांना भावते. त्याची पोचपावती म्हणून अनेक प्रेक्षक कलाकारांना प्रोत्साहनपर बक्षिसे देतात. तिथे असणारं लाकडी बाकडं संपूर्ण नाटकात मोठी भूमिका निष्ठावंत असत. कारण तेच त्याचं शयनगृह तेच सिंहासन असत.

मध्यरात्री सुरु झालेलं हे नाटक सूर्योदयाच्या सुमाराला संपते. खलनायकाचा वध होतो. त्यानंतर दहीकाला केला जातो. सर्वाना प्रसाद वाटला जातो आणि नाटकाचा समारोप होतो. दुष्टांचा अंत आणि सज्जनांचे संरक्षण हे प्रत्येक नाटकाचा मुख्य हेतू असतो. सामाजिक प्रबोधनाचा भाग याच ठिकाणी होतो. नाटकामध्ये काम करणारे कलाकार उपजीविकेसाठी विविध व्यवसाय करत असतात. कोणी शेती करतो. कोणी विणकाम, भिक्षुकी, लोहारकाम, तर कोणी सुतारकाम. दशावतार ही एका विशिष्ट जातीची मक्तेदारी नाही तर ती सर्व जातीच्या लोकांना एकत्र बांधून ठेवणारी लोककला आहे.



आज ही गावागावात दशावताराची आवड कमी झालेली नाही. रसिकांवर आपल्या अभियनाची मोहिनी घालणाऱ्या दशावतारी कलाकारांची मिळकत फार कमी असते. मात्र समाजाच्या प्रबोधनासाठी सर्वच कलाकार निष्ठेने काम करतात. गावातील जत्रा म्हणजे दशवतारांसाठी आपली कला सादर करण्याचे हक्काचे व्यासपीठ असते. प्रत्येक दशावतारी कलाकार आपल्या अभिनयाची तयारी ही स्वतःच करत असतो. आणि त्याचे संवाद ही ऐनवेळचे स्वतःचे असतात. या दशावतारी नाट्यातील रंगभूषा, वेशभूषा, अभिनय, संवाद फेक, संगीत कथानक, युद्धनृत्य या सर्वांचे अप्रतिम सादरीकरण या सर्वानीच प्रेक्षक अगदी भारावून जातो.

दशावतारी नाटक ही सिंधुदुर्गची सांस्कृतिक परंपरा आहे तसेच येथील स्थानिक लोकांच्या मनोरंजनाचे एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. सृष्टीचे चक्र सुरळीतपणे चालावे त्यामध्ये कुठलीच बाधा येऊ नये आणि जेव्हा पृथ्वीवर दुष्टांचा प्रादुर्भाव वाढतो तेव्हा भगवान श्री विष्णू त्या काळाच्या परिस्थितीशी अनुरूप असा अवतार धारण करतात आणि दुष्टांचा नाश करून पृथ्वीवरचा भार हलका करतात. ईश्वराने मानवी रुपात अथवा प्राणी रुपात एखादे कार्य पार पाडण्यासाठी पृथ्वीवर जन्म घेणे यालाच हिंदू धर्मात अवतार घेणे असे म्हणतात. या दशावतारी कलाकारांना मंदिरांच्या व्यवस्थापनाकडून चार ते सहा हजार रुपयांपर्यंत मानधन दिले जाते. मंडळांमधून पंधरा ते वीस कलाकार असतात त्या कलाकारांमध्ये ते मानधन वाटून दिले जाते. खरतरं दशावतारी नाटकांमध्ये उपजीविकीचे साधन म्हणून पाहिले जात नाही कारण त्यातून मिळालेली मिळकत ही फार कमी असते. आपल्या या सांस्कृतिक लोककलेला म्हणावा तसा राजाश्रय मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंपरा जपत समाज प्रबोधन करणं हा या दशावतारी नाटकांचा मूळ उद्देश आहे. आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार ही लोककला जोपासत आहेत. आपल्या भावी पिढीसाठी आपण या कलेचे संवर्धन केलेच पाहिजे. दशावतारामधील प्रत्येक कलाकाराच्या कलेचा सन्मान पाहिजे. सिंधुदुर्गातले दशावतार हे आपल्याला कोकणचे वैभवच नाही तर कोकणचा अविभाज्य घटक आहेत म्हणून ही कला यापुढे वृद्धिंगत वाढत जाईल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील असले पाहिजे.

**संदर्भ**

1. महेश केळुस्कर - दशावतार
2. विकिपीडिया वेबसाईट

# देवगडमधील कापडखेळे: एक प्रयोगरूप लोककला

**हेमश्री किशोर चिटणीस**

Corresponding author E-mail: hemashrichitnis@gmail.com

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृती ही प्रतिकांची संस्कृती असून या संस्कृतीचा गाभा लोकसंस्कृतीमध्ये दिसतो. यामध्ये यातुविधी, विधीनाट्य व यातुक्रिया यांचा समावेश होतो. या पद्धतीने काळानुरूप प्रयोगरूप धारण केले आहे. धर्म, संप्रदाय, चालीरीती, रूढी, परंपरा, श्रद्धा यांच्या जनमानसावरील प्रभावातून या कला दृश्यरूपात आविष्कार करतात. यातूनच लोकरंगभूमी विकसित झाली आहे. प्रादेशिकतेनुसार या प्रयोगात्मक लोककलांचे स्वरूप आणि पृथगात्मकता ठळकपणे पहावयास मिळते. उदा. दशावतार सारखा लोककलेचा प्रकार. आपल्या महाराष्ट्राच्या विविध प्रांतांमध्ये जत्रा-यात्रा, उत्सवांमध्ये सादर होणारे तमाशा, पोवाडा, भजन, कीर्तन, भारुड, गोंधळ, डोंबाऱ्याचे खेळ, मानवी वाघ, वासुदेव व बहुरूपी यांसारख्या कलांचा प्रयोगरुप लोककलांमध्ये समावेश होतो. या कलांची आविष्कार पद्धती, नेपथ्य, भाषा या दृष्टीने यांचे वेगळेपण महत्त्वाचे ठरते.

शरीराच्या हालचालीशी निगडीत असणाऱ्या कलेला 'प्रयोगरूप लोककला' असे म्हणतात. लोककलेच्या आस्वादासाठी कलेचे सादरीकरण करणे महत्त्वाचे असते. सादरीकरणामुळे लोककलेत जिवंतपणा येतो. अनेक लोकांच्या समोर जेव्हा एखादी कथा, गीत, नृत्य सादर केले जाते, तेव्हा त्याला नाट्यविधीचे स्वरूप प्राप्त होते. महाराष्ट्रातील कोकण प्रांतामध्ये कथाकार, कीर्तनकार, गोंधळी, वासुदेव, दशावतार कलाकार ही सर्व मंडळी लोकांसमोर आपली कला सादर करतात. या शोधनिबंधात कोकणातील एक प्रयोगरूप लोककला 'कापड खेळे' यांच्या स्वरूपावर एक थोडक्यात विचार मांडला आहे.

**कोकणातील शिमगोत्सव**

भारताचा पश्चिम समुद्र किनारे आणि किनाऱ्याला समांतर असलेल्या सह्याद्री पर्वत रांगा यांच्यामध्ये असलेल्या भूमीच्या पट्ट्याला कोकण प्रांत असे म्हणतात. महाराष्ट्राच्या सहा प्रशासकीय विभागांपैकी सात जिल्ह्यांचा समावेश या प्रांतात होतो. भौगोलिक वेगळेपणामुळे सामाजिक व सांस्कृतिक भिन्नताही येथे दिसून येते.

गणेशोत्सवाप्रमाणे शिमगोत्सव म्हणजेच होळीचा उत्सव कोकणात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. फाल्गुन महिना म्हणजे शेतकऱ्यांसाठी थोडा निवांत काळ असतो. होळीच्या या उत्सवात प्रत्येक गावाचे दैवत त्यांच्या रयतेच्या भेटीसाठी पालखीत विराजमान होऊन तरंग, अब्दागिरी सोबत ढोल, ताशांच्या गजरात बाहेर पडते. गावातील प्रत्येक वाडी-वस्तीला भेट देऊन आपल्या प्रांतांची रखवाली करते. या पालखी सोबतच विविध कला सादर करणारे कलाकार असतात. कोकणात होळीमध्ये काटखेळ, डेरा नृत्य, चवई, नाखवा नृत्य, जाखडी नृत्य, गोमुचे नृत्य, घुमट असे विविध कला प्रकार प्रांतभिन्नतेनुसार सादर होतात. यामध्ये बहुतकरून पुरुषांचा सहभाग असतो, त्यामुळे दशावताराप्रमाणे स्त्रीभूमिका देखील पुरुष स्त्रीवेश धारण करून सादर करताना दिसून येतात. मूळ संस्कृत 'सुग्रीष्मक' या शब्दापासून 'शिगमा' या शब्दाची व्युत्पत्ती झाली असे मानतात. कोकणात आणि महाराष्ट्राच्या अन्य प्रांतात 'शिमगा' असा शब्द रूढ आहे, तर गोव्यामध्ये 'शिगमा' असे संबोधले जाते.

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला 'शिगमा' म्हणजे होलिकोत्सव साजरा केला जातो. गावातील मांडावर नमन घालून या उत्सवाची सुरुवात होते. 'मांड' म्हणजे गावाच्या सामूहिक मालकीची, गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी परंपरेने राखून ठेवलेली जागा! शिमगोत्सव प्रत्येक गावात वेगवेगळ्या प्रकारे साजरा होतो. परंपरने पाच, नऊ किंवा पंधरा दिवसांचा तर काही ठिकाणी एका दिवसाची होळी असते.

**कापडखेळे**

'कापडखेळे' हा लोकनृत्य प्रकार 'शिमगोत्सवात' सादर केला जातो. होळी सकाळी प्रज्वलित केली तर संध्याकाळी आणि होळी संध्याकाळी प्रज्वलित केली तर दुसऱ्या दिवशी सकाळी होळीला कापड लावले जाते. म्हणजेच जरीची नऊवारी साडी लावली जाते. यालाच 'कापड चढवणे' असे म्हणतात. हे होळीला चढवलेले कापड म्हणजे साडी मुख्य खेळयाला नेसण्यासाठी देण्यात येते. अन्य खेळयांच्या साड्या होळीला मानवून त्यांना दिल्या जातात. गावातील चव्हाट्यावर खेळयांचा पहिला आणि शेवटचा खेळ होतो. अभ्यासानिमित्त पुरळ, फणसे, नाडण आणि मुटाट या गावांना भेटी देण्याची संधी मिळाली. मुटाट मधील 'श्रीदेव मालवीर' देवाची पालखी रयतेच्या भेटीसाठी गावात जाते. पुरळ गावातील कापडखेळे आपल्या गावातच खेळ सादर करतात. अन्य खेळे दुसऱ्या कोणत्या गावात खेळाचे आमंत्रण आल्यास ते स्वीकारून तेथे जातात.

**कापडखेळे सादरीकरण**

गावाच्या मांडावर देवतांचे तरंग, अब्दागिरी तसेच पालखी मानाच्या चौथऱ्यावर ठेवण्यात येते. मध्यभागी गायन करणारे शाहिर आणि डफ, झांज वादक उभे राहतात व त्यांच्या भोवती खेळे फेर धरतात. खेळयांच्या कमी जास्त संख्येप्रमाणे हे वर्तुळ लहान मोठे होते. आजपर्यंत पुरळ गावात सर्वात जास्त ४५ ते ५० खेळे एकाच वेळी या नृत्यात सहभागी झाल्याची नोंद आहे. शाहिराच्या मागून सर्वजण गाणी म्हणत नृत्य सादर करतात, देवांसोबतच कापड खेळे गावातील वाडी वस्तीमध्ये फिरतात आणि खेळ सादर करतात. देवतांप्रमाणेच या खेळयांचा मान सन्मान केला जातो. त्यांची पायधूळ देवांच्या पायधूळी प्रमाणे कपाळाला लावली जाते.




**कापडखेळ्यांची वेशभूषा**

लोकपरंपरा जशा प्रांतानुसार बदलतात त्याच प्रमाणे लोककला सादर करण्याची पद्धत आणि वेशभूषा देखील बदलते. 'कापड खेळे' त्यांच्या नृत्य कौशल्याप्रमाणेच आगळ्या वेगळ्या वेशभूषेमुळे प्रेक्षकांना आकर्षित करतात. त्यांच्या वेगवान नृत्याविष्कारासोबतच साड्यांच्या वर्तुळाकार लयीची एक वेगळी कलाकृती निर्माण होते. डोक्यावर पगडी किंवा फेटा, अंगात पूर्ण बाह्यांचे शर्ट, कमरेला चुणीदार नऊवारी साडी त्यावर उपरणे, कानात, गळयात विविध दागिने, उजव्या हातात टिपऱ्या व डाव्या हातात कोणत्याही रंगाचा रुमाल अशी वेशभूषा प्रत्येक खेळा धारण करतो.

**पगडी**

पुरळ या गावामध्ये होळीच्या चार दिवस आधीपासून पगडी बांधायच्या कामाला सुरुवात होते. प्रत्येक खेळयाच्या डोक्यावर व्यवस्थित बसेल अशा मापात पगडी बांधली जाते. गावातील जाणकार ही विशिष्ट प्रकारची पांढऱ्या उपरण्याची पगडी बांधतात. या पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत या पगड्या सूटत नाहीत हे वैशिष्ट्य आहे! अन्य गावातील म्हणजे फणसे, मुटाट आणि नाडण मधील खेळे तयार फेटे वापरतात. पगडी असो की फेटे त्यांना विविध प्रकारच्या खऱ्या-खोट्या फूलांनी, गजऱ्यांनी तसेच

मोत्यांच्या माळांनी सजविण्याचे काम प्रत्येक खेळा अगदी आवडीने करतो. सजवलेली पगडी किंवा फेटा हे एक वेगळे आकर्षण असते.

**कापड नेसणे**

होळीला मानवून नऊवारी साड्या प्रत्येक खेळयाला देतात. जणू देवीचा अंश या माध्यमातून खेळयाकडे सोपविला जातो. एका नाडीच्या साहाय्याने मध्ये दुमडून चुण्या केलेली साडी खेळयांच्या कमरेभोवती बांधले बांधली जाते. त्यावर पांढऱ्या रंगाचे उपरणे किंवा धोतर घट्ट पट्ट्या प्रमाणे बांधतात. या उपरण्यामुळे गावामध्ये दिवसभर चालत फिरणाऱ्या आणि वेगवान नृत्य सादर करणाऱ्या खेळयांच्या कमरेला आधार मिळतो.

**टिपऱ्या व रुमाल**

जंगलात मिळणाऱ्या काऱ्याच्या काठ्यांपासून टिपऱ्या तयार करण्याचे काम होळीपूर्वी पंधरा दिवस आधी सुरु होते. काही ठिकाणी बाजारात मिळणाऱ्या टिपऱ्याही वापरल्या जातात. दोन टिपऱ्या उजव्या हातात आणि मोठा हातरुमाल डाव्या हातात घेतला जातो. या टिपऱ्या एकमेकांवर आपटल्या की एक निर्माण होणारा ध्वनी नृत्याला व गाण्याला पोषक ठरतो. रात्रीच्या वेळी या रुमालाने टिपऱ्या बांधून ठेवल्या जातात.

**दागिने**

कापडखेळे जरी स्त्रीवेश धारण करत नसले, तरी ते एक प्रकारे देवांचे प्रतिनिधी असतात आणि म्हणूनच कानात मोत्याचे डूल, कपाळावर नाम, गळयात विविध प्रकारच्या माळा व हार, कमरेला मोत्यांचा कंबरपट्टा अशाप्रकारे शृंगार मोठ्या हौसेने करतात. आजचे खेळे तर गॉगलदेखील लावतात. सजण्याची हौस तरुण या खेळयांच्या माध्यमातून पूर्ण करतात.

**कापडखेळ्यांसाठी असलेले नियम**

शिमगोत्सवामध्ये खेळे म्हणून सहभागी होणाऱ्या प्रौढ तसेच तरुणांना काही नियम पाळणे अनिवार्य असते. प्रत्येक प्रांतानुसार या नियमांमध्ये बदल होत असले, तरीही बहुतांश साधर्म्य दिसून येते.

1) पुरळ गावातील खेळयांच्या अंगाला एकदा कापड लागले की, ते आपल्या घरी उत्सव संपेपर्यंत ते जाऊ शकत नाहीत, देवांच्या सर्व समुहासोबत (तरंग, अब्दागिरी, पालखी रूपातील देव) राहणे बंधनकारक आहे. फाणसे व मुटाट या गावातील खेळे ज्या गावी खेळ करण्यासाठी जातात, त्या गावाच्या मांडावर रात्रीचा मुक्काम करतात. नाडण गावातील खेळयांना रात्रीच्या विश्रांतीसाठी आपल्या घरी जाण्याची परवानगी असते.
2) खेळयांना नेहमी देवांच्या समूहासोबतच राहायचे असते.
3) एकदा खेळा म्हणून समूहात सहभागी झाल्यानंतर कुटुंबातील सुवेर आणि सूतकाचे नियम त्याला लागू पडत नाहीत.
4) खेळयांच्या नाश्ता व जेवणाची सोय वाडीतच केली जाते. तसेच जिथे त्यांचा खेळ असतो तिथेही त्यांना अल्पोपहार दिला जातो.
5) आपल्या संपूर्ण वेशभूषेचे पावित्र्य जपणे ही खेळयांची महत्त्वाची जबाबदारी असते.
6) शिमगोत्सवात खेळे अनवाणी गावात फिरतात.
7) या दिवसांमध्ये खेळयांनी निर्व्यसनी तसेच शाकाहारी असणे आवश्यक असते.
8) स्नानादी कार्यासाठी खेळयांनी एकटे न जाता सोबत घेऊन जाणे क्रमप्राप्त आहे.
9) एका वर्षी 'खेळे' म्हणून सहभागी झाल्यावर पुढील वर्षी खेळे' झालेच पाहिजे अशी सक्ती नसते. तसेच या बाबतीत वंश परंपरा देखील नाही. 'खेळे' म्हणून सहभागी होणे हे पूर्णपणे ऐच्छिक असते.
10) शिमगोत्सवात कापड खेळे म्हणून आतापर्यंत लहानात लहान ६ वर्षांचा मुलगा ते ४५ वर्षांचे प्रौढ सहभागी झाले आहेत.

शिमगोत्सवामध्ये सहभागी होणारे हे कापडखेळे ग्रामदैवतावरील श्रद्धेने प्रेरीत होऊन आपल्या कलेचे सादरीकरण करतात. उन्हातान्हात, काट्याकुट्यातून अनवाणी चालताना, तसेच नृत्य सादर करताना मनामध्ये केवळ भक्तीची भावना असते. त्यामुळेच अत्यंत सुसूत्रपणे व नयनरम्य असा नृत्याविष्कार ते सादर करतात.

**कापडखेळ्यांची लोकगीते आणि लोकनृत्य पध्दती**

कापडखेळयांचे नृत्य सादर होत असताना गीते म्हणणाऱ्या गायकांना 'शाहिर' असे संबोधले जाते. सर्व खेळ हा शाहिरांच्या तालावर सादर केला जातो. कापडखेळे ज्या गीतांवर नृत्य सादर करतात त्यांना 'जती' असे म्हणतात. तर कापड खेळे नृत्य सादर करताना जे विविध प्रकार करतात त्यांना 'मोडी' असे म्हणतात'जती' या शब्दाची व्युत्पत्ती गीते गाताना असलेला शब्दांच्या उच्चारांच्या वेगावरून म्हणजेच गीत गाताना गती असते म्हणून 'जती' हा शब्द आला असावा अशी शक्यता वाटते.

कापडखेळयांचे नृत्य हे अत्यंत सूत्रबद्ध, तालबद्ध असते. होळीपूर्वी काही दिवस आधी नवीन खेळयांना नृत्याच्या 'मोडी' शिकविल्या जातात. या मोडी पाहणाऱ्याला आनंद देणाऱ्या आणि त्याच्या हृदयाचा ठोका चुकविणाऱ्या असतात नृत्य करताना लवचिकतेने शरीर मोडून एकसमान हालचाली करून गीतातील भाव प्रेक्षकांस उपस्थितांसमोर सादर करणे हा प्रत्येक खेळयांचा उद्देश असतो. जानवे, चाफा, गंधक, शेला, ढोपरी, सलाम इत्यादी नृत्यातील मोडी इतक्या वेगाने बदलतात की प्रेक्षक अवाक होतात. शाहिरांच्या जती, डफ, टाळ व टिपऱ्यांचा नाद, खेळयांचे तालबद्ध नृत्य, पायांनी उडणारी धूळ, एकसाथ वर खाली होणारे हातातील रुमाल या सर्वांमुळे एक वेगळीच वातावरण निर्मिती होते.

**जतींचा भाषिक आविष्कार**

दोनशे ते अडीचशे वर्षांची परंपरा असलेल्या या कापडखेळयांच्या जतींचा, मोडींचा कर्ता कोण? याचे उत्तर अर्थातच अज्ञात आहे. कालानुरूप वर्षानुवर्षे या जती आणि मोडी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आल्या आहेत. या जती लिखित स्वरुपात नसल्यामुळे त्यांची संख्या, बदलते भाषिक स्वरुप याबद्दल माहिती मिळणे शक्य झाले नाही.

मुटाट गावातील शाहिरांनी सांगितलेल्या काही जती:

*मुटाट गावाची रहाठी काटी,*
*उभी राहिली गावात बारा, पाच हो देव बसले पालकीत*
*मालवीर देवाची स्वारी निघाली गावात बाल गोपाळ बघा ओ*
*आता झाले सुशील ओ दर्शन देण्यासाठी*
*देव येती घरोघर*

पुरळ गावातील शाहिरांनी दिलेली जत:

*पहिल्यानी मांडकरी गणेश देवा*
*दुसऱ्याने मांडकरी दूरदेवराना*
*तिसऱ्याने मांडकरी तिन भवराना*
*चौथ्याने मांडकरी शांतुराराया*
*पाचव्याने मांडकरी पांच पांडवा*

अशा प्रकारे मांडकरी देवतांचे आवाहन केले जाते.

रामायण, महाभारतातील संदर्भ असलेली गीते आपल्याला लगेच समजतात. तसेच प्रचलित भाषेतील गीतांचे बोल समजतात परंतु शक्ती-तुरे परंपरा असलेल्या या शाहिरांच्या सवाल-जबाबांपैकी काही कूटप्रश्न आजही समजत नाहीत. गीतांमध्ये प्रमाण मराठीपेक्षा मालवणी बोली भाषेचा वापर अधिक आहे.

*'जोय जता रे, जोय जता'* या धृपदाने प्रत्येक गीताची सुरुवात आणि शेवट होतो. आंबा, चाफा अशा झाडांचा उल्लेख असलेली काही गीते निसर्ग संवर्धनाचा संदेश देतात. आजवर कापडखेळयांच्या जती व मोडी यांची माहिती कधीही संग्रहित केलेली नाही. नवी पिढी नृत्य करण्यास आणि गीते गाण्यास इच्छूक असली, तरीही जतींचा संग्रह करून त्यांचा अर्थ लक्षात घेण्याचा प्रयत्न करताना कोणीही दिसून येत नाही.




**कापडखेळ्यांनी जपलेला सामाजिक वसा**

गावातील अशुभाचे निवारण करून सर्वत्र सुगीचे दिवस यावेत या उदात्त हेतून ग्रामदेवतेसोबत कापडखेळे मैलांचा प्रवास करतात, गावातील नवजात बालके, नवविवाहीत दांपत्यांची दृष्ट काढणे म्हणजे किरी काढणे आणि त्यांना निर्धास्त करणे हा महत्त्वाचा विधी या दरम्यान करण्यात येतो. 'किरी काढल्यामुळे' आता सर्वकाही व्यवस्थित होणार हा विश्वास भक्तांच्या मनात निर्माण होतो. सामाजिक समस्यांचा विचार करून नवीन जतींची निर्मिती झाल्यामुळे कापडखेळे केवळ देवभक्तीपर्यंत सीमीत न राहता त्यांची व्याप्ती विस्तारेल एवढे नक्की.

**निष्कर्ष**

1) रत्नागिरी आणि देवगडच्या सीमावर्ती भागामध्ये कापडखेळ्यांचे प्रयोग दिसून येतात.
   रत्नागिरीतील स्थलांतरीत गुराखी किंवा गवळ्यांनी 'कापडखेळ' देवगडमधील सीमावर्ती भागात आणला असा संदर्भ काही माहितगारांनी दिला.
2) कापडखेळ्यांच्या ५२ मोडी (नृत्य प्रकार) आणि १००-१५० जती (गीते) अस्तित्वात होत्या. आज मात्र कालानुरूप लोप पावल्याने मोजके साहित्य व नृत्यप्रकार प्रचलित आहेत.
3) कालानुरूप कापडखेळ्यांच्या श्रृंगारात बदल होत आहेत.
4) खेळ्यांसाठीचे नियमही काही प्रमाणात शिथील झाले आहेत.
5) देवगड तालुक्याचे वेगळेपण असणाऱ्या आणि शिमगोत्सवात सादर होणाऱ्या कापडखेळ्यांच्या जती व मोडींचे जतन व संवर्धन आवश्यक आहे.

**संदर्भ**

1. कोकणातील गावऱ्हाटी - श्री. श्याम धुरी
2. कोकणची लोकसंस्कृती- अनुवादक श्रीमती आसावरी बापट
3. लोकजीवन आणि लोकसंस्कृती - संपादक डॉ. द. ता. भोसले
4. स्थानिक अभ्यासक आणि रहिवासी यांच्या प्रत्यक्ष मुलाखती

# सिंधुदुर्ग: प्रेक्षणीय स्थळांचा खजिना

**मुग्धा तन्मय जोशी**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
Corresponding author E-mail: deodharmm.dc@gmail.com

देश भारत, राज्य महाराष्ट्र आणि त्यातील हा सिंधुदुर्ग जिल्हा! सिंधुदुर्ग जिल्हा हा पूर्वेकडून अरबी समुद्राने, दक्षिणेकडून गोवा आणि कर्नाटक तर उत्तरेकडून रत्नागिरी ह्या जिल्ह्यांनी वेढलेला आहे. हा जिल्हा समुद्र किनारी वसलेला असल्यामुळे येथील वातावरण नेहमी उष्ण व दमट असते. सिंधुदुर्ग जिल्ह्याला १२१ किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे.

१ मे १९८१ मध्ये 'रत्नागिरी' जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन 'सिंधुदुर्ग' जिल्ह्याची निर्मिती झाली. १९९९ साली सिंधुदुर्ग जिल्हा हा महाराष्ट्रातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त म्हणजे ३८ किल्ले असणारा तसेच सर्व प्रकारचे म्हणजे जलदुर्ग, गिरिदुर्ग व भुईकोट किल्ले असणारा एकमेव जिल्हा आहे. अशा या प्रेक्षणीय ऐतिहासिक ठिकाणे असणाऱ्या सिंधुदुर्गाची सैर करणे नक्कीच विलोभनीय आहे. त्यातील प्रसिद्ध ठिकाणांची माहिती खाली दिली आहे.

**सिंधुदुर्ग किल्ला**

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर स्थित, सिंधुदुर्ग किल्ला हा अरबी समुद्रातील एक बेट आहे. हे भव्य बांधकाम ४८ एकर क्षेत्रामध्ये पसरलेले असून त्याच्या भव्य भिंती समुद्राच्या कोसळणाऱ्या लाटांविरुद्ध उंच उभ्या आहेत. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार अशा प्रकारे तयार केलेले आहे की, ते लांबून सहजा-सहजी कोणालाही दिसू शकत नाही. सिंधुदुर्ग किल्ला हे मराठ्यांच्या दूरदृष्टीचे आणि साधनसंपत्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. हा शक्तिशाली किल्ला केवळ ऐतिहासिकदृष्ट्या लक्षणीय आकर्षण नाही तर आजूबाजूच्या निसर्गसौंदर्यामुळे हे एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे. विशाल अरबी समुद्रातून बाहेर पडलेला हा किल्ला एक रमणीय देखावाच बनला आहे. त्याची समृद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी केवळ या ठिकाणाच्या अनुभवात भर घालते. छत्रपती शिवाजी महारांजाशिवाय इतर कोणीही अशा प्रकारचा किल्ला बांधलेला नाही. त्याच्या भक्कम भिंती आणि मजबूत प्रवेशद्वारे यामुळे हा किल्ला इतिहासाचा आणि पर्यायाने सिंधुदुर्गाचा एक आकर्षक भाग बनला आहे. किल्ल्याच्या अनोख्या आणि अबाधित बांधकाम शैलीमुळे हा किल्ला आज काळाच्या कसोटीवर खरा उतरला आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याला ४२ उंचच उंच बुरुज आहेत. मुख्य म्हणजे या किल्ल्याच्या परिसरात गोड्या पाण्याच्या तीन विहीरी आहेत. ह्या विहिरींचे पाणी चवीला अत्यंत गोड लागते. किल्ल्याच्या बाहेर खारे पाणी आणि आत गोडे पाणी हा निसर्गाचा एक चमत्कारच मानला पाहिजे.

**सावंतवाडी पॅलेस**

सावंतवाडीचा रॉयल पॅलेस हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळांपैकी एक आहे. १७५५-१८०३ दरम्यान या प्रदेशाचे शासक खेम सावंत भोंसले यांनी बांधलेला असून तो सावंतवाडी शहराच्या मध्यभागी आहे. सावंतवाडीला मुंबई, कोल्हापूर आणि पुणे येथून रस्त्याने पोहचता येते.

**आंबोली हिल स्टेशन**

आंबोली हे सावंतवाडी येथे असलेले पावसाळ्यातील सर्वात प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. आंबोली जंगलात भरपूर जैवविविधता आढळते. तसेच धबधबे हे आंबोलीतील मुख्य आकर्षण आहे. हिरण्यकेशी नदीचा उगम आणि कावळेशेत पॉईंट ही आंबोली जवळील पर्यटन स्थळे आहेत.

**तारकर्ली बीच**

नयनरम्य समुद्रकिनाऱ्यासाठी ओळखले जाणारे तारकर्ली हे महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्कुबा प्रेमींसाठी उत्तम ठिकाण आहे. तारकर्लीच्या स्वच्छ आणि नितळ पाण्यामुळे येथे समुद्रातील विविध प्रकारचे प्राणी येथे सहज दिसू शकतात. स्कूबा डायव्हिंगसाठी लोकांना स्पीड बोटने दांडी बीचकडून डायव्हिंगच्या ठिकाणी नेले जाते. जर आपण प्रथमच स्कूबा डायव्हिंग करीत असाल तर आपल्यासाठी एक ट्रेनरदेखील असला पाहिजे जो तुम्हाला योग्य मार्गदर्शन करेल.

**चोरला घाट**

चोरला घाट हा गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेला पश्चिम सह्याद्रीचा एक भाग आहे. हे धबधब्यांचे घर आहे. कोकणातील हा एक पर्यटकप्रिय मार्ग आहे कारण चोरला येथील रस्ते पश्चिम घाटाचे चित्तथरारक दृश्य देतात. हा घाट बाईकर्सचे नंदनवन आणि आवडते रोड-ट्रिप डेस्टिनेशन मानले गेले आहे. हे ठिकाण गोव्याची राजधानी पणजीपासून सुमारे ५० किमी दूर आहे. या डोंगराळ प्रदेशातील जैवविविधतेचे निरीक्षण करण्यासाठी येथे निसर्ग संवर्धन सुविधा स्थापन करण्यात आलेली आहे. स्थानिक वनस्पती आणि प्राण्यांचा आनंद घेण्यासाठी पर्यटक चोरला घाटाला भेट देतात. येथे निवासाची सोय आहे आणि पायवाट, जंगल मोहीम, ट्रेक आणि हायकिंगसारख्या सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिल्या जातात.

**त्सुनामी बेट**

त्सुनामी बेट हे मालवणमधील एक ठिकाण आहे. विविध प्रकारच्या जल खेळांसाठी हे बेट प्रसिद्ध आहे. बेटावर असणारी वाळू चुंबकीय असल्याचे म्हटले जाते. शरीराच्या वेदना असलेल्या प्रभावित भागांवर या वाळूने मालिश केल्यावर त्यातील चुंबकीय तत्वांमुळे आजार बरे होतात अशी एक धारणा आहे.

**श्री वाघेश्वर मंदिर**

श्री वाघेश्वर मंदिर हे भगवान शिवाचे मंदिर आहे. स्थानिक पौराणिक कथेनुसार, एका नौसैनिकाला हे शिवलिंग सापडले. काही दिवसांनी ज्या भागात शिवलिंग सापडले तो परिसर उंचावला आणि जमीन वर आली. मग स्थानिकांनी पुढाकार घेऊन तिथे अशाप्रकारे मंदिर बांधले. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्थानिकांच्या म्हणण्यानुसार पूर्वी ह्या भागात अनेकदा वाघ येत असत. परंतु त्यांनी कधीही मानवावर हल्ला केला नाही. म्हणून या मंदिराचे नाव वाघेश्वर मंदिर पडले असावे.

**मालवण सागरी अभयारण्य**

राज्यातील एकमेव सागरी अभयारण्य म्हणजे मालवण सागरी अभयारण्य. १९८७ मध्ये जैविकदृष्ट्या समृद्ध किनारपट्टीक्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी हे अभयारण्य घोषित करण्यात आले. अभयारण्याचे मुख्य क्षेत्र २७ चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेले आहे आणि माशांच्या ३० पेक्षा जास्त प्रजातींसह सागरी वनस्पतींची जैव विविधता येथे आढळते.

**तोंडवली बीच**

तोंडवली बीच हा देशातील सुंदर समुद्रकिनाऱ्यांपैकी एक आहे. नारळाच्या झाडांनी नटलेला, सोनेरी वाळू तसेच हलक्या चमकणाऱ्या लाटांमुळे तोंडवली समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य अजूनच वाढते. सुंदर सूर्यास्त पाहण्यासाठी पर्यटक या बीचला भेट देतात.

**जय गणेश मंदिर**

जय गणेश मंदिर हे एक ज्योतिषी आणि 'कालनिर्णय' दिनदर्शिकेचे निर्माते जयंतराव साळगावकर यांनी बांधले होते. पांढऱ्या आणि सोनेरी रंगाने रंगवलेल्या या सुंदर मंदिरात गणपतीची दैवी मूर्ती आणि त्याच्या पत्नी रिद्धी आणि सिद्धी आहेत. सभामंडपाच्या गाभा-यातील घुमटावर आतल्या बाजूने गणेशाच्या अष्टमूर्ती कोरल्या आहेत. या मंदिरात सिद्धीच्या हातात आयुधे आणि रिद्धीच्या हातात कागद, लेखणी असून गणेशाचे पारंपारिक रूप मन प्रसन्न करणारे आहे. सभामंडपात मध्यभागी कलाकुसरीचे काम केले आहे ज्यामध्ये प्रत्येक नक्षी आठवेळा कोरण्यात आली आहे. तसेच मकरसंक्रांती दिवशी सूर्यकिरण थेट मूर्तीवर पडतील अशी मंदिराची वैशिष्ट्यपूर्ण रचना केली आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या वेळी या मंदिरात मोठा उत्सव साजरा केला जातो.

**वेंगुर्ला मालवण बीच**

वेंगुर्ला मालवण बीच हे सिंधुदुर्गातील आणखी एक निसर्ग रत्न आहे. सुंदर समुद्रकिनारा, नारळ, काजू आणि आंब्याच्या झाडांनी सजलेला हा किनारा आहे. १९ व्या शतकातील हल्ल्यांसह या समुद्रकिनाऱ्यावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत त्यामुळे यास देशातील ऐतिहासिक महत्त्व असलेले ठिकाण मानले जाते.

**सातेरी देवी जल मंदिर**

सातेरी देवी जल मंदिर हे जागृत देवीचे मंदिर असल्याचे म्हंटले जाते. घनदाट जंगले त्याचप्रमाणे असलेला हिरवागार निसर्ग पाहुल डोळ्याचे पारणे फिटते. मंदिराच्या सभोवताली एक कृत्रिम जलाशय आहे जुंय्ले या ठिकाणचे सौंदर्यअजूनच वाढते. म्हणून याला जलमंदिर असेही म्हणतात.

**भगवती मंदिर धामापूर**

भगवती मंदिर हे देवीचे एक जागृत आणि शक्तिशाली देवस्थान मानले जाते. हे मंदिर भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करते, अशी धारणा आहे. या मंदिर परिसरामध्ये मानव निर्मित सुंदर तलाव आहे. या तलावाचे पाणी जादूई असल्याचे मानले जाते.

**कुणकेश्वर मंदिर- दक्षिण कोकणाची काशी**

हे महाराष्ट्र राज्याच्या कोकण प्रांतातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्याच्या कुणकेश्वर गावात समुद्रकिनारी वसले आहे. कुणकेश्वराचे मंदिरातील शिवलिंग हे स्वयंभू आहे त्याचबरोबर एक तीर्थक्षेत्र आणि एक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी स्थित मंदिर हे फार वर्षांपूर्वीचे अतिप्राचीन शंकराचे मंदिर आहे. कुणकेश्वर मंदिर हे कोकणातील एकमेव प्राचीन आणि भव्य मंदिर आहे. कुणकेश्वर मंदिराला दक्षिण कोकणाची काशी असे देखील म्हटले जाते. हे मंदिर बाहेरून जेवढे सुंदर आहे तेवढेच आतून देखील सुंदर आहे.

कुणकेश्वर मंदिराचा संपूर्ण परिसर हा प्रचंड मोठा आहे. मंदिराच्या आत जाण्यासाठी आणि बाहेर येण्यासाठी ६ दरवाजे आहेत. मंदिराच्या परिसरामध्ये एक तलाव आहे, या तलावामध्ये सर्वत्र कमळाची फुले आणि मध्यभागी शंकराची मूर्ती पाहून मन प्रसन्न होते. शंकराच्या जटेतुन गंगा उत्पन्न झाल्याचा देखावा त्याठिकाणी उभा करण्यात आला आहे. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात भव्य शिवलिंग आहे. मुख्य कुणकेश्वराच्या मंदिराबरोबरच इथे इतर देव-देवतांची मंदिरेदेखील आहेत. या मंदिरांमध्ये जोगेश्वरी देवी मंदिर, समाधी मंदिर, भैरव मंदिर, श्री मंडलिक मंदिर, नारायण मंदिर, गणेश मंदिराचा समावेश होतो. मुख्य मंदिरासमोर एक विशाल दीपस्तंभ आणि नंदीची मूर्ती पाहायला मिळते. कुणकेश्वर मंदिराचा सभामंडप फार मोठा आहे. मंदिराच्या सभामंडपाच्या भिंतींवर विविध देव-देवतांच्या सुंदर कोरीव मूर्ती पाहायला मिळतात. कुणकेश्वर मंदिरासमोर उजव्या आणि डाव्या बाजुला दोन पाषाण आहेत, त्या पाषाणांना चंड आणि मुंड असे म्हटले जाते. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना राहण्यासाठी भक्तनिवासची व्यवस्था केली आहे.

निसर्गाच्या अनेक पैलूंनी नटलेला आणि सजलेला हा सिंधुदुर्ग नक्कीच पर्यटकांच्या आकर्षणात त्याचप्रमाणे ऐतिहासिक वारसा असल्याने इतिहासात आपले आढळ स्थान टिकवेल यात शंका नाही.

# कातळल्शिल्प: एक अनाकलनीय गूढ

**योगेश विठ्ठल राणे**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
Corresponding author E-mail: raneyv.dc@gmail.com

कातळशिल्प म्हणजे रानमाळावरील दगडांमध्ये पूर्णपणे उघडयावर कातळामध्ये खोदकाम करून तयार करण्यात आलेली शिल्पे. पुरातन काळातील कला म्हणून या कातळशिल्पांना विशेष महत्व आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने कोंकणात अशी शिल्पे आढळली आहेत. या कातळ शिल्पामध्ये विशेषतः पक्षी, प्राणी, विविध आकार, काही मुर्त्या अशी चित्रे आहेत, मात्र काही शिल्पे अनाकलनीय आहेत. या शिल्पांना जीओग्लीफ असे संबोधण्यात येते. आदीमानवाने खोदलेली अनेक कातळशिल्पे जगाच्या विविध भागात आढळतात. समाजाला या कातळशिल्पांची माहिती व्हावी म्हणून अनेक प्रयत्न सुरु आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आढळलेल्या या शिल्पांचेही रक्षण आणि जतन करण्यात आले आहे. या शिल्पांचा काळ हा इ.स. पूर्व २५०० ते ३००० वर्षे इतका असावा असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

कोकणात आढळलेली शिल्पे व चित्रे हि वैविध्यपूर्ण असून त्यांना ऐतिहासिक महत्व आहे. या शिल्पांची काल निश्चिती अद्याप झालेली नाही. या कातळशिल्पांच्या निर्मितीमागचा उद्देश मात्र अद्याप ज्ञात झालेला नाही. कोंकणात आढळलेल्या शिल्पांमध्ये विशेषतः देवगड तालुक्यात आढळलेल्या शिल्पांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात आला आहे. देवगड, आरे, दाभोळे, साळशी, वानिवडे, गिर्ये, कुणकेश्वर, वाघोटण, बापर्डे आणि तळेबाजार या गावांमध्ये कातळशिल्प आढळली आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आढळणाऱ्या जांभ्या दगडांवर हि कातळ शिल्पे खोदलेली आढळतात. कोकणात किनारपट्टी जवळच्या भागांमध्ये हा जांभा दगड मोठ्या प्रमाणात आढळतो. लाव्हा रसापासून बनलेल्या अग्निजन्य आणि गाळाच्या खडकांचे लिचींग होऊन जांभा खडक तयार झाला. या दगडावर जी विविध आकाराची शिल्पे खोदण्यात आली त्या शिल्पांना कातळ शिल्प म्हणून ओळखले जाते. ब-याच प्रमाणात हा दगड डोंगराच्या पृष्ठभागावर आढळतो. स्थानिक भाषेत अश्या पृष्ठभागाला सडा असे म्हणतात. जांभ्या दगडाला भूगर्भीय भाषेत laterite असे म्हणतात. कातळशिल्पांची शोध मोहीम सुरु झाल्यापासून कोंकणात आढळणा-या या जांभ्या दगडाने आपल्या गर्भात लपवलेली अनेक अश्मयुगीन रहस्ये आपल्या समोर येत आहेत.

कातळल्शिल्पाची निर्मिती कशी झाली याबाबत असलेला मुख्य विचार प्रवाह म्हणजे अश्मयुगात दगडी हत्यारांच्या सहाय्याने शिकार करणाऱ्या पद्धतीमध्ये झालेला अमुलाग्र बदल होय. त्या प्रगत हत्यारांमुळे अश्मयुगीन मानवाला शिकार करणे सहज सोपे झाले आणि त्यामुळे त्याला मिळालेलया फावल्या वेळात त्याने त्याच्याकडील दगडी हत्याराच्या सहाय्याने दगडांवर विविध आकाराची चित्रे काढण्यास सुरुवात केली असावी असा अंदाज आहे पण याबाबत दुमत आढळते कारण मुळातच जांभा दगड हा अत्यंत कठीण आहे. त्यामुळे या दगडाला दुस-या दगडाच्या सहाय्याने तोडणे शक्य नाही असा मत प्रवाह्देखील आहे. ब-याच प्रमाणात या जांभ्या दगडांचा वापर घर बांधणीसाठी होत असल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर चिरे खणी सुरु झालेल्या आहेत. या चिरे खणीमध्ये हा जांभा दगड कापण्यासाठी जे ब्लेड वापरण्यात येते ते अत्यंत धारदार असते आणि ब-याचवेळा हि ब्लेड तुटतात किंवा त्यांना सारखी सारखी धार करावी लागते. त्यामुळे त्या काळात केवळ दगडी हत्यारांच्या सहाय्याने अशी कातळ शिल्पे खोदणे शक्य नाही असे मत काही तज्ञ मंडळी मांडतात.

कातळ शिल्पांमध्ये प्रामुख्याने विविध पक्षी, प्राणी याची विविध आकाराची चित्रे आढळतात. या चित्रांमध्ये त्यावेळी उपलब्ध असलेले रंग सुद्धा भरलेले आढळतात. अश्मयुगीन मानवाची हीच कला कातळशिल्प म्हणून ओळखली जाऊ लागली. हा टप्पा कलेच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा म्हणून गणला जातो.

गेल्या काही वर्षांपासून कोंकणात विशेषतः किनारपट्टी लगतच्या भागात या कातळशिल्पांचा शोध लागत असून अश्या कातळ शिल्पांना 'कातळखोद शिल्प' असे संबोधण्यात येते. कोंकणात आढळणारी कातळशिल्पे हि वैशिष्टपूर्ण असून आकाराने खूप

मोठी आहेत. कोकणात आढळणाऱ्या ह्या चित्रांमध्ये विविध प्राणी, पक्षी आणि विविध प्रकारचे विशिष्ट आकार यांचा समावेश आहे. यापैकी काही चित्रांचा उलगडा झालेला नाही. आता या पुरातन कलेचे महत्व ओळखून या कातळ शिल्पांना जपण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच या बाबत शासनाकडून संशोधन आणि संरक्षणासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध गावांमध्ये अश्या कातळ शिल्पांचा शोध लागला आहे. याबाबतची शोध मोहीम हि अलीकडील काळातच सुरु झाली असून यापूर्वी यातील बरीच कातळ शिल्पे बागायती आणि चिरेखणी तयार करताना नष्ट झाली असल्याची शक्यता आहे.

मानव जातीच्या उत्क्रांतीच्या टप्प्यावर निर्माण झालेली कला आणि तिचा इतिहास याचा कोकणाला लाभलेला खूप मोठा सांस्कृतिक वारसा या निमित्ताने जगापुढे येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सुमारे पन्नास ठिकाणी अशी कातळशिल्पे आढळली आहेत. कोकणात आढळणारी बरीच कातळ शिल्पे हि चौकोनी स्वरुपाची आहेत. या शिल्पांना मांड असे संबोधण्यात येते. मांड या प्रकारच्या शिल्पामध्ये कोरलेली नक्षी हि साधारणपणे चौकोनी आकारात एखाद्या बैठकीसारखी असल्यामुळे हि पूर्वीच्या काळी बैठकीसाठी तयार करण्यात आलेली जागा असण्याची शक्यता आहे. याच्या आजूबाजूला नीट शोध घेतला तर कदाचित त्या काळात त्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या मानवाच्या रहिवासाबद्दल पुरावे सापडू शकतील असे वाटते.

**आरे येथील कातळशिल्प**



आरे हे देवगड तालुक्यातील एक निसर्ग संपन्न गाव. याच गावच्या सड्यावर असणारी दुर्लक्षित कातळशिल्पे हि जामसंडे येथील रहिवाशी आणि इतिहास संशोधन मंडळाचे सदस्य श्री. अजित टाककर याच्यामुळे सापडली आहेत. या कातळ शिल्पांबाबत यापूर्वी नीटशी जनजागृती झालेली नसल्यामुळे आरे या गावाला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन या कातळ शिल्पावरून गेलेली आहे. आरे येथील हे कातळशिल्प एका मोठ्या कातळावर खोदकाम करून कोरलेले आहे. हे कातळशिल्प आयताकृती असून याला पट्ट्याची बोर्डर खोदलेली आहे. पट्ट्याच्या आत नागमोडी आकाराचे पट्टे खोदलेले आहेत. आतील भागामध्ये विविध गोल, आयताकृती, चौकोनी, आणि नागमोड्या विविध आकृत्या कोरलेल्या आहेत. अश्या प्रकारच्या कातळ शिल्पांना 'मांड' असे संबोधण्यात येते. या कातळ शिल्पाच्या जवळच असलेल्या वाहळानजीक अत्यंत पुसट अश्या स्वरुपात मानवाकृती आकृती देखील कोरलेली आढळते. या आकृतीतील मानवाची पावले दोन्ही बाजूला वळलेली आहेत. अश्या मानवाकृती बऱ्याच ठिकाणी कोरलेल्या आढळतात. याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नसली तरी स्थानिक लोक हि मानवाकृती राखणदाराची असल्याचे सांगतात पण याबाबत कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही.

**दाभोळे येथील कातळशिल्प**

दाभोळे हे देवगड तालुक्यातील एक गाव असून याच गावात पोखरबाव याठिकाणी एक कोरीव लेणे आहे. लेण्याजवळ असलेल्या प्रसिद्ध गणपती मंदिरापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर हे कातळशिल्प आढळते. या कातळशिल्पामध्ये स्त्रीच्या

कमरेखालील भाग कोरलेला आढळतो. कमरेवर मेखलेप्रमाणे शिल्पांकन आढळते तर पायात तोडे असल्याप्रमाणे नक्षीकाम कोरलेले आहे. उत्खननात बऱ्याच मोठ्या प्रमाणात मातृदेवतेची अश्या प्रकारे खोदकाम केलेली शिल्पे आढळली असून अश्या शिल्पांची पूजा अर्चा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. दाभोळे येथे सापडलेले हे कातळशिल्प वेगळ्या प्रकारचे असून याबाबत नक्की माहिती उपलब्ध नाही.



दाभोळे येथील या कातळ शिल्पाला भेट दिली असता याठिकाणी कोणतेही दिशादर्शक होकायंत्र काम करीत नाही तरी याबाबत अधिक संशोधन होणे गरजेचे आहे.

**साळशी येथील कातळशिल्प**



देवगड तालुक्यातील साळशी हे गाव शिरगाव पंचक्रोशित आहे. ८४ गावांच्या अधिपतीचे जागृत देवस्थान असलेले श्री सिद्धेश्वर या देवाचे अधिष्ठान साळशी या गावातच आहे. याच गावात सड्यावर कातळशिल्प आढळले आहे. वर उल्लेख केलेल्या मांड या प्रकारचे शिल्प या गावात आढळून आले आहे. हे कातळशिल्प देखील नागमोडी नक्षीने काढलेले आढळते मात्र यातील नक्षी काटकोनात वळलेली आढळते.

**वानिवडे येथील कातळशिल्प**

देवगड ताल्युक्यात तळेबाजार या गावच्या पंचक्रोशीत येणारे वानिवडे गावदेखील तेथे सापडलेल्या कातळल्शिल्पांमुळे चर्चेत आले आहे. या गावात 'मांड' याच प्रकारातील कातळशिल्प आढळले आहे. याचा आकार मोठा आहे. या शिल्पाशिवाय या ठिकाणी आणखीही काही कातळल्शिल्पे आढळली आहेत. यापैकीच एक म्हणजे हरणाचे शिल्प. या शिल्पातील हरीण आपली मान मागे वळवून पहाताना आढळते.

रामायणातील कांचनमृगाप्रमाणेच या शिल्पामध्ये कोरलेली हरणाची प्रतीकृती आढळते. याच्या शेजारी एक कुत्र्याचे शिल्प, शेळीसारख्या प्राण्याचे शिल्प, एक सुळयाच्या अथवा शिंगाच्या आकाराचे शिल्प, एक ढोपरा पर्यंत कोरलेला अर्धवट स्थितीतील

मानवी पाय, नागाच्या फण्याच्या आकाराची चित्रे आणि डॉल्फिन माश्याशी साम्य असलेली दोन शिल्पे खोदलेली आढळतात. मात्र कालपरत्वे ही कातळशिल्पे अस्पष्ट झाली आहेत.

**गिर्ये येथील कातळशिल्प**



विजयदुर्ग पासून जवळ असलेल्या गिर्ये या गावात चौंडेश्वरी देवीचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिराच्या मागील बाजूस दोन कातळ शिल्पे आढळली आहेत. भात शेतीच्या माळयाच्या बाजूला असणाऱ्या कातळावर पुसटश्या रेषेत कोरलेली दोन कातळशिल्प आढळतात. यातील एका शिल्पामध्ये पावणे दोन मीटर उंच आणि सुमारे तीन मीटर लांब असा वराह कोरलेला आहे.



यापासून पुढे काही अंतरावर हरणांची शिकार करून ती ठेवली असावीत अश्या प्रकारचे प्रसंगचित्र काढलेले आहे. हे कातळशिल्प सुंदर आहे. एखादा शिकारीचा प्रसंग ह्या कातळ शिल्पातून दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये कोरलेल्या माणसांच्या आकृत्या ह्या सुबक नसल्या तरी हरणे मात्र सुरेखपणे रेखाटली आहेत. या चित्रातील माणसांपेक्षा हरणांचा आकार मोठा आहे.

**कुणकेश्वर येथील कातळशिल्प**

कुणकेश्वर दक्षिण कोकणची काशी म्हणून ओळखले जाणारे देवगड तालुक्यातील एक प्रसिद्ध शंकराचे देवालय. ११ व्या शतकात स्थापन झालेल्या या समुद्रकिनारी असलेल्या शिवाच्या मंदिरात दरवर्षी लाखो भक्त येत असतात. महाशिवरात्रीला येथे मोठो जत्रा भरते. या गावातही सड्यावर कातळशिल्पे सापडली आहेत. कुणकेश्वरपासून शेजारी असलेल्या ईळये या गावाकडे जाणाऱ्या मार्गावर महापुरुषाची कातळावर कोरलेली प्रतिमा आहे. महापुरुषाची हि प्रतिमा पावणेतीन मीटर उंच आहे. याची उंची रुंदीच्या तुलनेत जास्त दिसते. त्याचा डाव्या हातात हत्यार पकडलेले आहे. त्याच्या पोटावर एक मानवी पावलाचा ठसा आढळतो. हा ठसा डाव्या

पावलाचा आहे. या कातळ शिल्पापासून जवळच एक छोटे शिवलिंग कोरलेले आढळते. याबाबत सांगायचे झाले तर ते फार पुरातण काळातील असेल असे वाटत नाही.

**वाघोटण येथील कातळशिल्प**



देवगड तालुक्यातील वाघोटण हे गाव एक ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव म्हणून प्रसिद्ध आहे. देवगड आणि विजयदुर्ग या दोन बंदरांच्या मधोमध असलेले हे गाव ब्रिटीशकालीन बंदर म्हणून विकसित झाले होते. याच गावात ब्रिटीश सरकारकडून कैद करण्यात आलेल्या ब्रम्हदेशच्या थिबा राजाला सध्याच्या रत्नागिरी येथे असलेल्या थिबा पॅलेसमध्ये बंदिवासात ठेवण्यापूर्वी काही काळ अज्ञातवासात कैदेत ठेवण्यासाठी एक महाल बांधण्यात आला होता. थिबा राजाला रत्नागिरी येथे कैदेत ठेवण्यापूर्वी राजाला सोडविण्यासाठी होणारे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एक कुटील डाव म्हणून थिबा राजाला समुद्रमार्गे वाघोटण येथे आणण्यात आले आणि काही काळ या ठिकाणी बंदिवासात ठेवण्यात आले. ब्रिटीश राजवटीत मोठ्या प्रमाणावर व्यापारी बंदर आणि वखार तसेच विविध सरकारी कार्यालये वाघोटण या ठिकाणी असल्यामुळे मोठ्या प्रमाणत ब्रिटीश सैन्य या ठिकाणी होते त्यामुळेच वाघोटण हे एक सुरक्षित ठिकाण असल्यामुळे थिबा राजाला या ठिकाणी आणण्याचा निर्णय ब्रिटीश सरकारने घेतला होता. याच वाघोटण गावात कातळ शिल्प आढळली आहेत.

वाघोटण येथे सापडलेल्या कातळ शिल्पाचा शोध घेताना मोठ्या प्रमाणावर साफसफाई करावी लागली. या काळात शिल्पाशेजारी पारंपारिक पद्धतीने भातशेती केली जात असल्याने कातळ शिल्पावर मोठ्या प्रमाणात मातीचे थर होते. वाघोटण येथे चार कातळ शिल्प सापडली आहेत. वाघोटण येथे सापडलेली कातळ शिल्पांपैकी मुख्य कातळ शिल्प हे यापूर्वी उल्लेख केलेल्या मांड या प्रकारातील आहे. या शिल्पाला भोपळ्याची वेल असे नाव देण्यात आले आहे तर उर्वरित तीन पैकी एक वर्तुळ, एक मानवाकृती आणि एक वैशिष्टपूर्ण असे शिल्प आहे.

**बापर्डे येथील कातळशिल्प**

देवगड तालुक्यातील बापर्डे या गावतही कातळ शिल्पांचा शोध लागला आहे. बापार्डे गावच्या सड्यावर आढळलेले कातळ शिल्प हे वैशिट्यपूर्ण असे आहे. देवगड तालुक्यात सापडलेल्या कातळ शिल्पापैकी एक सर्वोत्तम असे कातळ शिल्प म्हणून याचा उल्लेख करता येईल. अत्यंत रेखीवपणे हे कातळ शिल्प कोरलेले आहे. हे कातळ शिल्प समअंगी कातळ शिल्प या प्रकारात मोडते. सुमारे अडीच मिटर रुंद आणि पावणेतीन मिटर लांब असलेले हे कातळ शिल्प जांभ्या दगडात कोरलेले आहे. याच्या मध्यभागी शिवलिंग कोरलेले आहे. याच्या वरच्या व खालच्या बाजूला गोपज्ञासारख्या आकृत्या कोरलेल्या आहेत. यातील उत्तरेकडील गोपज्ञात दोन बाजूला दोन मानवाकृती तर मधील भागात सुंदर अशी नक्षी कोरलेली आहे. दक्षिणेकडील गोपज्ञात पूर्व आणि पश्चिम दिशेला तोंड करून दोन पक्षी कोरलेले आहेत. हे पक्षी कावळे किंवा पोपट या पक्षाशी साधर्म्य बाळगतात.



**तळेबाजार येथील कातळशिल्प**

देवगड तालुक्यातील तळेबाजार सारख्या गजबजलेल्या ठिकाणीदेखील कातळशिल्प सापडले आहे. ऐन बाजारपेठेपासून जवळच असलेल्या तळ्याच्या शेजारी लिंगेश्वर मंदिराच्या दिशेने गेल्यावर मंदिर आणि स्मशानभूमी यांच्या मधील भागात ३२ फुट लांब आणि ३२ फुट रुंद असे कातळ शिल्प सापडले आहे. या कातळ शिल्पामध्ये खेकड्याची सुंदर अशी आकृती कोरण्यात आलेली आहे. मात्र त्यावेळी कातळ शिल्पाविषयी जनजागृती झालेली नसल्याने कलमबाग करताना या कातळ शिल्पाचा काही भाग नष्ट झाला आहे. परंतु आता सदर कातळ शिल्प जतन करण्यात आलेले आहे.

संपूर्ण कोकण किनारपट्टीला विस्तीर्ण असा समुद्र किनारा लाभलेला आहे. याच किनारपट्टी लगत पसरलेल्या सह्याद्रीच्या पर्वत रांगा आपल्यामध्ये फार मोठी गुपिते दडवून दिमाखात उभ्या आहेत. याच गुपितांपैकी एक म्हणजे सध्या सापडत असलेली कातळ शिल्पे. मात्र आजही या कातळ शिल्पांचे गूढ कायम आहे. सह्याद्रीच्या या पर्वत रांगाच्या माथ्यावर असलेल्या पठारांना स्थानिक भाषेत सडा या नावाने ओळखले जाते. कोंकणात आढळलेली बहुतेक सर्वच कातळ शिल्पे हि सड्यावर आढळली आहेत. देवगड तालुक्यातील कातळ शिल्प शोध मोहिमेत 'देवगड इतिहास संशोधन मंडळ' ही संस्था काम करीत आहे. या संस्थेकरिता कार्य करणारे श्री रणजीत हिर्लेकर, श्री अजित टाककर, श्री योगेश धुपकर, श्री लक्ष्मण पाताडे आणि सहकारी यांचा या शोध मोहिमेत मोलाचा वाटा आहे. या मंडळीना ग्रामस्थांचादेखील मोठा मदतीचा हात मिळत आहे. देवगड तालुक्यात सापडलेल्या या कातळ शिल्पांची माहिती होण्यासाठी या मंडळामार्फत सहलीचे आयोजन करण्यात येते. देवगडच्या पर्यटनामध्ये या कातळ शिल्प शोध मोहिमेमुळे निश्चित भर पडेल.

**संदर्भ**

1. समक्ष मुलाखत - श्री अजित टाककर, सचिव, इतिहास संशोधन मंडळ, देवगड कातळ शिल्प टुर ऑर्गनायझर अंड गाईड
2. दैनिक तरूण भारत लेख
3. https://mr.wikipedia.org
4. https://www.google.com

# थिबा राजा आणि वाघोटण – देवगड येथील वास्तव्याचा एक न उलगडलेला पैलू

**दक्षता सावंत**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
Corresponding author E-mail: sawantds.dc@gmail.com

१९ व्या शतकात ब्रम्हदेशावर (आताचा म्यानमार) कोनबॉन्ग घराण्याची राजसत्ता होती. या राजघराण्यात थिबा मिन याचा जन्म १ जानेवारी, १८५९ रोजी झाला. वयाच्या १९ व्या वर्षीच त्याला राज्यप्राप्ती झाली आणि १९७८ मध्ये तो ब्रम्हदेशाचा राजा म्हणून उदयास आला. जगावर आपली सत्ता स्थापन करण्याची लालसा असणाऱ्या ब्रिटीश राजकर्त्यांनी ब्रम्हदेशावर आपले वर्चस्व निर्माण करण्याच्या उद्देशाने थिबा राजा हा ब्रिटीश राजवटीचा शत्रू असून फ्रेंच राज्यकर्त्यांच्या मदतीने तो आपणास हानी पोचवू शकतो या उद्देशाने थिबा राजा विरुद्ध १८८५ मध्ये लढाई सुरु केली. ब्रिटीश सैन्यापुढे थिबा राजाचे सैन्य टिकाव धरू शकले नाही आणि थिबा राजाला ब्रिटीश सैन्यापुढे पराभव पत्करावा लागला.



**थिबा राजा आणि त्याच्या कुटुंबियांचा दुर्मिळ फोटो**

२९ नोव्हेंबर, १८८५ रोजी थिबा राजाने ब्रिटीश सैन्यापुढे शरणागती पत्करली आणि ब्रिटीश सैन्याने थिबा राजाला आपला कैदी बनविले आणि ब्रम्हदेशावर आपले साम्राज्य स्थापन केले. परंतु, थिबा राजाने आणि राजाच्या प्रेमापोटी त्याच्या उर्वरित सैन्याने पुन्हा आपल्या विरुद्ध उठाव करू नये म्हणून ब्रिटीश सरकारने थिबा राजाला ब्रम्हदेशापासून दूर न्यायचे ठरविले. १६ एप्रिल, १८८६ मध्ये थिबा राजाला पत्नी आणि मुलांसह समुद्रमार्गे भारतात मद्रास येथे आणण्यात आले. तेथून रत्नागिरी येथे आणण्याचे ठरविले. त्याठिकाणी राजाला कैदेत ठेवण्यासाठी रत्नागिरी येथे एका महालाची उभारणी करण्याचे काम सुरु करण्यात आले. मात्र थिबा राजाला मद्रास मार्गे भारतात आणल्यानंतर या ठिकाणी कैदेत ठेवायचे होते परंतु त्याठिकाणचे बांधकाम पूर्ण झालेले नसल्याने रत्नागिरी येथे नेण्यापूर्वी थिबा राजाला त्याच्या कुटुंबासह सध्या असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील वाघोटण या गावी नेण्याचे ठरविण्यात आले.

देवगड तालुक्यातील वाघोटण हे बंदर ब्रिटीश कालावधीत नावारूपाला आले होते. ब्रिटीश राजवटीत सुरु असलेल्या व्यापाराची मुख्य केंद्रे देवगड आणि विजयदुर्ग ही बंदरे होती. देवगड आणि विजयदुर्ग यांच्या मध्यावर अत्यंत सोईचे ठिकाण म्हणजे वाघोटण बंदर. देवगड पासून सुमारे २० किमी आत आलेली वाघोटणची खाडी अत्यंत निसर्गरम्य परिसराने वेढलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात व्यापारी वसाहतीमुळे वाघोटण हे एक नावाजलेले बंदर म्हणून विकसित झाले होते. ब्रिटीश सरकारच्या अनके शासकीय वसाहती या ठिकाणी वसवण्यात आल्या. कालपरत्वे आता या ठिकाणी बऱ्याच इमारती नष्ट झाल्या आहेत. १६० पेक्षा अधिक वर्षांची परंपरा असलेलया वाघोटण बंदराबद्दल अजूनही बऱ्याच लोकांना माहिती नाही. देवगड तालुक्यात अत्यंत दुर्गम

भागात असलेले वाघोटण हे बंदर ब्रिटीश राजवटीत देवगड आणि विजयदुर्ग या बंदराप्रमाणेच एक व्यापारी बंदर म्हणून ओळखले जात होते. वाघोटण बंदरातून व्यापारी मालाची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत होती. ब्रिटीशांच्या १५० वर्षांच्या राजवटीत वाघोटण हे एक व्यापारी बंदर म्हणून उदयास आले होते. दळणवळणाची साधने व्यापारासाठी उपलब्ध नसल्याने सुमारे २० व्या शतकात व्यापाराची सोय व्हावी या उद्देशाने वाघोटण या बंदराची निर्मिती करण्यात आली. या बंदरातून व्यापाराबरोबरच प्रवाशी वाहतूक देखील मोठ्या प्रमाणात होत होती आणि वाघोटण हे एक अत्यंत प्रगत आणि संपन्न गाव म्हणून नावारूपास आले होते. वाघोटण खाडी पलीकडील प्रामुख्याने मोंड, बापार्डे, वानिवडे, पेंढरी, गोवळ, मणचे, पोंभुर्ले, मुटाट या गावांचा व्यापार उदीम हा पूर्णपणे वाघोटण बंदरावरच अवलंबून होता. वाघोटणच्या आजुबाजुच्या गावांमधील अनके लोक बोटीतून प्रवास करण्यासाठी वाघोटण या बंदराचा मोठ्या प्रमाणात वापर करीत असत.

देवगडच्या आजूबाजूच्या गावांमध्ये तागाचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणत घेतले जात असे. आजूबाजूच्या गावांमध्ये पिकविलेला हा ताग मुंबई येथील बाजारपेठेत विक्रीसाठी समुद्रमार्गाने पाठविण्यात येत असे आणि यासाठी मोठ्या प्रमाणात मचव्यांचा वापर करण्यात येत असे. देवगड चा ताग हा इतक्या मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत पाठविला जायचा की त्यामुळेच टाईम्स ऑफ इंडिया मध्ये मुंबईतील बाजारभाव छापताना देवगडच्या तागाचा भाव छापण्यात येई. सहाजिकच देवगड तालुक्यात वाघोटण खाडी पलीकडील गावांमध्ये पिकणारा ताग हा वाघोटण खाडीमार्गेच मुंबईला रवाना होत असे. वाघोटण खाडीच्या पलीकडे असलेल्या नाणार व आसपासच्या गावांमधील ताग देखील वाघोटण बंदरामधूनच मुंबईला रवाना होत असे. कालांतराने तागा पाठोपाठच मंगलोरी कौले, मीठ आणि सिलीपाठ लाकूड यांचीही वाहतूक मोठ्या प्रमाणात या बंदरांमधून होऊ लागली. यामुळेच देवगड आणि विजयदुर्ग यांच्या मध्ये असल्येल्या वाघोटण बंदराचा वापर आणि विकास ब्रिटीश कालावधीत झाला होता आणि ब्रिटीश राजवटीला या बंदराबाबत आणि आजूबाजूच्या परिसराबाबत माहिती असल्यामुळे थिबा राजाला काही काळ अज्ञातवासात ठेवण्यासाठी वाघोटण हे अत्यंत सोईचे ठिकाण होते.

ब्रिटीश राजवटीत व्यापारासाठी देवगड हे प्रामुख्याने व्यापाराचे प्रमुख बंदर म्हणून नावाजलेले बंदर होते. देवगड व विजयदुर्ग ही बंदरे थेट अरबी समुद्रापासून किनारपट्टीला लागून आहेत मात्र वाघोटण हे बंदर देवगड पासून सुमारे २० किमी आत असल्याने शत्रूपासून सुरक्षित बंदर होते, म्हणूनच थिबा राजाला अटक केल्यानंतर राजाच्या उर्वरित सेनेकडून किवा फ्रेंच सैन्याकडून उठाव झाल्यास सुरक्षितता म्हणून थिबा राजाला वाघोटण येथे काही कालावधीसाठी आणण्याचे निश्चित्त करण्यात आले. यासाठी ब्रिटीशांकडून वाघोटण येथे एका महालाची उभारणी करण्यात आली. वाघोटण बंदरापासून जवळच एक मोठा एकमजली महाल यासाठी सज्ज करण्यात आला. या महालाचे बांधकाम पारंपारिक पद्धतीने लाकूड आणि दगडांचा वापर करून करण्यात आलेले आहे.

सुमारे ४० फुट रुंद आणि ७० फुट लांब आकाराच्या या महालामध्ये राजा आणि त्याच्या कुटुंबियांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या महालामध्ये दिवाणखाना, बैठकीची जागा, स्वयंपाकघर, शयनगृहे यासोबतच अनेक खोल्या बांधण्यात आल्या. महालात प्रवेश करताच सुमारे १२ फुट रुंद आणि ६० फुट लांबीचा प्रशस्त व्हरांडा आहे. मोठमोठ्या आठ दगडी खांबांवर सुबक असे बांधकाम करण्यात आलेले आहे. आतील बाजूस मधोमध दिवाणखाना असून त्याच्या दोन्ही बाजूला मोठमोठ्या खोल्या आहेत. महालाच्या मागील बाजूस प्रशस्त असे स्वयंपाकघर असून खानपानासाठी केलेली व्यवस्था होती. तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर प्रशस्त अश्या प्रत्येकी सहा खोल्या आहेत.

महालाच्या व्हरांड्यातून डाव्या बाजूने पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी लाकडी जिना आहे. तर दिवाणखान्याच्या मागील भागातून देखील पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी लाकडी जिना आहे. महालाच्या बाहेरील बाजूने थेट पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी दगडी जिना आहे. खिडक्यांना मोठमोठी लाकडी तावदाने असून यामध्ये काचा बसविण्यात आलेल्या आहेत. खिडक्यांची गवाक्षे देखील अत्यंत सुबक कलाकुसरीने सजवलेली आहेत. याकरिता तांबे या धातूचा वापर करण्यात आलेला आहे. ब्रिटीशकालीन बांधकामशैली आणि कलाकुसर याचा या इमारतीवर प्रभाव आढळतो. महालाच्या छताची रचना चौसोपी पद्धतीची असून कोणत्याही प्रकारे उष्णतेचा त्रास होऊ नये म्हणून पहिल्या मजल्याचे छप्पर नळयांनी आचछदलेले होते. या नळयांचे नऊ थर लावून हे छत

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

बनविण्यात आलेले होते. कालपरत्वे आता हे छप्पर जीर्ण झाल्याने आणि त्याच्या दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य आणि कुशल मजुरांचा अभाव यामुळे सध्या हे छत काढून सध्या पत्र्याचे बनविण्यात आले आहे.



**वाघोटण येथे थिबा राजाच्या वास्तव्यासाठी बांधण्यात आलेला महाल**

निसर्गरम्य वातावरणात महालाच्या पहिल्या मजल्यावरून दिसणारी वाघोटण खाडी इतिहासाच्या अनेक घटनांची आणि ब्रिटीश राजवटीची साक्ष देत आजही संथपणे वाहत आहे. या महालाच्या वरील मजल्यावरून विजयदुर्ग खाडीचे होणारे दर्शन मन मोहून टाकते. या महालाबरोबरच याच्या आजूबाजूचा परिसर देखील अत्यंत निसर्गरम्य आहे. या महालाच्या आवारातून वाघोटण खाडीचे विहंगम असे दृश्य दिसते. विजयदुर्ग पासून आत वाघोटण बंदरापासून आत असलेली ही खाडी नयनरम्य आहे. पुढे या खाडीतून खारेपाटण आणि मुटाट या गावांकडे जाण्यासाठी सागरी मार्ग आहे. खाडीच्या पलीकडे राजापूर तालुक्यातील नाणार आणि कातळी हे गाव आहेत. खाडी शेजारी काही ठिकाणी भातशेती तर काही ठिकाणी हापूस आंब्याच्या बागा आढळतात. ब्रम्हदेशाच्या या राजघराण्याचा ब्रिटीश राजवटीमुळे होत असलेला अंत या वास्तुने पहिला आहे आणि अनुभवला आहे. कालपरत्वे ही ऐतिहासिक वास्तू जीर्ण अवस्थेत आजही थिबा राजाच्या कैदेची साक्ष देत उभी आहे.

वाघोटण खाडी आणि बंदराचा हा पैलू आणि याचा इतिहास मोजक्याच लोकांना महित आहे. आजही वाघोटण गावातील जाणकार लोक आणि त्यांच्या पुढच्या पिढीतील काही व्यक्ती या इतिहासाबद्दल भरभरून बोलतात. त्यांच्या पूर्वजांनी अनुभवलेले आणि कथन केलेले अनुभव आजही वाघोटण गावच्या अनेक व्यक्तींच्या तोंडून ऐकायला मिळतात.



**विजयदुर्ग खाडीचे मनमोहक दृश्य दिसते तो पहिल्या मजल्याचा व्हरांडा**



**वाघोटण खाडीचे विहंगम दृश्य**



**वाघोटण बंदर**

थिबा राजाचा वाघोटण येथील वास्तव्याचा इतिहास हा राजाला गुप्तपणे या ठिकाणी ठेवलेले असल्याने ब्रिटीश राज्यकर्त्यांनी पुढे येऊ दिला नाही. राजाच्या या ठिकाणच्या वास्तव्याला अत्यंत खुबीने लपविण्यात आले आणि त्यामुळेच की काय आजही वाघोटणपासून जवळपास असणाऱ्या गावांमधील गावकरी देखील या इतिहासापासून अनभिज्ञ आहेत. गावतील ठराविक लोकांनाच याची माहिती असून थिबा राजाच्या वाघोटण येथील वास्तव्याचा हा पैलु उलघडलाच नाही आणि राजकैदेत असलेल्या थिबा राजाचा वाघोटण येथील राजकैदेचा इतिहासदेखील कैद झाला. थिबा राजाच्या वाघोटण येथील वास्तव्याबाबत काही लोकांमध्ये दुमत आढळते. काही व्यक्तिंच्या मतानुसार वाघोटण येथील अपु-या पाण्याची व्यवस्था आणि साथीचा पसरलेला रोग या दोन गोष्टींमुळे थिबा राजाला कैदेत ठेवण्यासाठी वाघोटण या ठिकाणी आणण्याचे रद्द करण्यात आले होते. याबाबत मतभिन्नता असली तरी ठोस ऐतिहासिक पुरावा मात्र उपलब्ध नाही.

भारताला स्वात्रंत्र्य मिळाल्यानंतर व्यापाराच्या संकल्पन बदलल्या, वाहतुकीची साधने बदलली, दळणवळणाच्या सोई निर्माण झाल्या आणि हळूहळू समुद्रमार्गे होणारी वाहतूक कमी झाली. कालपरत्वे विकसित झालेल्या वाहतूक व्यवस्थेचा फटका जलवाहतुकीला बसला आणि समुद्र मार्गे होणारा व्यापार थांबला. याचाच परिणाम म्हणून ब्रिटीशांच्या काळात उदयास आलेले वाघोटण बंदर व्यापार उदिमापासून वंचित झाले आणि काळाच्या ओघात भूतकाळात जमा झाले.



**थिबा पॅलेसचे एक दुर्मिळ छायाचित्र**



**दुरुस्तीनंतर सद्यस्थितीत असलेला थिबा पॅलेस**

देवगड ते वाघोटण हे साधारणपणे २५ किमीचे अंतर आहे. देवगड पासून पडेल येथून तरेळेच्या दिशेने गेल्यावर वाघोटण तिठा येतो, तिथून डाव्या बाजुला साधारण दोन किलीमिटर अंतरावर हा महाल आहे. सध्या या महालाभोवती हापूस आंब्याची मोठी बाग आहे. हा महाल अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे इतक्या मोठ्या महालाची देखभाल करण्यासाठी देखील मोठा खर्च येतो त्यामुळेच की काय याची हवी तशी मरम्मत झालेली दिसून येत नाही. याची मालकी सध्या मराठे कुटुंबीय यांच्याकडे असून त्यांनी या वास्तूच्या देखरेखीसाठी तिथे माणसाची नेमणूक केलेली आहे. महालाची देखभाल करणारे श्री गोविंद भिकाजी देवळेकर हे बाजूच्याच सौंदाळे गावचे रहिवाशी असून वय वर्षे ८० असलेले हे गृहस्थ आजही मोठ्या उत्साहाने या महालाच्या इतिहासाबद्दल भरभरून बोलतात. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे १९३२ साली मराठे कुटुंबीय यांनी ब्रिटिश सरकारकडून हा महाल लिलावात विकत घेतला.

मात्र त्यावेळी राजाने वापरलेली कोणतीही वस्तू लिलावात देण्यात आली नाही. याच परिसरात घोड्यांचा तबेला होता. पाण्याची विहीर अस्तित्वात आहे.

थिबा राजाच्या अटकेनंतर त्याच्या सुटकेसाठी होणारे उठाव मोडून काढण्यासाठी ब्रिटीश सरकारने रत्नागिरी येथे बंदिस्त करण्याचे ठरविले. त्यानुसार त्या थिबा राजाला रत्नागिरी येथील थिबा पॅलेसमध्ये नेण्यात आले. थिबा मिन या ब्रम्हदेशच्या राजाला राजकैदेत ठेवण्यासाठी ब्रिटिशांनी रत्नागिरी येथे जो महाल बांधला तो आजही रत्नागिरी येथे एक ऐतिहासिक वास्तू म्हणून शासनाने जपला आहे. याच महालात थिबा राजाला राजकैदेत ठेवण्यात आले आणि याच ठिकाणी ३१ वर्षे कैदेत राहिल्यानंतर सन १९१६ साली थिबा राजाचा विपन्नावस्थेत मृत्यू झाला. कठोर ब्रिटीश शासकांकडे अनेक वेळा विनंती करूनही या राजाचे पार्थिव मायदेशी नेण्यास परवानगी देण्यात आली नाही. शेवटी १९१९ मध्ये या राजाच्या पार्थिवावर रत्नागिरी येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. रत्नागिरीच्या शिवाजीनगर भागात थिबा राजा आणि त्याची कनिष्ट भार्या सुपायलाय यांची समाधी स्मारके पहायला मिळतात.

ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करताना साम, दाम, दंड, भेद या चारही नीतींचा वापर केला. ब्रम्हदेशच्या राजघराण्याचा ब्रिटीशांनी केलेला अंत आणि त्यांची झालेली वाताहत याची साक्ष देत आजही रत्नागिरीमधील थिबा पॅलेस स्तब्धपणे उभा आहे.

**संदर्भ**

1. टीम मटा ऑनलाईन
2. थिबा राजा – मधु मंगेश कर्णिक – अनघा प्रकाशन, ठाणे
3. हद्दपार राजा थिबा – सुधा शहा – अनु. गिरीश जोशी
4. Trager, F. N. Burma: From Kingdom to Independence, London – 1966
5. Woodman, Dorothy – The Making of Burma, London, 1962
6. प्रहार दिवाळी अंक – २०१०

# सिंधुदुर्गमधील वारसा पर्यटन

**संदीप शिवराम तेली**

श्री. स. ह. केळकर महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: teliss.dc@gmail.com

**सिंधुदुर्गविषयी**

एका बाजूने ७२० किलोमीटरच्या विस्तीर्ण अश्या सागरी पट्ट्याचा मोठा हिस्सा वाट्याला आलेला, तर दुसर्या बाजूने डौलदार उभा असणारा आणि जैव विविधतेने नटलेला सह्याद्रीचा कडा यामध्ये वसलेला सिंधुदुर्ग जिल्हा हा 'कोकण' या उंच पठारी प्रदेशाच्या पश्चिमेला असून ऐतिहासीक रीत्या आपल्या आपल्या लांब तट रेखा आणि सुरक्षित बंदरे यांसाठी प्रसिद्ध आहे. हा जिल्हा पूर्वी रत्नागिरी जिल्ह्याचा एक भाग होता. परंतु १ मे १९८१ पासून प्रशासकीय सुविधा तसेच औद्योगिक आणि कृषी विकास यांच्या साठी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग अशा २ जिल्ह्यात विभागीत करण्यात आला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला, मालवण, देवगड, कणकवली, वैभववाडी आणि दोडामार्ग अशा ८ तहसील केंद्रांचा समावेश होतो.

**पर्यटन**

पर्यटन हा सर्वांच्या आवडीचा विषय आहे, वर्षभरातून किमान एक वेळ तरी कुटुंबासह देश किंवा विदेशात पर्यटन करण्याचा कल सध्या वाढताना दिसत आहे. अलीकडच्या काळात कृषी पर्यटन, वन पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, साहसी पर्यटन, सामाजिक पर्यटन, कृषी पर्यटन, इ. विविध प्रकारचे पर्यटन सुरु झालेले दिसून येते.

**वारसा पर्यटन (Heritage Tourism)**

वारसा पर्यटन (Heritage Tourism) म्हणजे एखाद्या प्रदेशातील किंवा प्रांतातील शतकानुशतके असणारा वारसा पाहण्यासाठी तिथल्या पारंपारिक वास्तू, उद्याने, ऐतिहासिक ठिकाणे, पुरातन संस्कृतीची ओळख करून घेण्यासाठी विविध प्रांतातील लोक प्रवास करतात. निसर्गाने मुक्त हस्ते दिलेली तसेच मानवाने निर्मित केलेली संस्कृती पाहण्याची तसेच तिथली ऐतिहासिक रचना जाणून घेण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी वारसा लाभलेल्या ठिकाणी भेटी देतात.

सिधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास होण्याच्या दृष्टीने दोन घटक सर्वात जास्त महत्वाची भूमिका पार पडताना दिसतात. एक म्हणजे पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने सरकारमार्फत विविध प्रकल्पाच्या माध्यमातून केले जाणारे प्रयत्न आणि दुसरा महत्वाचा घटक म्हणजे पर्यटन विकास करण्याच्या हेतूने विकसित होणारी समाज माध्यमे. यामध्ये facebook, you tube अशा अनेक समाज माध्यमाच्या सहाय्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकसित करण्यासाठी पुढे येणारी तरुणाई. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, वेंगुर्ले येथील सर्वपरिचित कोकणी रान माणूस - प्रसाद गावडे, देवगडचा प्रगत लोके, आचरा गावचा लकी कांबळी इ. अनेक तरुण सिंधुदुर्ग जिल्यातील पर्यटन विकसित होण्यासठी सामाजमाध्यमांमध्ये विविधी माहिती व्हिडीओ रूपाने प्रसारित करतात आणि जगाच्या काना कोपऱ्यातपर्यंत ही माहित पोहचते. यामुळे वारसा पर्यटन वाढीस लागत आहे.

**सिंधुदुर्ग जिल्हा आणि वारसा पर्यटन (Heritage Tourism)**

सिंधुदुर्ग जिल्हा आणि वारसा पर्यटन यांचा संबंध फार जवळचा आहे. याचे कारण असे कि, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये गडकिल्ले, जलदुर्ग, पांडवकालीन मंदिरे, कातळ शिल्पे अशा बहुविध ठिकाणांना विशिष्ट असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, त्यासाठीच देशभरातून विविध पर्यटक अशा ऐतिहासिक तसेच वारसा स्थळांना भेट देण्यासाठी विविध ठिकाणाहून पर्यटनाच्या निमित्ताने येत असतात.

- **किल्ले सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग हा महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला जलदुर्ग आहे. नोव्हेंबर २५, इ.स. १६६४ रोजी किल्ल्याच्या बांधकामाला सुरुवात झाली. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २१ जून, इ.स.

२०१० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. शिवाजी महाराजांच्या आरमारात या किल्ल्याला फार महत्त्व होते. भुईकोट आणि डोंगरी किल्यांच्या बरोबरीने

सागरी मार्गावरील शत्रूंची स्वारी परतून लावण्यासाठी जलदुर्गाची निर्मिती महत्त्वाची आहे, हे ओळखून शिवाजी महाराजांनी सागरी किल्ले निर्माण केले. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा स्मृतिमय इतिहास म्हणजे हा किल्ला आहे. असंख्य मावळयांच्या साक्षीने आणि परिश्रमाने समुद्रात उभा केलाला हा किल्ला आजही पर्यटकांना विशेष आकर्षित करतो.



**सिंधुदुर्ग**

- **किल्ले विजयदुर्ग**

विजयदुर्ग हा किल्ला ११ व्या शतकाच्या अखेरीस शिलाहार घराण्यातील राजा भोजने बांधला. पुढे तो बहामनी व नंतर आदिलशाहीच्या ताब्यात होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६४ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विजयदुर्ग किल्ला जिंकला. विजयदुर्गला पूर्वेकडील जिब्राल्टर असेही म्हणत कारण हा एक अजिंक्य किल्ला होता. ४० किलोमीटर लांब असलेली वाघोटन खाडी हे या किल्ल्याचे बलस्थान आहे. कारण मोठी जहाजे खाडीच्या उथळ पाण्यात येऊ शकत नसत आणि मराठी आरमारातील छोटी जहाजे या खाडीत नांगरून ठेवली जात, पण ती समुद्रावरून दिसत नसत.



**विजयदुर्ग**

- **किल्ले देवगड**

देवगड किल्ला हा जंजिरा देवगड किल्ला या नावाने सुद्धा ओळखला जातो. देवगडपासून पाच किलोमीटर अंतरावर देवगड किल्ला उभारला गेला आहे. हा एक जलदुर्गाचा प्रकार आहे. किल्ल्यावर दीपगृह, गणेश मंदिर, तीन तोफा, बुरुज इत्यादी पाहण्यासारखे ठिकाणे आहेत. हा किल्ला १७२९ मध्ये दत्ताजीराव आंग्रे यांनी बांधला व नंतर कान्होजी आंग्रे यांच्या नियंत्रणामध्ये बरेच वर्ष होता. देवगडचा किल्ला समुद्रात शिरलेल्या टेकडीच्या निमुळत्या होत गेलेल्या टोकावर वसलेला आहे. या किल्ल्यावर तीन टेहळणी बुरुज असून त्यांचा उपयोग समुद्रावर, बंदरावर व आजूबाजूच्या परीसरावर लक्ष ठेवण्यासाठी होत असे. या किल्ल्याला ३

बाजूंनी समुद्राचे नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. चौथ्या म्हणजेच टेकडीच्या बाजूने संरक्षण देण्यासाठी कातळात ३ मीटर रुंद व २.५ मीटर खोल खंदक खोदलेला आहे.



**देवगडचा किल्ला**

**इतर किल्ले**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या ऐतिहासिक वारसा याचा विचार केल्यास अनेकविध ऐतिहासिक किल्ले सिंधुदुर्गात आपणास पहावयास मिळतील. या किल्ल्यांची यादी खालीलप्रमाणे

- पद्मदुर्ग – मालवण
- राजकोट – मालवण
- सर्जेकोट – मालवण
- रामगड – मालवण
- सिद्धगड – ओवालीये मालवण
- वेताळ गड – गुरामवाडी मालवण
- भरतगड – मसुरे मालवण
- यशवंत गड – रेडी वेंगुर्ला
- निवती किल्ला – भोगवे वेंगुर्ला
- भैरवगड – नरडवे कणकवली
- खारेपाटण किल्ला – खारेपाटण
- सोनगड – घोडगे कुडाळ
- मनसंतोष गड – शिवापूर कुडाळ
- मनोहर गड – शिवापूर कुडाळ
- महादेवगड – आंबोली सावंतवाडी
- नारायणगड – गेळे सावंतवाडी
- हनुमंत गड – फुकेरी सावंतवाडी

**कातळ शिल्प**

कातळ शिल्प हे एक प्राचीन शिल्पकला आहे, पेट्रोग्लिफ्स हे प्रागैतिहासिक कलाकृतींपैकी एक आहे जे सपाट, खुल्या लॅटराइट खडकाच्या पृष्ठभागावर/लॅटराइट पठारावर कोरलेले आहे. या कातळ शिल्पांमध्ये प्रामुख्याने प्राणी, पक्षी, जलचर प्राणी, मानवी आकृती, भूमितीय रचना इ. अनेक प्रकारच्या प्रतिमा आहेत.



**कातळ शिल्पाचा नमुना**

सांस्कृतिक वाराश्यामध्ये सजवलेली कातळ शिल्प कला आजही विभिन्न ठिकाणे आणि म्युझियममध्ये प्रदर्शित होत आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात वाघोटण, पोखरबाव, तालेबजार, वळीवंडे या ठिकाणी तसेच कणकवली तालुक्यातील बुधवळे येथे हि कातळ शिल्पाची प्राचीन कला आपल्याला पाहायला मिळू शकते.

**प्राचीन व ऐतहासिक मंदिरे**



**रामेश्वर मंदिर , गिर्ये – विजयदुर्ग**



**गणपती मंदिर, पोखारबाव – दाभोळे**



**विमलेश्वर मंदिर , वाडा**



**भगवती मंदिर – कोट कामते**

सिंधुदुर्गातील देवगडमधील कोटकामते येथे भगवती मंदिर आहे. देवगड पासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर हे गाव आहे, व्यक्तिगत इनामे आणि संस्थाने खालसा झाली तरीही देवगडमध्ये अस्तित्वात असणाऱ्या इनामांपैकी हे एक गाव. या गावच्या सर्वच जमिनीवर प्रमुख कब्जेदार म्हणून 'इनामदार श्री देवी भगवती संस्थान, कोटकामते' असा शिक्का जमिनीच्या प्रत्येक सातबारा वर असतो.

विजयदुर्ग गावातील गिर्ये येथे रामेश्वर मंदिरात कातळात कोरलेल्या पायऱ्या पाहण्यास मिळतात. पांडवकालीन स्थापित श्री रामेश्वर हे येथील पंच क्रोशिमधील लोकांचे श्रद्धास्थान आहे.

देवगड पासून १२ किलोमीटर अंतरावर पोखारबाव येथे गणपती मंदिर आहे. याठिकाणी पांडवकालीन एक विहीर असून त्या विहिरीवर प्राचीन काळातील श्री सिद्धिविनायकाची मूर्ती स्थापित आहे. येथे वर्षभर पाण्याचे झरे वाहत असतात.

वाडा येथील विमलेश्वर मंदिराची निर्मिती पांडवकालीन असून हे मंदिर एका पूर्ण दगडात कोरून त्याठिकाणी शिवपिंडीची पूजा केली जाते. ह्या मंदिराच्या खालच्या बाजूला पाण्याचे झरे देखील आहेत, त्यामुळे येथील वातावरण नेहमीच मन प्रसन्न करणारे असते. हे मंदिर देवगड पासून ८ किलोमीटर अंतरावर आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा महाराष्ट्र, भारतातील एक ऐतिहासिक आणि सौंदर्यपूर्ण स्थान आहे ज्यात अनेक ऐतिहासिक स्थळे, किल्ले, मंदिरे, आणि प्राचीन स्मारके स्थित आहेत. ह्या सर्व घटकांमुळे जिल्ह्यातील पर्यटन हे दिवसेंदिवस विकसित होत आहे, तसेच शासकीय स्तरावरदेखील ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि तेथील परिसराचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक योजना राबविताना दिसून येत आहेत. त्याचबरोबर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी, दोडामार्ग इ. या तालुक्यामध्ये ऐतिहासिक पर्यटन (Heritage Tourism) शी निगडीत अर्थव्यवस्थादेखील बळकट होत आहे.

**संदर्भ**

1. https://maharashtrainformation.in
2. https://sindhudurg.nic.in
3. https://kokanshakti.com

# सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात कृषी पर्यटनाची महत्वाची भूमिका

**अमोल सुधाकर तेली**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड, सिंधुदुर्ग

Corresponding author E-mail: kinjawadekaras.dc@gmail.com

**प्रस्तावना**

भारत सरकारने १९९८ मध्ये संपूर्ण सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. स्थानिक लोक २०२३ मध्ये पर्यटनाचे २५ वे वर्ष साजरे करत आहेत. कृषी पर्यटन अर्थात 'अग्रो टुरीझम' हे ग्रामीण भारताचे रोजगार निर्मितीचे महत्वाचे साधन असून या माध्यमाच्या आधारे ग्रामीण भागातील लोकांचा शाश्वत विकास शक्य आहे. जिल्ह्यात कृषी पर्यटनाची उपयुक्तता अजून म्हणावी तितकी आपल्या ध्यानात आलेली नाही. कृषी पर्यटन केंद्र आपल्या जिल्ह्यात खूप कमी प्रमाणात बघायला मिळतात. कृषी पर्यटनामुळे स्थानिक लोकांना, तरुणांना रोजगार मिळतील परंतु यासाठी मोठ्या प्रयत्नांची गरज आहे.

**कृषी पर्यटन**

कृषी पर्यटन म्हणजे गावात किंवा शेतात जाऊन राहणे व तिथल्या खाद्य पदार्थांवर ताव मारणे एवढाच अर्थ लक्ष्यात घेऊ नये, तर संपूर्ण जग ज्या क्षेत्रावर अवलंबून आहे, तो मुख्य व्यवसाय जाणून घेण्याची संधी आपल्याला या पर्यटनातून मिळू शकते. याशिवाय कृषी पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक कला, स्थानिक संस्कृती, रूढी-परंपरा, खाद्यसंस्कृती आणि सांस्कृतिक वारसा या सर्व गोष्टींना चालना देता येऊ शकते.

**पर्यावरणपूरक व्यवसाय**

शेतघरात किंवा मांगरात जाऊन राहण्यातल्या महत्वाच्या गोष्टींपैकी एक म्हणजे पर्यटक आपल्या सहभागातून त्या ठिकाणी आपले योगदान देऊ शकतात. पर्यटक ग्रामीण जीवन अनुभवू शकतात. गावात कोणत्याही इलेक्ट्रोनिक उपकरणांचा वापर न करता दैनंदिन कामे केली जात असत, त्याचप्रमाणे शेतीची मशागतीची कामे, रहाटाने विहिरीचे पाणी काढणे, दुधाच्या धारा काढणे, ताक घुसळणे, फळे तोडणे, चुलीवर जेवण बनवणे, पाट्यावरचे वाटण, मुसळाने भात सडणे, मसाला तयार करणे, जात्यावर दळण दळणे, त्याचबरोबर ओव्या म्हणणे, शेणाने अंगण सारवणे, अंगणात चुन्याने कणे काढणे (रांगोळी) याचा आनंद पर्यटक उपभोगू शकतात. तसेच कृषी पर्यटन केंद्र हे प्लास्टिकमुक्त असले पाहिजे.

**गावकऱ्याना फायदे**

कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ व इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढेल शिवाय स्थानिक युवावर्गाला आपल्याच गावात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. स्वतः पिकवलेल्या शेतमालाची किंमत स्वतः शेतकऱ्यानाच ठरवता येईल. शेतीवर अवलंबून असणाऱ्या अनेक गोष्टीतून अनेकांना रोजगाराच्या संधी मिळतील.

कृषी पर्यटनामुळे कृषी उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळेल. ग्रामीण भागातील लघु उद्योग – कुटीर उद्योगाला चालना मिळेल. तसेच महिला बचत गटांना विविध वस्तू , कलाकुसर आणि पदार्थ विक्रीसाठी चांगली संधी मिळेल. अश्याप्रकारे कृषी पर्यटनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल. आपल्या जिल्ह्यात ज्या ठिकाणी कृषी पर्यटन केंद्र आहे त्याच्या जवळपासच्या परिसरात धार्मिक स्थळे, मंदिरे, मोठ्या नर्सरी असतील, फळबागा असतील, लघु उद्योग – कुटीर उद्योग, सेंद्रिय भाजीपाला पिकवणारे शेतकरी असतील, प्रसिद्ध ठिकाणे असतील आणि मुख्य म्हणजे गावचा आठवडी बाजार अश्याठिकाणी पर्यटकांना फिरण्यासाठी नेल्यास ते त्या ठिकाणांहून वस्तू खरेदी करू शकतात. त्यामुळे स्थानिक व्यवसाय वाढतील. त्यातून गावचा विकास होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील वस्तू शहराच्या ठिकाणी जाऊन विकण्यापेक्षा तीच वस्तू जर कृषी पर्यटन केंद्रावर किफायतशीर किमतीत विक्री होत असेल

तर यातूनच पर्यटकांचीही आर्थिक बचत होईल. तसेच गावकऱ्यानाही आर्थिक मदत होईल. त्याचबरोबर कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांचे नियोजन, आदरातिथ्य, पर्यटकांना फिरण्यासाठी गाडी, टूर गाईड, स्वयंपाकासाठी, शेतीकामासाठी, लोन्ड्री, माळीकाम, ट्रेकिंग, बोटिंग, बैलगाडी राईड, जंगल सफारी, कांदळवन सफारी, शेताची माहिती, बाजार खरेदी, ऑनलाईन मार्केटिंग, जाहिराती इतर कामांसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागते. यासाठी गावातील तरुण पिढीचा विचार केला पाहिजे. यातून शेतकऱ्यांबरोबरच गावातील युवकांना गावातच रोजगार मिळू शकेल आणि युवापिढी गावातच स्थिरावेल. खऱ्या अर्थाने गावाचा शाश्वत विकास होईल.

**पर्यटकांना होणारे फायदे**

कृषी पर्यटनामुळे शहरातील लोकांना (पर्यटकांना) दैनंदिन धावपळीच्या दिनक्रमामधून रजा घेऊन प्रदूषणमुक्त आणि गावच्या वातावरणाच्या सान्निध्यात राहायला मिळेल. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या वर्षातून एकदातरी शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून कृषी पर्यटन केंद्राला भेट दिली तर विद्यार्थ्यांना देखील ग्रामीण जीवन कसे असते, तेथील रूढी, परंपरा, सांस्कृतिक वारसा, स्थानिक सण उत्सव, गावच्या जत्रा, खाद्यसंस्कृती, ग्रामीण खेळ इत्यादीची माहिती मिळेल. मुलांना निसर्गाचा अभ्यास करण्याची संधी मिळते. पर्यटकांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमांमुळे (उदा. दशावतार , शिमगा ,जाखडी नृत्य, कापडखेळे, गोफ इ.) लोककला पर्यटकांना अगदी जवळून अनुभवता येतील.

पर्यटकांना आरोग्यदायी व पर्यावरणपूरक वातावरणात राहायला मिळेल. कृषी पर्यटन केंद्रामध्ये गावरान पद्धतीने चुलीवरचे जेवण दिले जाते. या जेवणासाठी लागणारा भाजीपाला हा गावकऱ्याच्याच शेतात सेंद्रिय पद्धतीने पिकवलेला असतो. यात कोणत्याही रासायनिक खतांचा वापर केला जात नाही. कोकणी स्पेशल नाश्ता म्हणजे घावणे चटणी, नारळाच्या रसातील शिरवळ्या (शेवया), घावणे आणि काळ्या वाटाण्याची उसळ, पिठलं भाकरी आणि जेवणात पंचपक्वान्न सोबत शेवयाची खीर ,लाप्शी, मोदक, न्हेवऱ्या, पातोळ्या, पुरणपोळी, गुळपोळी इ. शाकाहारी जेवणाबरोबर उत्तम प्रकारचे मांसाहारी जेवणाचीही चव चाखता येते. यामध्ये कोंबडी वडे, वडे सागोती, सुक चिकन आणि तांदळाची भाकरी इत्यादीचा समावेश होतो. आपल्या जिल्ह्याला सरासरी १०० किलोमीटरचा विस्तृत समुद्र किनारपट्टीचा भाग लाभला आहे. यातून अनेक प्रकारचे ताजे मासे, साये कुर्ले, मुळे-तिसरे, कालवं, म्हाळय, शिनाने यांचा समावेश असतो. अश्याप्रकारे पर्यटकांना केंद्रात आरोग्यदायी आहार विहार मिळतो.

कृषी पर्यटन केंद्रावर तरुणपिढीबरोबर जेष्ठ नागरिक महिला मंडळ यांच्यादेखील सहलीचे आयोजन करता येते. यामुळे जेष्ठ नागरिक महिला मंडळालाही आपल्या बरोबरीच्या लोकांसोबत सहलीचा आनंद लुटता येतो. कृषी पर्यटन केंद्रामध्ये छोट्या मोठ्या मिटिंगचे (गेट टू गेदर), बर्थडे पार्टी, एनिवर्सरीचे आयोजन करता येईल. यामुळे कामाबरोबरच पर्यटनही होईल आणि कामाचा ताणतणाव जाणवणार नाही. याचबरोबर आता नवा ट्रेंड आला आहे कि तरुणपिढी ‘डेस्टीनेशन वेडिंग’ करायला पसंत करतात. तसेच जंगल सफारी करताना विविध पशुपक्षी, औषधी वनस्पती यांची माहिती मिळते. त्याचबरोबर जंगलातील हंगामी रानमेव्याचा स्वाद घेता येतो. रानमेव्यामध्ये करवंद, चारोळी, हसोळी, चिकना, तोरणा, आटका, रानबोर, चिंच, जांभूळ, भुर्मुळा, दुधूर्ली, रायवळ आंबा, काजू, रातंबा इ. हंगामानुसार उपलब्ध होतात. त्याचबरोबर नदीकाठच्या परिसरात, समुद्रकिनारी परदेशी पक्षांचे दर्शन घडते. यामध्ये किंगफिशरचे महत्त्वाचे योगदान आहे. तसेच शेणाने सारवलेल्या अंगणात एकत्र बसून गप्पागोष्टी करणे, जाणकार व्यक्तींकडून त्यांनी अनुभवलेल्या गोष्टी जाणून घेणे. अंगणात निवांत पडून मोकळ्या आकाशाकडे बघून आकाशदर्शन करता येते. असे शहराच्या ठिकाणी अनुभवता येत नाही.

कृषी पर्यटन केंद्रांमध्ये येऊन असंख्य गोष्टी शिकता येऊ शकतात. भारत हा कृषिप्रधान देश आहे असे म्हणत असू तर या देशाच्या प्रत्येक नागरिकांना कृषी क्षेत्राबद्दल प्राथमिक माहिती असलीच पाहिजे. सध्या शहरातल्या मुलांचे जग हे मोबाईल फोन, व्हिडीओ गेम, टीव्ही कार्टुन्स, कॉम्पुटर, फास्टफूड, शीतपेय, कोचिंग क्लासेस एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. या नव्या पिढीला निसर्गाच्या सान्निध्यात नेण्यासाठी कृषी पर्यटनासारखा दुसरा चांगला मार्ग नाही.

दैनंदिन जीवनात लागणाऱ्या ज्या वस्तू आपले आजी आजोबा वापरायचे/ त्या कालबाह्य होत आहेत. त्या वस्तू जतन केल्या पाहिजेत, त्यांचा संग्रह केला पाहिजे. यामध्ये समाविष्ट असलेल्या काही वस्तू उदा. मुसळ – व्हायन – मसाला करण्यासाठी,

मोजमापाची जुनी भांडी, कणगी – भात , नाचणी साठवण्यासाठी, बिवळे – बियाणे ठेवण्यासाठी , घीरट – भात सडण्यासाठी, लाकडी रवी, करवंटी पासून बनवलेल्या डवल्या , पाटा-वरवंटा, जातं या सर्व वस्तूंचे संग्रहालय तयार केले पाहिजे. त्यामुळे एकाच ठिकाणी सर्व गोष्टी पर्यटकांना पाहायला मिळतील. ज्या भागात कृषी पर्यटनाला संधी आणि पूरक स्थिती आहे अश्याठिकाणी कृषी पर्यटनाची अनेक केंद्रे सुरु होऊ शकतात. शेतकऱ्यांना या पर्यावरणपूरक व्यवसायातून अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते.

**कोनाड्यात पडलेल्या वस्तू**





**कणगी**



**जातं**



**बिवळे**



**डवली**



**मातीच्या घराची लाकडी खिडकी**



**जातं, रगाडा आणि उखळ**



**घिरट**




**घुसळण खांब**



**मातीच्या भिंतीमधील बोवली**



**व्हायन**





**जुनी भांडी व वस्तूंचा संग्रह**

**तात्पर्य**

अश्याप्रकारे कृषी पर्यटनाच्या माध्यमातून शहरी लोकांना ग्रामीण जीवन, संस्कृती, शेती, आणि निसर्ग यांच्याशी जोडण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. तसेच ग्रामीण भागातील लोकांना गावातच राहून रोजगाराच्या आणि आर्थिक उत्पन्न वाढवण्याच्या संधी मिळतील, यातूनच हा व्यवसाय अधिक शाश्वत करण्यासाठी वैयक्तिक तसेच धोरणात्मक पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

# कविलगाव, कुडाळ येथील सिंधुदुर्गातील शिर्डी

**शामली तारी**

श्री. स. ह . केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: tariss.dc@gmail.com

**प्रस्तावना**

भारतात शिर्डी येथील साईबाबांची अनेक मंदिरे आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा विविध प्राचीन मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यासाठी प्रसिद्ध आहे. शिर्डी तीर्थक्षेत्र म्हणजे साईभक्तांसाठी ब्रम्हनगरी आणि सिंधुदुर्गातील शिर्डी म्हणजे कविलगांवची साई नगरी! कुडाळ रेल्वे स्थानकापासून अर्ध्या कि.मी. व बस स्थानकापासून ४ कि.मी. वर साईबाबांचे हे मंदिर असून भारतातील पहिले साई मंदिर म्हणून ख्याती मिळवून आहे. कविलकाटे येथील रहिवासी स्व. रामचंद्र मडये हे दत्त भक्त होते. श्री. रामचंद्र रावजी मडये यांनी हे मंदिर बांधले आहे. साईंच्या प्रमुख मूर्तीतून खऱ्या भक्ताला नेहमी सोज्वळ किरणे बाहेर पडताना दिसतात. गवताच्या झोपडीत स्थापन केलेली साईबाबांची मूर्ती आज कौलारू मंदिरामध्ये दिसून येते.



सिंधुदुर्ग जिल्हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वात कमी लोकसंख्या असलेला सागरतटीय जिल्हा आहे. याचे प्रशासकीय केंद्र सिंधुदुर्ग नगरी, ओरोस ब्रुद्रुक येथे आहे. कोकणचे गांधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आप्पासाहेब पटवर्धन यांचा आश्रम सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवलीजवळ गोपुरी येथे आहे. सिंधुदुर्गात मालवणी बोली बोलली जाते. पर्यटन, मासेमारी, आंबा, काजू, फणस उत्पादन हे येथील प्रमुख व्यवसाय आहेत. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त म्हणजेच ३८ किल्ले असणारा तसेच सर्व प्रकारचे म्हणजे जलदुर्ग, गिरिदुर्ग व भुईकोट किल्ले असणारा एकमेव जिल्हा आहे. सिंधुदुर्ग मध्ये अनेक प्राचीन मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे आहेत. आचरा येथील रामेश्वर मंदिर, कुणकेश्वर येथील कुणकेश्वर मंदिर आणि रेडी येथील गणपती, महालक्ष्मी मंदिर ही जिल्ह्यातील काही प्रसिद्ध धार्मिक स्थळे आहेत.

**कुडाळ विषयी**

महाराष्ट्रातील कोकण या प्रांतात असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात, कुडाळ हे मध्यवर्ती ठिकाण आहे तसेच कुडाळ शहर हे कुडाळ तालुक्याचे मुख्यालय असून हा तालुका लोकसंख्येच्या बाबतीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. कुडाळ हे नैऋत्य महाराष्ट्रामधील कर्ली नदीवर वसलेले आहे. हे शहर कोकणाच्या तळकोकण भागात मालवणच्या सुमारे ३० किलोमीटर पूर्वेस वेंगुर्ला या ठिकाणापासून सुमारे ३० किलोमीटर उत्तरेस व मुंबईच्या ४७५ किलोमीटर दक्षिणेस वसलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील सावंतवाडी, कणकवली, मालवण या मोठ्या तालुक्यांनंतर कुडाळचा सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 'चौथा' क्रमांक लागतो. कुडाळ रेल्वे

स्थानक हे एक महत्त्वाचे रेल्वे स्थानक आहे. मुंबई मेट्रोसह उत्तरेकडील मुंबई, मध्य भारत रेल्वे, आणि दक्षिणेकडील मंगळूर यांना जोडण्याचे काम हे रेल्वे स्थानक करते.

भारतात शिर्डी साईबाबांची अनेक मंदिरे आहेत. युनायटेड स्टेट्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो, गयाना, सुरीनाम, फिजी, मॉरिशस, दक्षिण आफ्रिका, नेदरलँड्स, केनिया, बेनिन, क्युबा, कॅनडा, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम, जर्मनी या भारताबाहेरील देशांमध्येही मंदिरे आहेत, जपान आणि न्यूझीलंड येथील मशिदीत जेथे शिर्डी साई बाबा राहत होते, तेथे मुंबईतील कलाकार रामा राव जयकर यांनी काढलेले त्यांचे चित्र आहे. धार्मिक कार्यासाठी कलाकुसर केलेली साईबाबांची असंख्य स्मारके आणि पुतळे आहेत. यापैकी एक बालाजी वसंत तालीम नावाच्या शिल्पकाराने बनवलेले संगमरवरी शिल्प शिर्डी येथील समाधी मंदिरात आहे जिथे साईबाबांचे दफन करण्यात आले होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेस अर्ध्या मैलांच्या अंतरावर गाव कविलकाटे आहे. या गावातील साई नगरात श्री साई बाबा यांचे एक सुंदर मंदिर आहे. या मंदिरातील साईबाबांचे सुंदर पुतळे पाहताना डोळ्यांना अफाट आनंद होतो आणि येथील शांत वातावरण भाविकांना शांतता प्रदान करते. या मंदिराची निर्मिती हा श्री साईंच्या वास्तव्याचा पुरेसा पुरावा आहे. कविलकाटे येथील रहिवासी स्व. रामचंद्र मडये हे दत्त भक्त होते. श्री रामचंद्र रावजी मडये यांनी हे मंदिर बांधले होते, बाबांनी त्यांना एक रुपया दिला आणि त्या एका रुपयाने १९१९ मध्ये कुडाळ येथे सर्वत्र पुण्यतिथी साजरी करण्यात आली. आणि १९२२ मध्ये त्यांनी कुडाळ येथे बाबांचे मंदिर बांधले.



**मंदिराचा इतिहास**

भगवान दत्त साईच्या रूपाने शिर्डीत वास्तव्य करत आहेत, असा दृष्टांत श्री रामचंद्र रावजी मडये यांना झाला. आणि त्यामुळेच हा दत्तांचा दास जो नेहमीच श्री गुरुदेव दत्तांच्या नावाचा जप करण्यात मग्न होता तो शिर्डीकडे वळला. श्री साईंचे प्रथम दर्शन झाल्यावर ते भारावून गेले व त्यांची शुद्ध हरपली. या भक्ताला दत्त भेटल्याचा अनोखा आनंद झाला. तेव्हा साईबाबांनी त्यांना एक

रुपया दिला. तो किंमती खजिना म्हणून त्यांनी तो तसाच जतन केला. त्यानंतर त्यांनी कुडाळमधील अनेक रहिवाशांना आपल्याबरोबर शिर्डी येथे नेले आणि त्यांना साई दर्शनाचा लाभ दिला.

१९१८ मध्ये साईबाबांनी १५ ऑक्टोबरला मंगळवारी विजयादशमीच्या दिवशी महासमाधी घेतली. १९१९ मध्ये बाबांची पहिली पुण्यतिथी शिर्डी व्यतिरिक्त पहिल्यांदा कुडाळमध्ये सार्वजनिकपणे मडये बुवा यांच्या निदर्शनाखाली साजरी करण्यात आली. यावेळी त्यांनी बाबांनी दिलेला एक रुपया वापरला. त्यानंतर, १९२२ मध्ये साईबाबांच्या चौथ्या पुण्यतिथीला, मडये बुवा यांनी प्रत्यक्ष साई मंदिर बांधले. श्री. बाबूराव सारंग त्यांनी बनविलेल्या सहा फूट साई मूर्तीची स्थापना केली.



साईबाबांच्या महासमाधीनंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे नश्वर शरीर शिर्डी येथील बुट्टी वाड्यात ठेवण्यात आले आणि त्यावर एक थडगे उभारण्यात आले. तिथे एक फोटो फ्रेम ठेवली होती. ३६ वर्षानंतर १९५४ मध्ये श्री. बालाजी वसंत तालीम यांच्या शिर्डीच्या समाधी मंदिरात साडेपाच फुटांचा पुतळा बसविण्यात आला. स्वर्गीय श्री नागेश आत्माराम सावंत हे पुतळ्याच्या स्थापनेशी सक्रियपणे संबंधित होते. दीर्घ काळ ते साई संस्थानचे व्यवस्थापक होते. त्यांनी लिहिलेल्या एका 'श्री साईलीला' या लेखात त्यांनी मडये बुवा मंदिराविषयी सांगितले आहे. १९८३ मध्ये दत्तदास मडये बुवा यांनी बांधलेल्या मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले आणि श्री शाम सारंग म्हणजेच श्री बाबुराव सारंग यांचा मुलगा यांनी तयार केलेली साडेसात फुटाची मूर्ती स्थापित केली. १९२२ ते १९४६ या कालावधीत मंदिराचे व्यवस्थापन दत्तदास मडये बुवा यांनी केले आणि १९४६ ते १९९९ दरम्यान त्यांचा मुलगा श्रीपाद मडये आणि त्यानंतर त्यांचा थोरला नातू राजन मडये यांनी केले.

कोकण रेल्वेच्या कुडाळ रेल्वे स्टेशनच्या जवळच हे मंदिर असल्याने येथे पायी जाणे शक्य आहे. शहरासाठी सगळीकडून बससेवा उपलब्ध आहेत तसेच रिक्षाने मंदिराकडे जाता येणे शक्य आहे.

आज कविलगांवचे भव्य साईमंदिर एकेकाळी एक लहानशी गवताची झोपडी होती. या मंदिरातील साईची प्रमुख मूर्ती ६ फूट उंचीची आहे. या मंदिरात अनेक साधूसंतांच्या देवदेवतांच्या दत्त महाराजांच्या मूर्त्या आहेत. शिवाय वेगळे असे दत्त मंदिरही आहे. साईंच्या प्रमुख मूर्तीतून खऱ्या भक्ताला नेहमी सोज्वळ किरणे बाहेर पडताना दिसतात. मूर्तीची चैतन्यता भक्तांस मंदिरात खिळवून ठेवणारी आहे. बाबांच्या वत्सल नेत्रांकडे पाहताना नास्तिकालाही भक्तीचे वेड लागल्यावाचून राहत नाही. असे हे साई मंदिर कविल गावासाठी शिरोभूषण आहे. म्हणूनच कविलगांव हे कोकणची शिर्डी समजली जाते. साईबाबा मंदिराच्या बाजूलाच घुमटीमध्ये रामचंद्र उर्फ दादा मडये यांची आसनस्थ मूर्ती आहे. दर गुरुवारी दुपारी १२ ते २ या वेळेत साई मंदिरात भक्तासाठी महाप्रसाद असतो. त्याप्रमाणे अभिषेक, एकादशनी, लघुरुद्र यासारखे धार्मिक विधी भक्तांच्या सूचनेनुसार केले जातात. ज्या भक्तांना अशा प्रकारचा विधी करून घ्यावयाचे असेल व श्री साई बाबांचा शुभ आशीर्वाद घ्यावयाचा असेल त्यांनी वरील प्रकारचे धार्मिक विधी करून घ्यावेत अशा प्रकारच्या सूचनांचे फलक मंदिराच्या आवारात आहेत. दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी विशेष महाप्रसादाचे आयोजन केलेले असते. या

महाप्रसादामध्ये भाकरी आणि भोपळ्याची भाजी विशेष बाब म्हणजे भोपळ्याची भाजी सालीसह केली जाते आणि या महाप्रसादाची चव मधुर असते असे भक्त गण सांगतात. सरसोली धाम हे साई मंदिर कविलगावच्या नजीक असलेले एक सुंदर ठिकाण आहे. सरसोली धाम या ठिकाणी भक्तांसाठी नेहमी भोजनाची व्यवस्था असते. कविलगाव नेरूर येथे असलेल्या साई मंदिराच्या आजूबाजूसदेखील काही पर्यटन ठिकाणे पाहण्याजोगी आहेत. त्यामुळे कविलगाव येथील सिंधुदुर्गाची शिर्डी म्हणून प्रसिद्धीस आलेले साईमंदिर हे धार्मिक पर्यटनासाठी लोकप्रिय होत आहे.

**संदर्भ**

1. साई बाबा मंदिर – कुडाळ कविलगाव येथे प्रत्यक्ष क्षेत्र भेट
2. श्री. राजन मडये - कुडाळ कविलगाव ९४२२९६३५८९
3. http://marathizataka.com टीम मराठी झटका – ऑक्टोबर २०, २००३
4. http://www.youtube.com/@kokanchimanassadhibholi कोकणची माणसं साधी भोळी
5. http://www.youtube.com/@ajurane कोकण वेडे 1993

*(ISBN: 978-93-95847-78-0)*

# कोकणातील दुर्लक्षित पारंपरिक कला – सावंतवाडी येथील लाकडी खेळणी उद्योग

**प्रियांका देविदास कर्पे* आणि सायली दीपक अमृतसागर**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
*Corresponding author E-mail: karpepd.dc@gmail.com

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी या गावातील लाकडी खेळण्यांचा व्यवसाय समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि कुशल कारागिरीचे प्रतीक आहे. तथापि, ऐतिहासिक महत्त्व आणि कलात्मक मूल्य असूनही, या पारंपारिक उद्योगाला अनेक आव्हानांचा सामना करावा आहे.



**सावंतवाडीमध्ये बनविण्यात येणाऱ्या विविध लाकडी वस्तू [1]**

लाकडी कलाकुसर ही कोकणातील सावंतवाडीची खासियत आहे. सावंतवाडी लाकडी खेळण्यांसाठी विशेष प्रसिद्ध आहे, परंतु त्यासोबत अनेक लाकडी उपयुक्तता असलेली उत्पादने ही तयार केली जातात. महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध असणाऱ्या विविध २७ फळांची लाकडी खेळण्याच्या माध्यमातून जोपासना करणाऱ्या सावंतवाडी शहराचे नाव जगप्रसिद्ध आहे. ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या सावंतवाडी संस्थानाच्या काळात लाकडी खेळण्यांना राजाश्रय मिळाला. त्यासाठी खास कारागीर असणाऱ्या चितारी लोकांना राजस्थान येथून आपल्या राज्यात आणून लाकडी खेळण्याचे संवर्धन केले. सावंतवाडी संस्थानचे राजे श्रीमंत शिवरामराजे भोसले व त्यांच्या पत्नी सौ. सत्त्वशीलादेवी भोसले यांनी या हस्तकलेला प्रोत्साहन दिले व ही हस्तकला जगभर पोहचली.



**पांगिरा अथवा पांगरा वृक्ष [5]**

सावंतवाडीतील लाकडी खेळणी व विविध शोभेच्या वस्तू पांगिरा अथवा पांगरा (Indian Coral Tree) या वृक्षाच्या लाकडापासून बनवली जातात. या वस्तू बनविताना या लाकडाच्या प्रत्येक भागाचा पुरेपूर वापर केला जातो आणि एकही तुकडा टाकून दिला जात नाही. पांगिरा जातीचे झाड दुर्मीळ होत चालले असल्याने कागदी लगदा व लाकडाच्या भुशापासूनही खेळणी बनविली जात आहेत. लाकडी वस्तू बनविण्यासाठी विशिष्ट हत्यारांचा वापर केला जातो. शासनाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सामाजिक वनीकरणामार्फत ऑस्ट्रेलियन बाभूळ, गुलमोहरसारख्या विविध झाडांचे वृक्षारोपण केले, पण प्रत्यक्षात लाकडी खेळण्याकरिता उपयुक्त ठरणाऱ्या पांगिरा झाडाचे वृक्षारोपण व संवर्धन याकडे लक्ष दिले नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल.

लहान मुलांसाठी लाकडी किचन सेट किंवा लाकडी भातुकलीचे विविध पर्याय आहेत - विशेषत: मुला-मुलींमध्ये खूप लोकप्रिय कार, जीप, रोलर, ट्रेन- इंजिन आणि बस यासारखी लाकडी वाहने, लाकडी तोफ आणि रणगाडे देखील आहेत जे मुलांमध्ये देशप्रेम निर्माण करतात आणि त्यांना इतिहासाशी जोडतात. मुलांसाठी त्यांच्या वाढदिवसाला किंवा कोणत्याही प्रसंगी लाकडी खेळणी ही सर्वोत्तम भेटवस्तू आहे. सारिपाट आणि बुद्धिबळ हे प्रौढांसाठी भेटवस्तू म्हणून उत्तम आहेत. स्वयंपाकघरातील लाकडी सामान तुमच्या स्वयंपाकघरला एक सुंदर, समृद्ध आणि पारंपारिक स्वरूप देईल. मसाले ठेवण्यासाठी लाकडी मसाल्याचा बॉक्स, साखर आणि चहाची लाकडी भांडी तुमचे स्वयंपाकघर सजवतील. लाकडी सौंफ पॉट आणि कटोरे तुमचा डायनिंग एरिया सुशोभित करतील. लाकडी शोभेचा वस्तू आपल्या प्रियजनांना आणि नातेवाईकांना भेटवस्तू म्हणून देणे हा एक पर्यावरणपूरक पर्याय आहे. तुम्ही त्यांच्या लग्नाला किंवा वाढदिवसाला लाकडी किचन सेट भेट करू शकता. कॉर्पोरेट भेटवस्तू, कर्मचाऱ्यांना भेटवस्तू आणि दिवाळी भेटवस्तूंसाठी म्हणून लाकडी खेळणी आणि वस्तू एक साजेसा पर्याय आहे. राज्यातील आंबा, काजू, पेरू, केळीफणा, जांभ, सीताफळ, डाळिंब, दोडके, शेवग्याची शेंग, मिरची, वांगे, पडवळ, संत्र, भेंडी, पपनस, कारले, मावळंग, कलिंगड, चिबूड, पपई, मुळा, ऊस, सफरचंद, लाल भोपळा, सफेद भोपळा, काकडी, रामफळ या २७ लाकडी फळांच्या संचाला पूर्वी खूप मागणी होती. सुरुवातीला केवळ १०० रुपयांत मिळणारा हा लाकडी खेळण्याचा संच आता ८५० ते १००० रुपयांना मिळत आहे.

सारिपाट म्हणजेच चौसर हा एक प्राचीन भारतीय खेळ आहे आणि विविध आकारात उपलब्ध असलेला लाकडी बुद्धिबळ याशिवाय श्रीफळ, पाट, लाटणे, लहान मुलांना खेळणी, भातुकली अशा अनेक हस्तकलेचा नमुना ठरणाऱ्या लाकडी वस्तू सावंतवाडीच्या बाजारपेठेत मिळतात. स्वयंपाकघरातील लाकडी सामान जसे की लाकडी चमचे, साखर आणि चहाची भांडी ट्रे, सुंदर नक्षीकाम असलेली लाकडी भांडी आणि मसाल्याचा डबा ई. उपलब्ध आहेत. गणपतीच्या सणाच्या काळात माटीसाठी (गणपती मूर्तिच्या वर असलेली चौकोनी कमान ज्याला ठराविक झाडांची पाने, फळे, सुपारी, आंब्याच्या झाडाचे डहाळी, हरणाच्या झाडाची पिवळी फुले ई.बांधली जातात) लाकडी फळे व इतर वस्तु तर लग्नसमारंभात पाट व अन्य रुखवताच्या वस्तूंना मागणी असते. गोवा राज्यासह कर्नाटकातही सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांना मागणी आहे.

कर्नाटक, केरळ व अन्य राज्यांत हस्तकला महामंडळे आहेत, पण महाराष्ट्र सरकारने हस्तकलेला प्राधान्य दिले नाही याची खंत सावंतवाडीच्या लाकडी खेळणी बनविणारे कारागीर व्यक्त करत असतात. या हस्तकलेला उद्योगामध्ये प्राधान्य देऊन प्रशिक्षण दिले गेले असता हा उद्योग आणखी भरभराटीस येऊ शकतो. शिवाय या ठिकाणी तयार झालेली खेळणी देश-विदेशात पोहोचविण्याची काही यंत्रणा निर्माण करण्याची ही गरज आहे.

चीनची खेळण्याच्या व्यवसायात घुसखोरी आणि त्यामुळे लाकडी खेळण्यांच्या तुलनेत स्वस्त असणारी प्लास्टिकची खेळणी ही चिंतेची बाब आहे. चीनच्या खेळण्यांमुळे सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांवर, यातील कलाकारांवर आणि त्यांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम झालेला आहे. पूर्वी हाताने खेळणी रंगविली जात, आता व्हर्निश केले जाते. पूर्वी पारंपरिक रंग वापरले जात होते, पण आज ती जागा रासायनिक रंगांनी घेतली आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये लाकडी खेळणी खरेदीसाठी पर्यटक सावंतवाडीत मोठ्या प्रमाणात गर्दी करत असत. हस्तकलेचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी सरकारने विशेष प्रशिक्षण देण्याचे धोरण राबवले पाहिजे. सावंतवाडीमध्ये लाकडी खेळणी बनविणारे कारखाने आहेत. परंतु कारागीर मिळत नसल्याने व्यवसाय चालवण्यात मोठी अडचण येत आहे. जर परिस्थिती अशीच राहिली तर पुढील दहा वर्षांत लाकडी खेळणी बनविण्याच्या उद्योग नामशेष भीती आहे.



**पारंपरिक लाकडी खेळणी बनविणारे कारागीर [4]**

विदेशी उत्पादनांच्या ओघात सावंतवाडीतील लाकडी खेळणी निर्मात्यांसमोर तग धरून राहणे अशक्यप्राय झाले आहे. पूर्वी हा कुटीर उद्योग भरभराटीस असताना अनेकांना त्यातून उदरनिर्वाह मिळत होता. आता केवळ सहा ते सात कुटुंबे या कलाप्रकारावर उपजीविका करीत आहेत. सावंतवाडी परिसरातील अनेक लोकांचा लाकडी खेळणी बनवणे हा पिढ्यानपिढ्यापासूनचा व्यवसाय आहे, परंतु कमी किमतीच्या चायनीज उत्पादनांच्या आगमनामुळे त्यांना आता त्यांची कला टिकवून ठेवण्यासाठी तसेच उदरनिर्वाहाच्या अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर 2020 मध्ये 'मन की बात' या रेडिओ भाषणात सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांचा संदर्भ दिल्याने सावंतवाडीमधील या व्यापाराकडे लक्ष वेधण्यास मदत झाली. परंतु काही कारागिरांचे म्हणणे आहे की यामुळे त्यांची आव्हाने संपली नाहीत कारण ते एक दशकापूर्वी मागणीच्या दिवसामध्ये रोज 25 ते 50 खेळणी/ वस्तूची विक्री करीत असत तर आता फक्त 10 खेळणी/ वस्तू विक्री होते. लाकडी खेळणी बनवणारे व्यवसायिक आता कमी किमतीची 'मेड इन चायना' उत्पादने, मजूर आणि कच्च्या मालाच्या खर्चात झालेली वाढ आणि त्यांना हव्या अशा पारंपरिक अनुभवी हातांची अनुपलब्धता यांच्या विरोधात अथक लढा देत आहे.

इतर प्रदेशातून किंवा देशांतून स्वस्त आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या खेळण्यांमुळे सावंतवाडीतील कारागिरांची स्पर्धा तीव्र झाली आहे. ही उत्पादने सहसा स्वस्त सामग्री आणि श्रम वापरून तयार केली जातात, ज्यामुळे ते ग्राहकांसाठी अधिक परवडणारे बनतात. परिणामी, स्थानिक लाकडी खेळण्यांचे व्यवसाय या मोठ्या प्रमाणात उत्पादित पर्यायांच्या किंमती आणि विपणन धोरणांशी स्पर्धा करण्यासाठी संघर्ष करतात आणि त्यांचा बाजारातील हिस्सा आणि नफा यावर परिणाम होतो. शिवाय, कच्च्या मालाची टंचाई आणि वाढत्या खर्चामुळे सावंतवाडीतील लाकडी खेळणी व्यवसायाच्या टिकावूपणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. कारागीर पारंपारिकपणे त्यांची उत्पादने तयार करण्यासाठी सागवान, रोझवूड आणि पांगिरा यांसारख्या स्थानिक लाकडावर अवलंबून असतात. तथापि, जंगलतोड, पर्यावरणीय नियम यामुळे प्रीमियम लाकडांच्या उपलब्धतेत घट झाली आहे, त्यांच्या किंमती वाढल्या आहेत आणि उत्पादन खर्चावर परिणाम झाला आहे.

सावंतवाडीतील लाकडी खेळणी व्यवसायाला भेडसावणारी आणखी एक गंभीर समस्या म्हणजे पुरेशा मार्केटिंग आणि वितरण वाहिन्यांचा अभाव. उत्पादनांचे सांस्कृतिक आणि कलात्मक मूल्य प्रचंड असले तरी, मर्यादित प्रदर्शन आणि बाजारपेठेतील प्रवेश यामुळे या निर्मितीला व्यापक मार्केटपासून दूर राहावे लागते. प्रभावी विपणन धोरणे आणि वितरण नेटवर्कच्या अनुपस्थितीमुळे सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांची देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील प्रवेश मर्यादित आहे. शिवाय, कुशल कारागिरांची

घटती लोकसंख्या आणि पारंपारिक कलाकुसरीचा पाठपुरावा करण्यासाठी तरुण पिढ्यांमधील कमी होत चाललेली रुची यामुळे या जुन्या उद्योगाच्या सातत्याला धोका निर्माण झाला आहे. लाकूड कोरीव काम आणि खेळणी बनवण्याच्या किचकट कलेसाठी अनेक वर्षांचे प्रशिक्षण आणि कौशल्य आवश्यक आहे. पण तरुण पिढी पर्यायी करिअर मार्ग निवडत असल्याने हे नष्ट होण्याचा धोका आहे. कुशल कारागिरांची कमतरता आणि वारसा नियोजनाचा अभाव यामुळे सावंतवाडीतील लाकडी खेळण्यांचा दर्जा आणि सत्यता कमी होण्याची शक्यता आहे [6].

धोरणात्मक निर्णय, आर्थिक प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे सरकारचे समर्थन देखील सावंतवाडीतील लाकडी खेळणी व्यवसायाचे भविष्य सुरक्षित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. पारंपारिक कलाकुसरीचे जतन करणे, सांस्कृतिक वारशाचा प्रचार करणे आणि बाजारपेठेत प्रवेश प्रदान करणे या उद्देशाने या उद्योगामध्ये शाश्वत वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे शक्य आहे. सावंतवाडीच्या लाकडी खेळण्यांच्या व्यवसायाला त्याच्या अस्तित्वाला आव्हान देणारे बहुआयामी धोके आहेत तसेच, पुनरुज्जीवन आणि वाढीच्या संधीदेखील आहेत. ग्राहकांच्या पसंती, बाजारपेठेतील प्रवेश, तंत्रज्ञानाचा अवलंब, कच्चा माल सोर्सिंग, कौशल्य विकास आणि धोरण संबंधित समस्यांचे निराकरण करून, या मौल्यवान सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आणि भावी पिढ्यांसाठी या पारंपारिक कलाकृतीचे सातत्य सुनिश्चित करणे शक्य आहे. कारागीर, सरकारी संस्था, ग्राहक यांच्या सहयोगा द्वारे, या आव्हानांवर मात करून सावंतवाडीच्या लाकडी खेळणी व्यवसायास पुन्हा समृद्ध भविष्य देऊ करणे शक्य आहे.

**संदर्भ**

1. https://www.tripoto.com/trip/sawantwadi-wooden-toy-market-chitar-ali-india-5dd4e2f9952ad
2. https://twitter.com/mannkibaat/status/1305057420264091653
3. https://www.thehindu.com/children/reflections-on-art/article66719422.ece
4. https://www.kokansearch.com/tourist_place/Others/Sindhudurg/wooden-crafts-sawantwadi-98
5. https://www.projectnoah.org/spottings/2046996002/fullscreen
6. Maharashtra: Survival challenge for Sawantwadi wooden toy makers due to influx of foreign products, Deccan Herald, 1 May 2023.
7. https://www.deccanherald.com/india/maharashtra-survival-challenge-for-sawantwadi-wooden-toy-makers-due-to-influx-of-foreign-products-1214657.html

# बुलंद सिंधुदुर्ग ऐतिहासिक आणि पर्यटन स्थळ – एक चिकित्सक अभ्यास

**एम. आर. खोत**
स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण
Corresponding author E-mail: drmrkhot@gmail.com

प्रत्येक मराठी मनाचे आराध्य दैवत म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज होय मराठयांच्या इतिहासातील सुवर्णपान किंवा किल्यांचा कंठमणी म्हणजेच सिंधुदुर्ग असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कोकण भटकंती करायची तर सिंधुदुर्ग किल्ला पाहणे महत्वाचे आहे. जर कोकणात जाऊन सिंधुदुर्ग बघीतला नाहीं.तर देवळात जाऊन देवाचे दर्शन न घेतल्यासारखच आहे. सिंधुदुर्ग किल्ला बघीतल्या नंतर छ. शिवाजी महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते. किल्ल्याची भटकंती करायची तर प्रथम बोटीतून. किल्ल्यापर्यंतचा प्रवास हा आनंददायक ठरणारा आहे. प्रवाशांसाठी किल्ल्यावरून अरबी समुद्री समुद्राचे दर्शन खूपच अविस्मरणीय आहे. किल्ल्याचे प्रवेशद्वार अनेक गोष्टी दूरदृष्टीची, तटबंदी, बुरुज, दगडी जिने बघत असताना, शिवरायांच्या बुध्दीचातुर्य शौर्याची प्रशंसा केल्याशिवाय रहावत नाही.

**शिवाजी महाराजांची सागरी राजधानी सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण जवळच्या अरबी समुद्रात कुरटे नावाच्या बेटावर शिवरायांनी आपल्या आरमाराची राजधानी उभारली आहे. आरमारी सामर्थ्याचे महत्व ओळखणाऱ्या या द्रष्ट्या राजाला भारतीय इतिहासात FATHER OF INDIAN NAVY असे संबोधले जाते. महाभारत काळात अपरान्त प्रदेश या नावाने जो भूभाग ओळखला जायचा तीच आजची कोकणभूमी, अगदी अलीकडच्या काही वाड्मयीन संदर्भापर्यंत अपरान्त भूमी असा उल्लेख आढळतो. कोकण हे नाव घ्यायंच म्हटलं तर तसा प्राचीन वाड़मयातला स्वतंत्र उल्लेख श्यामिलक नावाच्या कवीच्या या भागात आढळतो. हा काळ साधारणतः इ.स. चौथ्या शतकाच्या आसपासचा इतका जुना आहे. आपण घाटाखालच्या किनारपट्टीशी संलग्न आणि सह्याद्रीच्या पश्चिमेकडील भूभागालाच कोकण म्हणतो. पण प्राचीन काळी तसं नव्हतं. वरघाटीच्या संलग्न प्रदेशालाही कोकणच म्हटले जायचे, घाटावरच्या दुर्गम खेड्यात आजही बऱ्याच ठिकाणी कोकणी बोलली जाते इतकेच काय तर त्यांच्या चालीरिती, सण-उत्सव कोकणाशी साधर्म्य दाखवतात. त्यामुळे घाटावरच्या नजीकच्या भागाला आजही कोकण म्हणून संबोधले जाते.

परशुरामाने समुद्राला हटवून ही समुद्रपट्टी निर्माण केली अशी दंतकथा कोकणापासून-कन्याकुमारी पर्यंत प्रचलीत आहे. पुराणातही आहे. म्हणून या प्रदेशाला परशुरामभूमी असेही म्हटले जाते. तल, रसातल, महीतल, पाताल इ. सप्तपाताले, म्हणजे ही पश्चिम किनाऱ्याची पट्टी म्हणून या भूमीस सप्तपाताल ही म्हटले जायचे. दरम्यानच्या कालात येथे रहाणाऱ्या नागवंशीय लोकांपैकी एका नागकुलाने ज्याचे नाव कुंकुण होते त्यांनी अग्रेसरत्व मिळवल्यामुळे या परिसरास सप्तपाताला ऐवजी सप्तकुंकुण म्हणू लागले. कालांतराने फक्त कुंकुण आणि पुढे कोकण असे नाव या भूमीस प्राप्त झाले.

मालवण हे एक प्राचीन बंदर-गाव आहे. त्याचं मूळ नाव महालवण, महा म्हणजे मोठे किंवा चांगले, लवण म्हणजे मीठ, नावावरूनच लक्षात येते की हे बंदर मीठ व्यापाराचे आणि परिसर चांगल्या प्रतीच्या मीठ उत्पादनाचे केंद्र असले पाहीजे. हळूहळू बोली भाषेत महालवणातील महा आकार लुप्त होत गेला आणि मालवण नांव रुढ झाले.

मालवणावर शक, नाग, सातवाहन, त्रैकूटक, चालूक्य, देवनागरीचे यादव, बहामनी, अदिलशाही आणि अर्थातच छत्रपती शिवराय अशा राजसत्तांनी राज्य केले, पण सद्याच्या काळात शिवरायांचा सिंधुदुर्ग आणि स्वराज्याचे मालवण हीच या परिसराची ओळख आहे. मालवण बंदर हे तीन बेटांनी बनलेले आहे. त्यातील समुद्रात थोडे आत वर असलेले मुख्य बेट म्हणजे कुरटे बेट होय. यावरच सिंधुदुर्ग हा जलदुर्ग उभा आहे. उर्वरित दोन बेटांपैकी सिंधुदुर्गाच्या अगदी पुढ्यात असणाऱ्या बेटावर तसा उध्वस्त असणारा पद्मदुर्ग किंवा रामदुर्ग उभा आहे. त्यात गलबतांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक अशा सोई होत्या. तिसरे बेट मालवण बंदराच्या उत्तर

अंगाला राजकोट हे आहे, जेथे नोव्हेंबर २०२३ मध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट देऊन शिवाजी महाराजाच्या पुतळयाचे अनावरण केले.

मालवण बंदराचे प्राचीन कालापासून एक वैशिष्ट्य आहे. उपरोक्त बेटे आणि भवताल, प्रवाळयुक्त खडक आणि रांगोळीचे दगड अशा प्रकारच्या दगडांनी वेढलेला आहे. खंडांतर्गत उतार तीव्र नाही म्हणूनच खोल समुद्रातून येणारी लांब पल्ल्याची जहाजे हे खडक आणि उथळपणामुळे थेट बेटांपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यामुळे एक प्रकारचे नैसर्गिक संरक्षण या बंदराला प्राप्त झाले आहे. आणि म्हणूनच या नैसर्गिक संरक्षण क्षमतेला विचार करुनच महारांजानी सिंधुदुर्ग किल्ला कुरटे बेटावर बांधला.

सन इ.स. १६६४ जानेवारी महिना, मोगलांची समृध्द सुरत नगरी शिवरायांनी लुटली. जुलै १६६४ अहमदनगरवर स्वारी. त्याच सुमारास पोर्तुगिजांना शह, मुधोळच्या घोरपड्यांचा पाडाव. ऑक्टोबर १६६४ कुडाळ प्रातांवर हल्ला करणाऱ्या खवासखानाला हुसकावून लावले. सावंतांची वाडी सर केली. वेंगुर्ल्याच्या वलंदेज (पोर्तुगिज) वखारीची लूट आणि अखेर नोव्हेंबर १६६४ मध्ये मालवणी आगमन हा सारा एल्गार सिंधुदुर्ग उभारणीसाठीच.

**भूमिपुजन**

दिनांक २५ नोव्हेंबर १६६४ मार्गशिष बहुल द्वितीया, शके १५८६ मालवणच्या दक्षिणेस दांडी भागातील किनाऱ्यावर एका पाषाणावर श्री गणेश, नंदी, शिवलिंग, सूर्य, चंद्र आणि पादुकांच्या पवित्र मुर्ती घडवून किल्ल्याचा भुमिपुजन सोहळा पार पडला. या सोहळ्याचे धार्मिक विधी याच भागातील वेदशास्त्र संपन्न जानभट अभ्यंकर आणि त्यांचे भाचे वेदमूर्ती दादंभट बिन पिलंभट उपाध्ये यांनी केले. या करीता महाराजांनी संपूर्ण परिसर परकी सत्तांपासून भयमुक्त करताना प्रथम जनतेचा विश्वास संपादन केला. आता हा पाषाण मोरयाचा धोंडा (मोऱ्याचा धोंडा) म्हणून प्रसिध्द आहे.

**किल्ले सिंधुदुर्गाचे स्थापत्य रचना**

- स्थापत्यकार : श्री. हिरोजी इंदूलकर
- दुर्ग प्रकार : जलदुर्ग (जंजिरा)
- स्थान : मालवण शहराच्या पश्चिम बाजूस
- तटबंदी : तटबंदी आकार सर्पाकार असून एकूण लांबी ४ कि.मी.

तटांची ऊंची किमान ३० फूट असून रुंदी ३ मी. अथवा अधिक आहे. किल्ल्याचे एकूण क्षेत्र अंदाजे ४८ एकर आहे. तटबंदीला एकूण ४५ जीने असून त्यामध्ये ४० शौचकूप अतिशय बेमालून पध्दतीने बसविले आहेत. किल्ल्याला २७ भक्कम बुरुज असून प्रत्येक बुरुजावर अर्धगोलाकार आकाराची तोफांच्या मारगिरीसाठी व्यवस्था आहे. संपूर्ण तटबंदीत टेहळणीसाठी खास झरोखे. तसेच झेंडे आणि दिवट्या लावण्यासाठी तटबंदीतल्या दगडांना विशिष्ट प्रकारची भोके पाडली आहेत. तटबंदीचा सर्पाकार आणि बुरुजांच्या गोलाकार आकारामुळे समुद्राचे जोरदार वारे आणि लाटांच्या माराचा जोर कमी होऊन तटबंदीला हानी पोहचत नाही.

- दगड : संपूर्ण किल्ला कुरटे नावाच्या खडकाळ बेटावर उभारला गेला आणि किल्ल्यासाठी स्थानिक दगड वापरण्यात आला.
- बांधणी : चुनखडी, वाळू, गूळ यांचे मिश्रण दगडांच्यामध्ये जोडणीसाठी वापरले

स्थापत्यकार हिरोजी इंदूलकर यांच्या अधिपत्याखाली ५०० पाथरवट, २०० लोहार आणि ३००० मजूर आणि सशस्त्र फौजफाटा घेऊन प्रत्यक्ष बांधकामास सुरवात करण्यात आली. बांधकामावर देखरेख गोविंद विश्वनाथ प्रभू यांची होती.

**सिंधुदुर्गाचा वास्तुशांती समारंभ**

२९ मार्च १६६७ चैत्र शुध्द पौर्णिमा शके १५८९ प्रत्यक्ष महाराजांच्या उपस्थितीत किल्ल्याचा वास्तुशांती सोहळा थाटामाटात पार पडला. यावेळी किल्ला उभारणीत मदत आणि सहकार्य करणाऱ्यांना तसेच मजूरांना यथोचित सन्मान आणि दान द्रव्य देण्यात आले. विद्वानांना रु. ५ हजार दक्षिणा, पाथरवटांचे नाईकास वस्त्रे आणि सोन्याची कडी, गोविंद विश्वनाथ प्रभू (कुंभार जुवेकर) यांस मोत्याचा तुरा आणि मुख्य स्थापत्यकार हिरोजी इंदुलकरांना राजधानी रायगडाची कामगिरी सोपविण्यात आली.

साधारणपणे १६८९ ने दरम्यान छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील त्यांनीच उभारलेले शिवराजेश्वर मंदिर ही या परिसरातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासीक घटना, त्यानंतर करवीरकर राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. १९०६-०७ च्या दरम्यान केलेली मंदीराची डागडूजी व बांधलेला सभामंडप ही अलीकडच्या काळातील महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. शिवरायांचे महानिर्वाण, संभाजी राजांची दुर्दैवी हत्या, नंतरचा स्वराज्य संघर्ष, करवीर गादीच्या निर्मितीनंतर किल्ल्याचे पालकत्व करवीर छत्रपतींकडे येणे हे काही महत्वाचे ऐतिहासिक टप्पे. नंतरच्या काळात इंग्रजांचा ताबा, त्यांनी ठेवलेले फोर्ट ऑगस्टस् हे नाव, पुन्हा १७६६ साली करवीरकरांचा ताबा, सन १८१२ मध्ये पुन्हा इंग्रजांचा ताबा, सन १८१८ पासून १९४७ पर्यंतचा इंग्रजी अंमल. अशी सिंधुदुर्गाची काल स्थित्यंतरे आहेत.

**किल्ले सिंधुदुर्ग मध्ये असणारी महत्वाची ठिकाणे/ दुर्गदर्शन**

१] महाद्वारापाशीच श्री हनुमानाचे मंदिर आहे. हे मंदिर किल्याचे दक्षिण तोंडी मंदिर आहे. हनुमान अगादी किल्याचे रक्षण करण्यासाठी उभा आहे असे वाटते.

२] महाद्वारातून आत गेल्यावर समोरच जरीमरीचे मंदिर आहे. त्यावर तुकाराम येसबा आयरेकर सके श्री त्र यांनी बांधले (सन १८८२) असा उल्लेख आहे.

३] महाद्वाराच्या उत्तरेला जीना चढल्यावर तटबंदीवर वरील घुमटीच्या आत शिवरायांच्या उजव्या हाताचा ठसा आहे. खालील घुमटीच्या आत डाव्या पायाचा ठसा. हे ठसे चुन्याच्या लादीवर राणोजी शिंदे नामक गवंड्याने जपून ठेवले.

४] महाद्वाराच्या आतून सरळ पुढे गेल्यावर श्री शिवराजेश्वर मंदिर आहे. याची निर्मिती छत्रपती राजाराम महाराजांनी केली. मूळ मंदिर १५ मी. लांब आणि ७ मी. रुंद आहे. मंदिरातील गाभाऱ्यात छत्रपती श्री शिवरायांची वैशिष्ठ्यपुर्ण पाषाण मूर्ती आहे.

५] गाभाऱ्यातील तलवार शिवकालीन आहे. म्यानावर एका बाजूला उड्डाण करणारा मारुती दुसऱ्या बाजूला गरुड. या तलवारीचे जतन व्हावे म्हणून सध्या ती काचपेटीत ठेवण्यात आली आहे. त्याची प्रतीकृती समोर ठेवण्यात आली आहे.

६] गाभाऱ्याच्या बाहेर डाव्या हातास मारुती, गणपती, मौनी महाराजांची बैठी मूर्ती. उजवीकडे रामदासांच्या पादुका आहेत.

७] श्री महादेव मंदिर (या मंदिरात एक विहिर आहे).

८] श्री भवानीदेवी मंदिर

९] श्री महापुरुष मंदिर

१०] दूधबाव, दहिबाव आणि साखरबाव. या तिन्ही विहिरींना असलेलं गोड पाणी हा चमत्कार आहे.

११] विहिरींच्या डाव्या बाजूला राजप्रसादाचे अवशेष पहावयास मिळतात.

१२] उजवीकडे गडाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांचे अवशेष.

१३] विहिरींच्या मागे निशाणकाठी बुरुज.

१४] राणीच्या वेळा (दक्षिण तटबंदी बाहेर).

१५] चुनखडीचा घाणा

**सिंधुदुर्ग किल्ल्याबाबत असणाऱ्या समस्या अथवा अडचणी**

१] **तटबंदी**: किल्ल्याची सभोवतालची तटबंदी भारतीय पुरातत्व खात्याकडे आहे. एकंदरीत हा किल्ला संपूर्णपणे भारतीय पुरातत्व खात्याकडे नाही. हा एक किल्ल्याबाबतचा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे केंद्र सरकारला या ठिकाणी विकास साधता येत नाही. तटबंदीची ठिकठिकाणी पडझड झालेली आहे.

**२] किल्ल्या अंतर्गत जमीन:** सिंधुदुर्ग किल्ल्या अंतर्गत जमीन वायरी ग्रामपंचायत मधील आहे. अनेक खाजगी लोकांचे सातबारे त्या ठिकाणी आहेत. अर्थात किल्ल्या अंतर्गत जी जमीन आहे ती खाजगी लोकांची आहे आणि तटबंदी मात्र केंद्र केंद्रीय पुरातन खात्याकडे आहे. हे खाजगी लोक सरकारला कोणत्याही प्रकारचा विकास करण्यास परवानगी देत नाहीत. संपूर्णपणे किल्ला सरकारच्या ताब्यात नसल्यामुळे पुरातत्व खात्याला सुद्धा कोणत्याही प्रकारचा विकास साधता येत नाही.

**३] किल्ल्याची पडझड:** सन 1664 पासून आज पर्यंत तीनशे पेक्षा अधिक वर्षे सागरामध्ये अगदी डौलाने किल्ला उभा आहे. मात्र सागरी पाण्याच्या लाटेमुळे तटबंदीला खालच्या बाजूला दगडांची झीज होत आहे तसेच काही दगड ढासळले आहेत. मधल्या काळामध्ये काही प्रमाणात पुरातत्व खात्याकडून विकास करण्यात आला मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात किल्ल्याची पडझड झालेली आहे.

**४] वनराईचा अभाव:** किल्ल्यामध्ये गेल्यानंतर अगदी ओसाड दिकाणी गेल्यासारखे वाटते, मनाला रुक्ष वाटते असे अनेक पर्यटकांचे मत आहे. अर्थात किल्ल्यामध्ये योग्य पद्धतीने वनराई नाही, त्यामुळे पर्यटकांचे आकर्षण कमी होते.

**५] स्वच्छतेचा प्रश्न:** किल्ला 48 एकरामध्ये आहे मात्र पर्यटकांना फिरण्यासाठी किल्ल्याचा फार कमी वापर होतो बऱ्याच ठिकाणी पर्यटकांना जाता येत नाही. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची म्हणावी तशी स्वच्छता दिसत नाही. वायरी ग्रामपंचायत आणि अनेक सेवाभावी संस्था यांनी अनेक वेळा स्वच्छतेचे उपक्रम राबवले आहेत. मात्र सातत्याने येत असणारे पर्यटक त्यामुळे होणाऱ्या कचरा त्याचबरोबर प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात असणारा वापर यामुळे कचऱ्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. वाढलेले रान ही प्रतिवर्षी पूर्णपणे स्वच्छ केले जात नाही. त्यामुळे पर्यटकांना किल्ला चांगल्या रीतीने पाहता येत नाही अथवा ऐतिहासिक वारसा समजून घेता येत नाही.

**६] ऐतिहासिक बांधकाम:** पर्यटक ज्यावेळी किल्ला पाहण्यासाठी जातो त्यावेळी त्याची एक वेगळी अपेक्षा असते की शिवाजी महाराजांनी त्या ठिकाणी काही बांधून ठेवलेले असेल. मात्र प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारचे तिथे बांधकाम दिसून येत नाही. काही मंदिरे सोडली तर शिवाजी महाराजांचा महल सभामंडप हे पाडून टाकण्यात आलेले आहेत. इंग्रजांच्या काळानंतर त्यांची पुनर्रचना त्याच पद्धतीने केली पाहिजे होती मात्र तशी झाली नाही आणि त्यामुळे पर्यटकांना त्या ठिकाणी किल्ल्याचे भव्य दिव्य स्वरूप दिसून येत नाही. बरेच पर्यटक अनेक किल्ले पाहून आलेले असतात फक्त शिवाजी महाराजांचा किल्ला समुद्रात आहे ही एक मोठी गोष्ट आहे एवढेच त्यांच्या बाबतीत सांगितलं जातं मात्र आत मधली व्यवस्था किंवा पाहण्यासारखं काहीही नाही असं पर्यटकांचं मत आहे. सध्या किल्ला म्हणजे फक्त पाहण्यासारखी मजबूत तटबंदी इतकंच.

**७] प्रसाधनगृहांचा अभाव:** आज घडीला प्रतिवर्षी चार साडेचार लाख लोक किल्ल्याला भेटी देऊन जात असतात यामध्ये बऱ्याच सहलींचा सहभाग असतो. बऱ्याच लांबून लोक येत असतात. मात्र आवश्यक असणाऱ्या प्रसाधनगृहांची सोय किल्ल्यामध्ये दिसून येत नाही त्यामुळे पर्यटकांची गैरसोय होते.

**८] बंदर जेटी ते किल्ला वाहतूक व्यवस्थेबाबत समस्या:** मालवण धक्क्यावरून बंदर जेटीला ने-आण करण्यासाठी अनेक होड्यांची सोय त्या ठिकाणी आहे. मात्र त्या होड्यामध्ये बसण्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे नसते. लाइफ जॅकेटसारख्या सुरक्षा व्यवस्था काही वेळा उपलब्ध होत नसतात. पर्यटकांना बसण्यासाठी फळकाटांचा वापर केलेला आहे. बरेच लोक पाय देऊन त्याच्यावरून जात असतात आणि पुन्हा त्यावरच पर्यटकांना बसावे लागते. त्यामुळे बऱ्याच महिला पर्यटकांना त्याचा त्रास जाणवतो.

**९] मार्गदर्शक बोर्ड आणि गाईड अभाव:** मालवणमध्ये प्रवेश करत असताना तसेच धक्क्यावरून किल्ल्याकडे जात असताना पर्यटकांना योग्य ते दिशादर्शक फलक दिसत नाहीत. त्याचबरोबर किल्ल्यामध्ये आत जात असताना किल्ल्याची माहिती सांगणारे फलक तसेच शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची माहिती सांगणारे फलक दिसत नाहीत. त्याचबरोबर योग्य अशा गाईड व्यवस्था उपलब्ध नाहीत. त्यामुळे किल्ला फिरत असताना किल्ल्याबाबत व शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाबाबत माहिती पर्यटकांना मिळत नाही.

**१०] किल्ल्या अंतर्गत हॉटेल व्यवस्था:** वेगवेगळ्या सहली, लहान मुले व इतर पर्यटक हे किल्ला पाहण्यासाठी जात असतात. मात्र आत गेल्यानंतर योग्य अशी हॉटेल व्यवस्था त्या ठिकाणी दिसत नाही. अगदी साध्या पद्धतीची काही स्टॉल त्याठिकाणी दिसतात त्यांचेही दर आहेत असं पर्यटकांचे मत आहे. पर्यटकांना त्या ठिकाणी निवांत बसून जेवण करता येईल अशी हॉटेल व्यवस्था नाही

**११] पिण्याच्या पाण्याची सोय:** किल्ल्यामध्ये गेल्यानंतर पर्यटक किंवा सहलीतील विद्यार्थ्यांना पाणी विकतच घेऊन प्यावे लागते. पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी केलेली नाही.

एकंदरीत आज भारतातील अनेक किल्ल्यांची माहिती घेतली असता सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बाबतीत अनेक समस्या आणि त्याही वेगळ्या प्रकारच्या समस्या या ठिकाणी पाहायला मिळतात या समस्या कमी करून किल्ला पर्यटकांसाठी एक ऐतिहासिक स्थळ म्हणून शिवाजी महाराजांची प्रेरणा घेण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजनांची गरज आपल्याला दिसून येते.

**काही महत्त्वाच्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे त्या पुढील प्रमाणे स्पष्ट केलेल्या आहेत.**

**१] किल्ला पूर्णपणे पुरातत्व खात्याकडे सुपूर्द करणे.**

पुरातत्व खाते आज देशातील अनेक ठिकाणी ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण व रक्षण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे मात्र सिंधुदुर्ग किल्ल्याची फक्त तटबंदी पुरातन खात्याकडे आहे त्यामुळे विकासावर त्या ठिकाणी मर्यादा येतात हा संपूर्ण किल्ला केंद्र सरकारच्या पुरातन खात्याच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे यासाठी राजकीय पुढा-यांनी प्रयत्न केले पाहिजेत. जे रहिवासी आहेत त्यांना योग्य नुकसान भरपाई देऊन किल्ला पुरातत्व खात्याकडे वर्ग करणे आवश्यक आहे. तसेच हा किल्ला जास्तीत जास्त जनतेसाठी उपलब्ध करून देण्यासाठी, त्या ठिकाणी पर्यटकांना पाहण्यासाठी व शिवाजी महाराजांच्या पाऊलखुणा चिरंतन काळ जपून ठेवण्यासाठी किल्ल्याचे रक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. पुरातत्व खात्याने हा किल्ला ताब्यात घेतला पाहिजे आणि त्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन तो पुरातन खात्याकडे दिला पाहिजे.

**२] सातत्याने डागडुजी**

सिंधुदुर्ग किल्ला समुदात असल्यामुळे समुद्रातील पाण्यामुळे व पाण्याच्या माऱ्यामुळे किल्ल्याची पडझड होत आहे यासाठी सातत्याने किल्ल्याची डागडुजी होणे अत्यंत महत्त्वाचा आहे.

**३] गार्डन अथवा वनराई व्यवस्था**

किल्ल्यामध्ये गेल्यानंतर अगदी जंगली झाडे त्या ठिकाणी दिसत असतात मात्र त्याऐवजी योग्य असा प्लॅन करून सिस्टिमॅटिक पद्धतीने झाडे लावणे गरजेचे आहे जेणेकरून पर्यटकांना आल्यानंतर समाधान मिळेल. व गार्डन बघण्याचा आनंद मिळेल अशा पद्धतीने गार्डन व्यवस्था केली पाहिजे

**४] डिजिटल स्लाईड शो**

किल्ल्यामध्ये जात असताना किल्ल्याबाबतचा इतिहास, शिवाजी महाराजांचा इतिहास यासाठी डिजिटल स्लाईड शो अधून मधून पर्यटकांना दिसावे अशा पद्धतीने किल्ल्या अंतर्गत तसेच मालवण मध्ये प्रवेश करीत असताना अशा प्रकारचे स्लाईड शो ठिकठिकाणी लावणे गरजेचे आहे. जेणेकरून पर्यटकांच्या मनामध्ये आणखीन माहिती जाणून घ्यावी अशी भावना निर्माण झाली पाहिजे.

**५] किल्ला पाहण्यासाठी चा वेळ आणि तिकीट यामध्ये सुधारणा करणे**

बऱ्याच पर्यटकांच्या म्हणण्यानुसार सहलीसाठी लहान विद्यार्थ्यांना कमीत कमी फी आकारली जावी त्याचबरोबर होड्यांची रचना आधुनिक पद्धतीने व आकर्षक तयार करावी त्याचबरोबर किल्ल्यामध्ये दीड तासच पाहण्यासाठी सोडलं जातं मात्र काही पर्यटकांना आपला वेळ किल्ल्यावरच अधिक जावा असं वाटत असतं त्यामुळे किल्ल्यातील टाइमिंग पर्यटकांच्या मनानुसार त्याला देता यावी अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**६] पिण्याच्या पाण्याची सोय**

पर्यटक, सहलीतील विद्यार्थी यांना पाणी विकत घ्यावे लागते. बरेच लोक परिस्थिती नसल्यामुळे विकत घेत नाहीत. त्यासाठी ठीक ठिकाणी पाणपोई लावणे आवश्यक आहे.

**७] स्वच्छता व कचराकुंड्या**

पर्यटकांनी किल्ल्यावर येत असताना स्वच्छतेचे भान ठेवायलाच पाहिजे. त्याचबरोबर संबंधित व्यवस्थेकडून सातत्याने किल्ल्याची स्वच्छता होणे गरजेचे आहे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा पडलेला असतो स्वच्छता नसते. किल्ला चौफेर

पाहण्यासाठी पर्यटना मोकळीक होईल अशी जागा अथवा रस्ते तयार करून दिले पाहिजेत जेणेकरून सिंधुदुर्ग किल्ल्याचा आनंद पूर्णपणे पर्यटकांना घेता येईल.

**८] नियमावली**

स्वच्छतेसंदर्भात आणि किल्ल्याचे नुकसान होऊ नये किंवा किल्ल्याच्या तटबंदीवर कोणी काही लिहू नये, आपल्या खुणा सोडून जाऊ नये अशा प्रकारचे नियम तयार करून ती नियमावली ठिकठिकाणी लावली पाहिजे. जे कोणी पर्यटक उद्धटपणा करत असतील, अयोग्य वर्तन करत असतील किंवा नियमांचे पालन करत नसतील अशा पर्यटकांना दंड केला पाहिजे व तशा प्रकारची व्यवस्था त्या ठिकाणी असणे गरजेचे आहे.

**९] वस्तुसंग्रहालय वस्तू शिल्प**

किल्ल्यावरती काही प्रमाणात वस्तुसंग्रहालय आहे मात्र अजूनही महाराजांच्या ज्या काही जुन्या वस्तू आहेत त्यांचा संग्रह मोठ्या प्रमाणात वाढवून पर्यटकांना आकर्षित केले पाहिजे.

**१०] किल्ल्यामध्ये सुधारणा आणि ऐतिहासिक वस्तूंचे देखावे.**

किल्ल्याची डागडुजी तर नेहमीच केली पाहिजे. त्याचबरोबर किल्ल्या अंतर्गत शिवाजी महाराजांच्या काळात ज्या ज्या वास्तू, मंडप किंवा ऐतिहासिक बाबी होत्या त्या तशाच प्रकारे निर्माण करून घेणे गरजेचे आहे. इंग्रजांच्या काळामध्ये ज्या काही गोष्टी नष्ट केल्या त्या पुन्हा उभारल्या पाहिजेत.

**११] व्यापारी दृष्टिकोन**

देशभरामध्ये आणि जगभरामध्ये ऐतिहासिक स्थळांचा वापर त्या त्या राज्य सरकारने तसेच केंद्र सरकारने व्यापारी दृष्टिकोनातून केलेला आहे. मात्र सिंधुदुर्ग किल्ल्याचा तशा प्रकारे वापर झालेला दिसून येत नाही. हे एक ऐतिहासिक स्थळ आहेच आहे मात्र याबरोबरच येणाऱ्या पर्यटकांना आनंद मिळण्यासाठी व्यापारी दृष्टिकोनातून याचा वापर होणं गरजेचं आहे. जेणेकरून यातून सरकारला पण महसूल मिळेल आणि रहिवाशांनासुद्धा उत्पन्न मिळेल.

अश्या पद्धतीने उपाय योजना केल्यास निश्चितच सिंधुदुर्ग किल्ल्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास होईल आणि बुलंद सिंधुदुर्ग किल्ला ऐतिहासिक वारसा स्थळ म्हणून निरंतर उभा राहिल.

**संदर्भ**


१. शिवोत्तर कालः किल्ला आणि किल्ल्याविषयी समग्र माहिती देताना शिवकालीन पत्रांचा आणि इतिहासावर आधारीत पुस्तकांचा आधार घेतला आहे.

२. किल्ले सिंधुदुर्ग प्रेराणोत्सव समिती यांनी प्रसिद्ध केलेली 'सिंधुदुर्ग प्राचीन ते अर्वाचीन' ही माहिती पुस्तिका

३. पर्यटक, स्थानिक अभ्यासक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती

# सिंधुदुर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

**श्रीकांत विक्रांत सिरसाठे* आणि लक्ष्मण शामराव सुरवसे**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

*Corresponding author E-mail: sirsathesv.dc@gmail.com

**प्रस्तावना**

सिंधुदुर्ग जिल्ह्याला इतिहासाचा मोठा वारसा लाभला आहे. जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक ठिकाणे आहेत. हि ठिकाणे आजही तत्कालीन इतिहासाची साक्ष देतात. अशा ठिकाणांपैकी एक ठिकाण म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला होय. सिंधुदुर्ग किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे आरमार भक्कम करण्यासाठी उभा केला. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने हा किल्ला अत्यंत महत्वाचा मानला जातो. स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून या किल्ल्याकडे पहिले जाते. शिवाजी महाराजांचे समकालीन रामचंद्र गुप्ते यांनी चित्रगुप्ताची बखर लिहिली. या बखरीत सिंधुदुर्ग किल्ल्याचा उल्लेख खालीलप्रमाणे केला आहे

**चौऱ्याऐंशी बंदरात हा जंजिरा अठरा टोपीकरांचे उरावर शिवलंका, अजिंक्य जागा निर्माण केला.**

**सिंधुदुर्ग जंजिरा, जगी अस्मान तारा| जैसे मंदिराचे मंडल, श्री तुलसी वृंदावन, राज्याचा भूषणअलंकार |**

**चतूर्दश महारतनापैकी पंधरावे रत्न महाराजास प्राप्त झाले|**

यावरून असे लक्षात येते कि, हा किल्ला मराठा आरमारामध्ये आरमाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

एकंदरीतच छत्रपती शिवाजी महाराजांकडे ३६२ किल्ले होते. त्यापैकी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः निर्माण केलेला किल्ला म्हणून सिंधुदुर्ग किल्ल्याकडे पहिले जाते. शिवाजी महाराजांचे स्थापत्यशास्त्रज्ञ हिरोजी इंदुलकर यांनी हा किल्ला बांधला. या किल्ल्याला आज ३६० वर्षे झाली तीरीही हा किल्ला आज हि कुरटे बेटावर डौलाने उभा आहे. भारत सरकारने या किल्ल्याला दि. २१ जून २०१० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे.

**ऐतिहासिक महत्व**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक ठिकाणे आहेत. हि ठिकाणे तत्कालीन इतिहासाची साक्ष देत आज हि उभी आहेत. स्थानिक इतिहासाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झालेले दिसून येते. त्यामुळे जिल्हातील काही ऐतिहासिक ठिकाणे दुर्लक्षित आहेत. जिल्हामध्ये स्थापत्यकलेच्या दृष्टीने सिंधुदुर्ग किल्ला हा स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना असून हा किल्ला आरमाराच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाचा होता. शिवाजी महारांजाच्या आरमारात या किल्ल्याला फार महत्व होते. स्वराज्यात आरमाराचे महत्व आज्ञापत्रात सांगितले ते असे की,

**आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे.**

**जसे ज्यास अश्वबल तसी त्याची पृथ्वीप्रजा आहे,**

**तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र.**

**याकरिता आरमार अवश्यमेव करावे.**

सुरत लुटीनंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी मालवण मधील कुरटे बेटावर किल्ल्याची निर्मिती आरमाराच्या दृष्टीकोनातून केली. या किल्ल्यावरती बुरुजांची संख्या ४२ असून ४५ दगडी जिने आहेत. मराठा आरमार बुलंद व्हावे यासाठी शिवाजी महाराजांनी या किल्ल्याची निर्मिती केली. पोर्तुगीज, डच, इंग्रज यांची स्वराज्यावर होणारी आक्रमणे या किल्ल्याने परतवून लावली. त्यामुळे आरमाराच्या दृष्टीने या किल्ल्याला अनन्य साधारण महत्वाचे स्थान होते. तत्कालीन काळात शिवशाहीच्या शिरपेचातील मानाचा तुरा म्हणून सिंधुदुर्ग किल्ल्याला ओळखले जात होते. आजही हा किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

**वास्तू विवेचन**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटल्यानंतर सागरी आरमार भक्कम करण्याच्या उद्देशाने जागा शोधण्यास सुरुवात केली. त्यावेळेस त्यांना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुरटे बेट मराठा आरमाराच्या दृष्टीने महत्वाचे वाटले. त्यामुळे कुरटे बेटावर सिंधुदुर्ग किल्ला बांधण्याचे निश्चित केले. त्यानुसार २५ नोव्हेंबर १६६४ रोजी हिरोजी इंदुलकर या स्थापत्यरचनाकाराने छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ते मोरयाच्या धोंड्याचे पूजन करून किल्ला बांधण्यास सुरुवात केली. हा किल्ला बांधण्यासाठी ३ वर्षे लागली. किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले असता छत्रपती शिवाजी महाराजांचा उजव्या हाताचा व डाव्या पायाचा ठसा घेण्यात आला. यासाठी कागदोपत्री एक भक्कम पुरावा उपलब्ध असून श्रीशिवछत्रपतींची नातसून, छत्रपती संभाजी महाराज दुसरे यांची पत्नी महाराणी जिजाबाई यांनी दि.२१ नोव्हेंबर १७६३ रोजी सिंधुदुर्गाचे शिलेदार येसाजी शिंदे यांना एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात सुभेदारांना पुढील शब्दात आज्ञा केली आहे.

**तीर्थरूप कैलासवासी महाराज राजश्री छत्रपती यांचा हात जंजिरा आहे याजवरी गची व कोनाडा बांधून नैव्यध व पूजाचाले सारखे करणे. याविसी अंतर न करणे जाणिजे. २// ७.१५ माहे जमा दिलावल लेखनसीमा**

या पत्रावरून वरील ठसे शिवरायांच्या हातापायाचे आहेत, हे सप्रमाण सिध्द होते. हा किल्ला ४८ एकरात उभा आहे. आजही हा किल्ला स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट दिली असता या किल्ल्याच्या बांधकामात असे आढळून आले कि, या किल्ल्याच्या बांधकामासाठी दगड, चुना, गूळ, नारळाच्या काथ्या, काच इत्यादीचे घाण्याच्या साहाय्याने मिश्रण करून हा वज्रलेप दोन दगडामध्ये लावला. पाय उभारणी वेळी ४००० पौंड शिसे वापरण्यात आले. त्यामुळे आजही हा किल्ला सुस्थितीत आहे. सिंधुदुर्ग किल्लयाचे बांधकाम करण्यास छत्रपती शिवाजी महाराजांना १ कोटी होन खर्च करावा लागला.

**वैशिष्टे**

१) लष्करीदृष्ट्या मोक्याचे स्थान.
२) आसपासच्या १५ मैलाच्या प्रदेशावर लक्ष ठेवता येते. या किल्ल्याच्या माध्यमातून सावंतवाडीचे सावंत, गोव्याचे पोर्तुगीज, जंजिर्याचे सिद्दी आणि इंग्रज यांच्या सागरी हालचालीवर लक्ष ठेवता येत होते.
३) ३६० वर्षे हा किल्ला समुद्राच्या लाटांचे तडाखे सहन करत उभा आहे, याचे कारण म्हणजे किल्ल्याचे बांधकाम करीत असताना त्याच्या पायात शिसे घातले आहे.
४) किल्ल्याच्या तटबंदीची उंची जास्त असल्याने तोफगोळे किल्ल्याच्या आत पडू शकत नव्हते.

**किल्ल्याची रचना**

मालवण तालुक्यामध्ये हा किल्ला आहे. किल्ल्याचा आकार लांबट आहे. किल्ल्याचा दरवाजा किल्ल्याच्या समोर गेल्याशिवाय दिसत नाही. कारण तो नागमोडी वळणाचा असून खूप आत आहे. किल्ल्याचा महाद्वार तयार करण्यासाठी साग आणि उंबर या लाकडाचा वापर केला आहे. दरवाज्याच्या बाहेर मारूतीचे मंदिर आहे.

किल्ल्याला एकूण ४२ बुरुज असून त्यातील काहीच बुरुज आता शिल्लक असलेले दिसतात. बुरुज आणि तटबंदीची उंची ३५ फुट आणि रुंदी १० फुट इतकी आहे. बुरुजावर वरखाली करण्यासाठी ४५ जिने असून त्यापैकी काहीच जिने आता अस्तित्वात आहेत. बुरुजावर ठिकठिकाणी तोफा ठेवण्यासाठी आणि बंदुकीचा मारा करण्यासठी जंग्या ठेवलेल्या आहेत.

किल्ल्याच्या आत प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला वळले असता एक रस्ता लागतो. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला १२ बलुतेदारांची घरे आहेत. तेथून पुढे शिवाजी महाराज आणि ताराबाई यांचे राजवाडे आहेत. मात्र त्यांचे आज फक्त चौथरे शिल्लक आहेत. त्यानंतर पुढे ३ विहिरी पहावयास मिळतात. चारही बाजूने खारे पाणी असतानाही किल्ल्याच्या आत दुधबाव, दहिबाव, साखरबाव या तीन विहिरीमध्ये गोडे पाणी आढळते.

किल्ल्यामध्ये शिवाजी महाराजांचे शंकर रूपातील मंदिर आहे. १६९५ साली शिवाजी महाराजांचे धाकटे पुत्र राजाराम महाराजांनी हे मंदिर बांधले. या मंदिराला शिवराजेश्वर मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिरात शिवाजी महारांनी वापरलेले दोन

तलवार एक ढाल व जिरेटोप आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार व सभामंडपाचे बांधकाम कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांच्या काळात १९०६-०७ मध्ये दरबाराच्या खर्चाने बांधले. याचा खर्च ३८५० रुपये एवढा आला. शिवाजी महाराजांचे आराध्य दैवत असलेल्या भवानी मातेचे मंदिर आहे. हि देवीची मूर्ती चतुर्भुज असून ती शस्त्रसज्ज रूपामध्ये आहे.




**छत्रपती शिवाजीमहाराजानंतर किल्ल्याचा ताबा**

शिवछत्रपतीच्या व छत्रपती संभाजी राजांच्या कालावधीत या गडांकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिले नाही. पुढे शाहूंच्या पुनरागमनानंतर झालेल्या गृहकलहात महाराणी ताराबाई मार्च १७०८ मध्ये सिंधुदुर्गावर आल्या व वर्षाखेरपर्यंत गडावरच राहिल्या. पुढे शाहू व ताराबाई यांच्यातील वारणेच्या तहानुसार या गडाचा ताबा करवीर छत्रपतींकडे गेला. पुढे २८ जानेवारी १७६५ मध्ये मेजर गोडार्ड व कॅप्टन वॉटसन यांनी किल्ल्यास वेढा घालून किल्ला ताब्यात घेऊन याचे नाव 'फोर्ट ऑगस्टस' ठेवले. पुढे कोल्हापूरच्या राणी जिजाबाई व ईस्ट इंडिया कंपनी यांच्यातील एका करारानुसार २ जानेवारी १७६६ रोजी सिंधुदुर्गचा ताबा मराठ्यांकडे आला.

निपाणीकर देसाई विरुद्ध इंग्रजांनी करवीरकरांना मदत करावी त्या मोबदल्यात करवीरकरांनी सिंधुदुर्ग इंग्रजांना द्यावा असा करार इंग्रज व करवीरकर यांच्यात झाला व या तहानुसार १७९२ मध्ये हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**सद्यस्थिती**

सिंधुदुर्ग किल्ले निर्मितीला ३६० वर्षे पूर्ण झाली असून महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांची दुर्दशा पाहिली असता या किल्ल्याची अवस्था त्याहून वेगळी आहे असे दिसत नाही. स्वातंत्र्यानंतर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याने ऐतिहासिक ठिकाणाच्या संवर्धनाची जबाबदारी घेतली. सिंधुदुर्ग किल्ल्याची तटबंदी पाण्याच्या मा-यामुळे काही ठिकाणी ढासळली त्यावेळेस १९६१ ला महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शासनकालामध्ये तटाची दुरुस्ती करण्यात आली. २००५ च्या त्सुनामी मध्ये या किल्ल्याच्या पश्चिमेकडील तटबंदीचे नुकसान झाले. शासनाने हि तटबंदी दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले, मात्र किल्ल्याची म्हणावी तशी डागडूजी करण्यात आलेली दिसत नाही. शिवसेनेने देखील या किल्ल्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेतली परंतु म्हणावे तसे संवर्धन होत नसल्याने निराशाच होते. आज किल्ल्यामध्ये झाडे, झुडुपे आहेत. वाढलेली झाडेझुडुपे काढण्याची व्यवस्था ना पुरातत्व खात्याकडून ना शासनाकडून केली जाते. किल्ल्यामध्ये प्रवेश केल्यानंतर स्थलदर्शक नकाशा आणि ऐतिहासिक माहिती संदर्भात कोणतीही फलक नाही. किल्ल्याची डागडुजी नियमित होत नाही. किल्ले संवर्धनाबाबत पुरातत्व खाते उदासीन असल्याचे लक्षात येते. जनतेचे हि या किल्ल्याकडे म्हणावे तसे लक्ष नाही. केवळ एक पिकनीक स्पॉट म्हणून जनता त्याकडे पाहते. किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व समजून घेण्याची मानसिकता पर्यटकांमध्ये नाही.

**समारोप**

हा किल्ला शिवकालीन इतिहासाची साक्ष देत जवळजवळ ३५० वर्ष उभा आहे. या किल्ल्याची स्थापत्य रचना वैशिष्ट्यपूर्ण असल्याकारणामुळे चारही बाजूंनी खारे पाणी असताना, किल्ल्यात गोडे पाणी आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याभोवती पद्मगड, राजकोट व सर्जेकोट हे शिवरायांनी बांधलेले उपकोट आजही सिंधुदुर्गची साथसोबत करत उभे आहेत. शासनाच्या कोकणच्या पर्यटन विषयक धोरणात सिंधुदुर्गला मानाचे स्थान आहे. मालवणमधील स्थानिकांकडून सिंधुदुर्ग शेजारच्या समुद्रात मालवणच्या पर्यटनातील नीलक्रांती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समुद्रामध्ये स्नॉर्कलिंग व स्कुबा डायव्हिंगची सेवा पर्यटकांसाठी सुरु केली आहे. या अभिनव प्रयोगाने सिंधुदुर्ग किल्ल्याचे पर्यटन वाढीस लागून सिंधुदुर्गच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोचला गेला आहे. त्यामुळे कोकणचा मानबिंदू म्हणूनच सिंधुदुर्ग किल्ल्यास ओळखले जाते.

**संदर्भ**


१. प्र.के. घाणेकर, गड आणि कोट ,ऑगस्ट १९९३,स्नेहल प्रकाशन,पुणे.

२. प्र.के. घाणेकर ,किल्ले पाहू या !ऑगस्ट १९९३,स्नेहल प्रकाशन,पुणे.

३. आनंद पाळंदे, गिरीदुर्गच्या पहारयातून, १९८६ ग्रंथ मित्र प्रकाशन,पुणे.

४. डॉ. द.रा. केतकर, माझी इतिहासातील मुशाफीरी,जानेवारी २०१५,अपरांत प्रकाशन ,पुणे.

५. डॉ. भा.वा.आठवले,स्वामी दरियाचे, जुलै १९९७, राजहंस प्रकाशन, पुणे.

६. पवार, अप्पासाहेब- ताराबाईकालीन कागदपत्रे, 1970,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

७. अमात्य रामचंद्रपंत – आज्ञापत्र

८. पिसुरलेकर पां. स. – पोर्तुगीज- मराठे संबंध, 1963 पुणे विद्यापीठ, पुणे.

९. कदम, माधव – असा हा सिंधुदुर्ग,2000, युनिक प्रकाशन, सिंधुदुर्ग नगरी.

१०. खोबरेकर, वि. गो.– कोकणचा राजकीय इतिहास, 1997,इतिहास संशोधन मंडळ, मुंबई.

११. तापकीर, एस. बी. – अपरिचित दुर्गांची सफर, 2019,विश्वकर्मा प्रकाशन, पुणे.

# किल्ले सिंधुदुर्ग

**पूजा कमलाकर अणावकर**
श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड
Corresponding author E-mail: anaokarpk.dc@gmail.com

**सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राजा |**
**दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा ||**

असं म्हणणाऱ्या प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाचा ध्यास असतो तो महाराष्ट्राच्या ऐतेहासिक वस्तूंच्या भेटीचा! तळकोकण प्रांतात श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेला किल्ला म्हणजे सिंधुदुर्ग. सिंधुदुर्ग किल्ला महाराष्ट्राल्तील अनेक गडकिल्ल्यांपैकी तळकोकणाची ओळख असणारा हा किल्ला मालवण शहरामध्ये भर समुद्रात अजूनही डौलाने उभा आहे. या किल्ल्याची पायाभरणी श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी केली. या साठी महाराजांनी कुरटे या बेटाची निवड केली.

शिवाजी महाराजांनी तळकोकणच्या संरक्षणासाठी निर्माण केलेला हा जलदुर्ग इ. स. १६६४ मध्ये मालवण जवळील कुरटे या दगडी बेटाची निवड केली. इंग्रज, पोर्तुगीज, डच यांच्यापासून संरक्षणासाठी महाराजांनी उभारलेला हा किल्ला मालवण किल्ला म्हणून पण ओळखला जातो. किल्ल्याचा उभारणीसाठी साधारणतः एक कोटी होण खर्ची पडले. हा किल्ला बांधण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागला आणि १६६७ साली किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले. किल्ला बांधणीच्यावेळी जवळपास ७०,००० किलो लोखंड आणि ५०० खंडी शिसे यांचा वापर केला होता.

ऐतिहासिक सौदर्य लाभलेला सिंधुदुर्ग किल्ल्याच्या चारही बाजूला अथांग समुद्र आहे. महाराजांच्या आरमारामध्ये या किल्ल्याला विशेष महत्व होते. सिंधुदुर्ग किल्ल्यावर महाराजांच्या उजव्या हाताचे आणि डाव्या पायाचे ठसे उमटवले आहेत. मागील काही वर्षात लाटांमुळे किल्ल्याचे काही बुरुज व तटाचा भाग धसाला आहे. किल्ल्यात एक आडभिंत आहे, पूर्वी त्या जागी होडी वगैरे गुप्त साधनाची तरतूद करता येत असे आणि आणीबाणीचा वेळी सुटका करून घेता येत असे. दक्षिणेकडच्या तटाकडे चंद्राकृती आकारात आणि मऊ रेतीचा किनारा आहे. यालाच ‘राणीची वेळ’ किवा ‘राणीच्या स्नानाची जागा’ म्हणतात. इ.स. १७१३ मध्ये हा किल्ला कोल्हापूर संस्थानाच्या अधिपत्याखाली आला. १७६५ मध्ये इंग्रजांनी हा किल्ला ताब्यात घेऊन त्याचे नाव फोर्ट ऑगस्टस असे ठेवले होते, परंतु मुंबई च्या इंग्रजांनी कोल्हापूरच्या छत्रपतींना काही अटीवर परत दिला आणि मालवण वखार घालण्यास परवानगी मिळवली. १८१२ मध्ये कर्नल लायोनेल स्मीथ याने हा किल्ला घेऊन येथील समुद्री लुटारुंचा बंदोबस्त केला. मालवण सिंधुदुर्ग किल्ल्याचे प्रवेशद्वार पूर्वेस आहे पाण्यातून मनुष्य या तटाजवळ उतरला कि उत्तराभिमुख एक खिंड आहे. या खिंडीतून आत गेले कि गडाचा दरवाजा लागतो. महाराजांनी या गडाच्या दरवाजाची निर्मिती गोमुखी केलेली आहे. शत्रूला दरवाजाच्या जागी प्रवेशद्वार आहे असे लक्षातच येत नाही. या दरवाजाची निर्मिती हि भक्कम अशा उंबराच्या फळ्यापासून केली आहे. ह्या किल्ल्याच्या पूर्ण बांधकामाची जबाबदारी हिरोजी इंदुलकर यांच्यावर सोपवली होती. असे मानले जाते कि या किल्ल्यासोबतच एका भुयाराची पण निर्मिती केली होती. हे भुयार समुद्राच्या तळातून जाणारे ८ किमी लांबीचे आहे. हा भुयारी मार्ग ८ किमी अंतरावर मालवणपासून ते ओरोसपर्यंत आहे. या मार्गाला कोणताही सकृतदर्शनी पुरावा उप्लाब्ध नाही. या किल्ल्याचा बांधकामासाठी ३०० पोर्तुगीज आणि ३ हजार कामगारांनी तीन वर्षे काम केले. मराठ्यांचा भगवा ध्वज व त्यांचा ध्वजस्तंभ २२८ फूट उंच होता. त्यामुळे समुद्रातून दूरपर्यंत तो ध्वज सहजपणे दृष्टीस पडत होता. ध्वजाला पाहून मच्छिमार खडकापासून लांब राहत असत. हा भगवा ध्वज इ. स. १८१२ पर्यंत फडकत होता.

छत्रपती शिवाजी महाराज ह्या किल्ल्याचा कारभार रायगड वरून सांभाळत असत. मराठा साम्राज्याचे आरमार स्थापन करण्यात आणि स्वराज्याला बळकटी देण्यात या किल्ल्याचे महत्वपूर्ण योगदान आहे छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचा

आरमाराची सुरुवात हि १६५५ ते १६५६ च्या दरम्यान जावळी ताब्यात घेतल्यानंतर केली. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे पाहता स्वराज्याचे देखील आरमार असावे, हे स्वराज्याच्या हितासाठी व स्वराज्य बळकटीसाठी खूप महत्वाचे आहे हे ओळखून आरमार निर्माणाची सुरुवात झाली. समुद्राच्या वाटेने येणाऱ्या शत्रूला आळा घालण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याची निर्मिती केली. हा जलदुर्ग स्वराज्याचा संरक्षणामध्ये महत्वाची भूमिका निभावत होता.

केवळ किल्ला बांधतो तो राजा पण भविष्यातील धोक्याचा अंदाज घेत त्या किल्ल्यातून चोरवाटा तयार करून घेणारा तो म्हणजे 'जाणता राजा'. आपल्या महाराष्ट्र भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने असाच जाणता राजा होऊन गेला आणि या जाणत्या राजाने 'न भूतो न भविष्यति' अशा अफलातून किल्ल्याची व त्या किल्ल्यामधून निघणार-या चोरवाटांची निर्मिती केली. अशाच किल्ल्यांपैकी एक किल्ला म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला!

सिंधुदुर्ग किल्ला अथांग समुद्राच्या मधमोध वसलेला आहे. सिंधुदुर्ग किल्ल्यावरती ठिकठिकाणी तोफा ठेवण्याच्या जागा आहेत, बंदुका रोखण्यासाठी ताटबंदी मध्ये जागा आहेत, सैन्यासाठी पायखाणे आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा म्हणजे सिंधुदुर्ग किल्ला. असंख्य मावळयांच्या मदतीने आणि कष्टाने या अथांग पसरलेल्या निळयाभोर समुद्रामध्ये महाराजांनी एक जलदुर्ग निर्माण केला ज्याचे नाव आता सिंधुदुर्ग किल्ला म्हणून प्रसिद्ध आहे. हे स्थान पर्यटकांचे आकर्षण बिंदू आहे. सिंधुदुर्ग किल्ला मालवणपासून साधारणपणे अर्धा मैल समुद्रात आहे. या किल्ल्याला नैसर्गिक सौंदर्य लाभलेलं आहे. किना-याच्या आजूबाजूस असणारा समुद्र किल्ल्याला अलौकिक सौंदर्य प्राप्त करून देतो. त्याचप्रमाणे किल्ल्यावरती असणारया गोड्या पाण्याच्या विहरीदेखील एक चमत्कार म्हणता येईल. विषेश म्हणजे या किल्यामध्ये एका नारळाच्या झाडाला दोन फांद्या असणारे झाड होते.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे देवालय व मंडपात महाराजांची इतर कुठेही न दिसणारी बैठी प्रतिमा फक्त सिंधुदुर्ग किल्ल्यावरती विराजमान आहे. या किल्ल्याचे वैशिष्ट्य असे आहे कि हा किल्ला जेव्हा इंग्रजांचा ताब्यात गेला तेव्हा इंग्रजांनी या किल्ल्याची नासधूस केली. हा किल्ला पुन्हा बांधण्यासाठी वापरण्यात आलेला चुना आजदेखील या किल्ल्यामध्ये आहे आणि तो महाराजांच्या काळातील ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देतो. सिंधुदुर्गकिल्ल्यावर एक नगारखाना आहे. या नगारखान्यातून महाराजांच्या काळामध्ये वेगवेगळया प्रकारचे ध्वनी, तसेच ज्यावेळी शत्रू गडावर किवा राज्यावर आक्रमण करण्यासाठी येत, त्यावेळी या नगारखान्यातून वेगळा आवाज येई त्याप्रमाणे आज देखील हि परंपरा या किल्ल्यावर पार पडते, पण नगारखान्यातून येणारा ध्वनी हा सूर्यास्ताच्या वेळी येतो किवा रात्री आठ वाजता केला जातो. सिंधुदुर्ग किल्ल्यावरती शिवजयंती, रामनवमी, नवरात्र इ. उत्सव तिथीनुसार साजरे केले जातात. काही कुटुंबाची येथे वस्ती असून इथे एक आंगणवाडी व पूर्व प्राथमिक शाळा आहे कोल्हापूर संस्थान छत्रपतींच्या वतीने येथील शिवाजी मंदिरात प्रतिवर्षी जीरेटोप, वस्त्रे अर्पण केली जातात. तसेच या किल्ल्यावरील शिवरायांचा हाताच्या ठश्याचा चांदीचा छाप बनविण्यात आला असून दररोज त्याची पूजा कोल्हापुरातील जुना राजवाडा येथील भवानी मंदिरात होते. दर बारा वर्षांनी मालवण मधील श्री रामेश्वराची पालखी किल्ल्यावरील शिवराजेश्वर मंदिरात भेटीसाठी आणली जाते. हा सोहळा अभूतपूर्व असतो. भारत सरकारने सिंधुदुर्ग किल्ल्याला 21 जून 2010 रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षण स्मारक म्हणून घोषीत केले. चौ-याऐंशी बंदरात हा जंजिरा मोठा व अठरा टोपिकारंचे उरावर अजिंक्य दुर्ग होता असे वाखारकर लिहतात. या किल्ल्याच्या आजुबाजुला अथांग अरबी समुद्र असून तो किल्ल्याला एक अनोखे आणि अलौकिक सौंदर्य प्राप्त करून देतो. स्वराज्यचा आरमारी दलाची साक्ष देणारा हा शिवकालीन ऐतेहासिक किल्ला दुर्ग अभ्यासकांच्या आत्मीयतेचा केंदबिंदू ठरला आहे यात शंका नाही.

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगडचा समृद्ध वारसा

**स्वाती शांताराम कर्णिक**

श्री. स. ह. केळकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देवगड

Corresponding author E-mail: karnikss.dc@gmail.com

पर्यटन जिल्हा म्हणून प्रसिध्द असलेल्या निसर्गसंपन्न आणि अनेक अर्थांनी समृद्ध असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तितकंच वैशिष्ट्यपूर्ण आणि समृद्ध वारसा लाभलेलं आपलं देवगड! निसर्गाचा वरदहस्त लाभलेलं देवगड प्रयत्नपूर्वक आपल्या विविध क्षेत्रातील वारसा पुढे नेत आहे.

देवगडची काही वैशिष्ट्ये जसे की, विस्तीर्ण नयनरम्य समुद्रकिनारा, समुद्रातील बोटींना दिशा समजावी यासाठी उभारण्यात आलेले भव्य दीपगृह, मराठ्यांचे आरमार प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांनी बांधलेला देवगड किल्ला, त्या किल्ल्यामधील श्रीगणेशाचे जागृत देवस्थान, अपारंपरिक उर्जास्त्रोताचा उपयोग करून वीजनिर्मिती करणारा पवन उर्जा प्रकल्प (पवनचक्की), हापूस आंबा, मत्स्यसंपदा, आनंदवाडी जेटी, वॅक्स म्युझियम, ग्रामदेवता दिर्बादेवी-रामेश्वर, दक्षिण काशी म्हणून प्रसिध्द असलेलं कुणकेश्वर मंदिर, खवळे महागणपती, ब्राह्मणदेव मंदिर, इ. देवगडला समृद्ध करतात. देवगडचा विविध क्षेत्रातील समृद्ध वारसा खाली विषद केला आहे.

**शैक्षणिक वारसा**





देवगडवासियांना शिक्षणाची महती फार पूर्वीपासून जाणवली होती. शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या कन्या शाळा तसेच तालुका स्कूल याची साक्ष देतात. इथल्या माध्यमिक शिक्षणाची गरज ३ मार्च १९१९ या दिवशी स्थापन झालेल्या श्रीराम इंग्लिश स्कूल म्हणजेच आताचे शेठ म. ग. हायस्कूल, देवगड या शाळेने पूर्ण केली. माध्यमिक शिक्षणाची संपूर्ण देवगड तालुक्याची गंगोत्री ठरलेली अर्थात देवगड तालुक्यातील पहिली माध्यमिक शाळा यशस्वीपणे शतकोत्तर वाटचाल करीत आहे. यासाठी देवगड एज्युकेशन बोर्ड, मुंबई या शाळेच्या संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. १९७४ साली उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण उपलब्ध करून देणारे शिक्षण विकास मंडळाचे श्री. स. ह. केळकर महाविद्यालय (देवगड महाविद्यालय) सध्या सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. 'ज्ञानं, शीलं तपोबलम्' हे ध्येयवाक्य घेऊन शेठ म. ग. हायस्कूलमधून बाहेर पडणारा विद्यार्थी देवगड महाविद्यालयात जाऊन 'सा विद्या या विमुक्तये' या ध्येयवाक्याशी एकरूप होऊ लागला. कला, वाणिज्य, विज्ञान यांबरोबरच

इतर अनेक विद्याशाखांमध्ये शिकण्याची संधी या महाविद्यालयात उपलब्ध होऊ लागली. एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे शेठ म. ग. हायस्कूल, देवगड येथे १९६२ ते १९७७ या १५ वर्षांच्या काळात N.C.C. युनिट उत्तमप्रकारे कार्यरत होते. अलिकडच्या काळात देवगड महाविद्यालयात ५८ महाराष्ट्र बटालियनशी संलग्न N.C.C. चे एक पूर्ण युनिट कार्यरत आहे. देवगडमध्ये इंग्रजी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणारी 'उमा मिलिंद पवार' हायस्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने रौप्य महोत्सवी वाटचाल पूर्ण केली आहे. अशा प्रकारे देवगडच्या नकाशावरील शिक्षणाचे अवकाश विस्तारत आहे.

**क्रीडात्मक वारसा**

शारीरिक शिक्षण तथा क्रीडाविषयक उपक्रमांमध्ये देवगड कुठेच मागे नाही. देवगडमध्ये गेली अनेक वर्षे हनुमान युवक क्रीडा मंडळातर्फे विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. प्रामुख्याने कबड्डी, व्हॉलीबॉल इत्यादी. शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांच्या क्रीडाविषयक कौशल्याला वाव मिळवून देणारे उपक्रम सातत्याने होतच असतात. क्रिकेटच्या बाबतीत लिहायचे तर यंगस्टार क्रिकेट स्पर्धा तसेच आनंदवाडी ग्रामस्थ मंडळाने आयोजित केलेली राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत आहे.

**साहित्यिक वारसा**



साहित्यिक विश्वात महत्त्वपूर्ण योगदान देणारे अनेक मान्यवर प्रसिध्द साहित्यिक देवगडच्या भूमीने दिलेले आहेत. त्यामध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, श्रीपाद काळे, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विंदा करंदीकर, वि. वा. हडप, मामा वरेरकर, बाळकृष्ण प्रभू देसाई, डॉ. भा. वा. आठवले इ. देवगडचा हा साहित्यिक वारसा पुढेही असाच सुरु राहील ही अपेक्षा!

